अध्याय चोविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो जी गुणातीता । व्यक्तिरहिता अव्यक्ता । तुजमाजीं नाहीं द्वैतकथा । अद्वैततारहिवासी ॥ १ ॥ तुझा अद्वैत निजनिर्वाहो । तेथ नाहीं देवी देवो । उदयअस्तांचा अभावो । रविचंद्रांसी ठावो असेना ॥ २ ॥ तेथ सशब्द हारपला वेदू । बुद्धीसी मिथ्या बोधू । तिळभरी नाहीं भेदू । अद्वयानंद एकला ॥ ३ ॥ ऐशिया अद्वैतपणीं । प्रकृतिपुरुषांची काहाणी । सांगिजे केवळ अज्ञानीं । ज्ञातेपणीं चातुर्यें ॥ ४ ॥ जेथ मीतूंपणा नाहीं ठावो । तेथ प्रकृतिपुरुषां केवीं निर्वाहो । ज्याचा नाहीं गर्भसंभवो । त्याचें जातक पहा वो वर्तविती ॥ ५ ॥ जें जन्मलेंचि नाहीं । त्याचें श्राद्ध करावें कायी । हें ज्ञात्यासी पुसतां पाहीं । ठेवितां ठायीं तुकेना ॥ ६ ॥ वांझेच्या पुत्राचा विवाहो । समारंभ चला पहा हो । नेणा साच जाणा वावो । तैसा निर्वाहो प्रकृतिपुरुषां ॥ ७ ॥ ऐसें नसतेंचि नाथिलें । साचाचे परी नांदविलें । एकीं अनेकत्व दाविलें । एकपण संचलें न मोडतां ॥ ८ ॥ ऐसा एकपणें एकुलता । तोचि आपण आपली झाला कांता । आपुले कांतेचा आपण भर्ता । अतिलाघवता अतर्क्य ॥ ९ ॥ जेवीं अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । तेवीं प्रकृति पुरुष संसारीं । एकाकारीं नांदत ॥ १० ॥ तो पुरुष ते पतिव्रता । दोघां अनन्य प्रीति एकात्मतां । येरयेरां वेगळीकता । पाऊल सर्वथा न घालिती ॥ ११ ॥ दोघां एकत्र सदा असणें । दोघांसी एकचि नेसणें । दोघां एके सत्ता बैसणें । दोघें एकचि प्राणें वर्तती ॥ १२ ॥ दोघां एकचि देखणें । दोघां एकचि चाखणें । दोघां एकचि बोलणें । दोघां करणें एकचि ॥ १३ ॥ कैशी दोघां प्रीति अलौकिक । येरयेरांवीण न घेती विख । येरयेरांवीण न चाखिती उदक ।

ॐ हे गुणातीता ! तुला नमस्कार असो. तूं व्यक्तिरहित अव्यक्त आहेस. तुझ्यामध्यें द्वैताचें नांवहि नाहीं. तूं अद्वैतांत राहणारा आहेस. १ तुझें नित्य राहण्याचें स्थान अद्वैत आहे. तेथें देवी नाहीं व देव नाहीं. तेथें सूर्य-चंद्रांना थाराहि नसल्यामुळें उदय नाहीं व अस्त नाहीं. २ तेथें शब्दांसह वेद लीन होतो. बुद्धीला ज्ञानहि मिथ्या वाटतें. तेथें तिळभरहि भेद नाहीं. एक अद्वयानंदच भरलेला असतो. ३ अशा अद्वैत स्थितींत प्रकृति-पुरुषांची कहाणी केवळ अज्ञानी लोकांनींच मोठ्या चातुर्यानें सांगावी. ४ जेथें ' मी, तूं-' पणाला जागा नाहीं, तेथें प्रकृति-पुरुषांचा संभव कसा असणार ! गर्भधारणा होण्यापूर्वी भावी मुलाची जन्मपत्रिका वर्तविण्यासारखेंच हें आहे. ५ न जन्मलेल्या व्यक्तीचें श्राद्ध करावें काय ! असें ज्ञात्यांना विचारावयास गेलें असतां तें त्यांना संमत होत नाहीं. ६ किंवा ' वांझेच्या पुत्राचा लग्नसमारंभ पहावयास चला हो ' हें म्हणणें जसें असंबद्ध त्याचप्रमाणें प्रकृति-पुरुषांचा प्रकार आहे. ७ वस्तुतः नसलेलेंच हें सत्याप्रमाणें आहे. एकामध्यें अनेकत्व दाखविलें आणि एकपणा न मोडितां पूर्णपणें भरून राहिलें. ८ असा जो एकुलता एक तोच आपणच आपली स्त्री झाला आणि त्या आपल्या स्त्रीचा स्वतःच पति झाला. ही त्याची लीला अतिशय अतर्क्य आहे. ९ अर्धनारीनटेश्वर श्रीशंकर जसा एका शरीरांत स्त्री व पुरुष झाला त्याप्रमाणेंच हीं दोघें प्रकृति-पुरुष संसारांत एकरूपानें नांदतात. १० तो पति व ती पतिव्रता अशा परस्परांवरील अनन्य प्रीतीनें वागतात. एकमेकावांचून एक पाऊलहि टाकीत नाहींत. ११ दोघे सतत एकत्र असतात. एकच वस्त्र पांघरतात व एकाच सत्तारूप आसनावर बसतात व एका प्राणानेंच रहातात. १२ दोघांचें खाणें; पहाणें, बोलणें, करणें हीं सर्व एकच असतात. १३ दोघांचें कसें अलौकिक प्रेम असतें पहा ! तीं परस्परावांचून विष सुद्धां

येरयेरेंवीण देख आंधळीं ॥ १४ ॥ नवल बाइलेचें करणें । नपुंसका पुरुषत्व इणें देणें । मग तिचेनि अधीनपणें । पुरुषें नांदणें सर्वदा ॥ १५ ॥ मग हा तिचेनि डोळां देखे । मग हा तिचेनि बोले मुखें । तिचेनि भोगी हा सुखदुःखें । बंधमोक्ष चाखे तिचेनि ॥ १६ ॥ तिचेनि म्हणवी मी ब्रह्म । तिचेनि करी हा कर्माकर्म । तिचेनि भोगी । हा मरणजन्म । धर्माधर्मविभागें ॥ १७ ॥ तिचेनि यासी पाप घडे । तिचेनि यासी पुण्य जोडे । तिचेनि हा महत्त्वा चढे । तिचेनि पडे अधःपातीं ॥ १८ ॥ एथवरी अतिप्रीतीं । वाढविली निजप्रकृती । प्रकृति पातिव्रत्यस्थिती । वश्य निजपति तियें केला ॥ १९ ॥ नवल दोघांची सोयरिकी । दोघीं भावंडें होतीं सखीं । तो बाप ते त्याची लेंकी । पाहतां विवेकीं तो पुत्र तिचा ॥ २० ॥ यापरी अगम्यागमन । तिंहीं दोघीं करूनि जाण । वाढविले अनेक जन । तिसरेंपण नातळतां ॥ २१ ॥ ऐसा अव्यभिचारी व्यभिचारू । करूनि वाढविला संसारू । तो अतिअतर्क्य अगोचरू । अगम्य दुर्धरू शिवादिकां ॥ २२ ॥ हा निजशक्तिप्रकृतिमेळें । भोगी शिवत्वाचे सोहळे । प्रिया न देखतां तात्काळें । सांडी सगळें शिवत्व ॥ २३ ॥ ज्यासी गांवठाव ना जीवमेळ । रूपनांव ना काळवेळ । ऐसाही प्रकृती केवळ । केला सबळ निजगुणीं ॥ २४ ॥ प्रकृती निजगुणास्तव । निजभर्ता केला सावेव । वर्ण व्यक्ति रूप नांव । नाना वैभवविलासें ॥ २५ ॥ तंव पूर्णत्व लोपोनियां शिवें । अंगावरी वाढविलें शांभवें । येरी पतिव्रता अहेवें । रूपें नांवें शिव पूजी ॥ २६ ॥ दोघांपासूनि झालें जग । परी न दिसे तिसरा भाग । न तुटे अनन्यमिळणीयोग । भिन्न विभाग दाखवितां ॥ २७ ॥ त्रैलोक्य पाहतां सांग । न दिसे तिसरें अंग । दोघीं दुमदुमीत जग । भरलें चाग दुबंधीं ॥ २८ ॥ दोघांची अतिप्रीति ऐशी । अनन्यमिळणी अनन्यासी । दोघें अणूमाजीं सावकाशीं । निजरहिवासी नांदत ॥ २९ ॥ पतीवीण ते

घेत नाहींत. एकमेकांवांचून पाण्याचा थेंबहि घेत नाहींत. एकमेकांवांचून दोघेहि आंधळींच होतात. १४ त्यांत त्या स्त्रीची करणी तर फार विचित्र असते. पुरुषत्व नसलेल्यालाहि त्याला ती पुरुष करिते व मग तो पुरुष सतत तिच्या आज्ञेंत रहातो. १५ तो तिच्या डोळ्यांनीं पहातो. तिच्या मुखानें बोलतो, तिच्यायोगेंच सुख-दुःख भोगितो, बंधमोक्षांचा अनुभवहि तिच्यामुळेंच घेतो. १६ 'मी ब्रह्म' असें हा म्हणतो, कर्म-अकर्म करितो, धर्माधर्म विभागाप्रमाणें जन्म-मरण भोगितो. १७ तिच्यामुळेंच त्याच्या हातून पुण्य-पाप घडतें, महत्त्व प्राप्त होतें व अधःपातहि होतो. १८ येथपर्यंत अत्यंत प्रीतीनें त्यानें आपली प्रकृति वाढविली व प्रकृतीनें परम पातिव्रत्त्यानें पतीला वश करून घेतलें. १९ त्या दोघांचें नातेंहि मोठें विलक्षण आहे. तीं दोघें सख्खीं भावंडें होतीं; पिता व कन्या होतीं; किंवा दुसऱ्या बाजूनें विचार केला तर तोच तिचा पुत्र होतो. २० याप्रमाणें त्यांनीं पापमूलक नातें जोडून तिसऱ्या कोणाचा स्पर्शहि होऊं न देतां ही सृष्टि निर्माण केली. २१ त्यांनीं अव्यभिचारानें व्यभिचार करून हा संसार वाढविला. तो शिवादिकांसहि अत्यंत दुर्धर, अगोचर व अगम्य आहे. २२ हा आपल्याच शक्तीच्या संयोगानें शिवत्वाचे सोहळे भोगितो. पण आपली लाडकी प्रकृति दृष्टीस पडली नाहीं कीं, सगळें शिवपण सोडून देतो. २३ ज्याला गांव, ठिकाण, नांव-रूप, काळ वेळ कांहीं नाहीं, अशा पुरुषाला प्रकृतीनें केवळ आपल्या गुणांनीं प्रबल केलें. २४ प्रकृतीनें आपल्या गुणांमुळें पतीला अवयवयुक्त केलें व त्याला वर्ण, व्यक्ति, रूप-नांव, अनेक प्रकारचें वैभव इत्यादि विलास लावून दिले. २५ तेव्हां शिवानें आपला पूर्णपणा टाकून शिवत्व वाढविलें. ती पतिव्रता प्रकृति सौभाग्यानें नाम-रूपयुक्त शिवाची पूजा करिते. २६ त्या दोघांपासून हें जगत् उत्पन्न झालें. पण त्यांत कोणाचाहि विभाग दिसत नाहीं. त्यांचे भिन्न विभाग दाखवूं गेल्यास अनन्यभावानें झालेलें ऐक्य तुटत नाहीं. २७ सगळ्या त्रिभुवनांत शोधूं गेल्यास तिसरें कारण दिसत नाहीं. त्या दोघांनींच हें गजबजलेलें जगत् व्यापिलें आहे. सर्वत्र या दोघांचें ऐक्यच दिसत असतें. २८ दोघांचें प्रेम इतकें असतें कीं, तीं दोघें निरंतर एकमेकाला चिकटलेलीं असतात. एका परमाणूंतहि तीं दोघें सुखानें रहात असतात. २९ पतीवांचून ती पतिव्रता नाहींशीं होईल व तो पति तिच्यावांचून

पतिव्रता । सगळी विरजे सर्वथा । प्रियेवीण असताचि नसता । होय कांहीं नव्हतां भर्तारू ।। ३० ।। शिव निःसंग जो पैं सदा । क्रियाकरणेंवीण नुसधा । त्यासीही अतिप्रीतीं निजप्रमदा । सुखदुःखबाधा भोगवी ।। ३१ ।। यापरी निजनोवरा । प्रकृतीं गोविला घरचारा । मग घरवातेचा थारा । त्याच्याचि शरीरावरी केला ।। ३२ ।। प्रकृति पतिव्रता अवंचक । कर्माकर्मीं शिणोनि अनेक । सुखदुःखांची परवडी देख । अर्पी आवश्यक निजकांता ।। ३३ ।। नवल तें मी सांगावें काये । स्त्री जोडी तें पुरुष खाये । तियेवीण तो पाहें । कंहीं न लाहे कवडाही ।। ३४ ।। प्रकृति पतिव्रता शिरोमणी । कांत वश्य करोनि निजगुणीं । वासना सूक्ष्म सेवया अनुदिनीं । भोगवी सुगरणी भर्ताराकरवीं ।। ३५ ।। तेथ प्रकृतीचेनि गदारोळें । भवाब्धीं जळक्रीडा खेळे । प्रकृति पुरुषातें बुडवी बळें । पुरुष एकें काळें प्रकृति बुडवी ।। ३६ ।। ऐशा प्रकृतीच्या संगाआंत । पुरुषास लाविलें पंचभूत । जन्ममरणांच्या बुड्या देत । अवस्थाभूत होऊनी ।। ३७ ।। ऐसा प्रकृतीचिया भिडा । पुरुष केवळ झाला वेडा । निजत्व विसरोनि बापुडा । केला गाढा अतिदीन ।। ३८ ।। ऐसा विसरोनि पूर्णत्वासी । जीवशिवद्वंद्वें स्वयें सोशी । त्यासी न्यावया निजत्वासी । गुणिया पूर्णांशीं गुरुरावो ।। ३९ ।। ज्याचे वचनमात्रें पहा वो । जीवाचा हारपे जीवभावो । शिवा शिवपदीं ठावो । ज्याचा वचनगौरवो नांदवी ।। ४० ।। ज्याची भावार्थें ऐकतां गोठी । अहंकारू निमे उठाउठी । जन्ममरणांसी पडे तुटी । न दिसे दृष्टीं भवभय ।। ४१ ।। ज्याचिया कृपादृष्टीपुढें । जीवशिवांचें फिटे बिरडें । माया मिथ्यात्वें समूळ उडे । पूर्णत्वाचें उघडे भांडार ।। ४२ ।। शिवू मुकला शिवत्वासी । यावया तो निजपदासी । आज्ञा जैं पुसे सद्गुरूसी । तैंचि शिवासी शिवत्व ।। ४३ ।। एवढी महिमा सद्गुरूसी । वचनें केवीं वानूं त्यासी । तंव वानिते वाणीनें वानावयासी । वदवी वाचेसी गुरुरावो ।। ४४ ।। तेथ एक मी वानिता । हे कोणे घ्यावे आपुले माथां ।

'आहे नाहीं' सारखाच होईल. तो कांहीं न होतांच भर्ता झाला आहे. ३० वस्तुतः जो शिव सदा निःसंग, निष्क्रिय इंद्रियरहित व केवल आहे, त्यालाहि ती सुखदुःख भोगावयास लाविते. ३१ याप्रमाणें प्रकृतीनें आपल्या पतीला प्रपंचांत गुंतविलें व ती त्याच्यावरच सत्ता गाजवूं लागली. ३२ प्रकृति खरी पतिव्रता आहे. ती आपल्या पतीशीं यत्कींचित्‌हि प्रतारणा करीत नाहीं. म्हणून अनेक कर्म-अकर्मांचें कष्ट सोसून ती आपल्या पतीस यथास्थित सुख-दुःख अर्पण करिते. ३३ काय आश्चर्य सांगावें ! ही स्त्री जें मिळवून आणिते त्याचेंच तो पुरुष सेवन करितो. तिच्यावांचून त्याला कोठें एक कवडीहि मिळत नाहीं. ३४ प्रकृति सर्व पतिव्रतांमध्यें श्रेष्ठ आहे. ती सुगृहिणी आपल्या गुणांनीं पुरुषाला वश करून त्याला सूक्ष्म वासनारूपी शेवया खाऊं घालिते. ३५ प्रकृतीच्या आग्रहानें तो तिजबरोबर जळक्रीडा करितो. त्यावेळीं ती त्याला बुडविते. व तो तिला बुडवितो. ३६ अशा प्रकृतीच्या संगतींत पुरुषाला पंचभूतें लागतात व तो साकार होऊन जन्म-मरणांच्या बुड्या मारीत असतो. ३७ प्रकृतीच्या भिडेनें पुरुष वेडा होतो व तो आपलें मूळ स्वरूप विसरून अत्यंत दीन होतो. ३८ तो आपलें पूर्णत्व विसरून तो स्वतः जीव-शिवांचें द्वंद्व सहन करितो. त्याला पुनः आपल्या आत्मस्वरूपांत नेणारा चतुर असा एक गुरूच आहे, ३९ त्याच्या केवल शब्दानेंच जीवाचा जीवभाव नाहींसा होतो. शिवाला आपल्या शिवपणाचें स्थान मिळतें. ४० ज्याचा उपदेश भक्तीनें ऐकिला असतां अहंकार जागच्याजागीं विरून जातो, जन्म-मरण तुटून जातें व भवभय दृष्टीसहि पडत नाहीं, ४१ त्याच्या कृपादृष्टीपुढें जीवा-शिवांचा बंध तुटतो, माया मिथ्यात्वामुळें समूळ नाहींशी होते आणि पूर्णत्वाचें भांडार उघडतें. ४२ शिव आपल्या शिवपणाला मुकला म्हणजे मग तो पुनः आपल्या पदावर येण्यासाठीं सद्गुरूची आज्ञा विचारीत असतो. तेव्हांच शिवाला त्याचें शिवत्व प्राप्त होतें. ४३ एवढा सद्गुरूचा महिमा आहे. शब्दांनीं त्याचें काय वर्णन करावें ! पण गुरुराया वर्णन करणाऱ्या वाणीनें वर्णन करण्यासाठीं तिच्याकडून ते वदवितो ! ४४ तेव्हां 'मी एक वर्णन करणारा' हा दोष आपल्या माथीं कोणीं घ्यावा ! गुरूनें अहंकारच

गुरूनें हरितली अहंता । तेथ मी एक कर्ता घडे केवीं ॥ ४५ ॥ तेथ मीपणें घ्यावी अहंता । तंव गुरुचि मीपणाआंतौता । गुरूवेगळा ठाव नाहीं रिता । मीपणाचे माथां गुरुरावो ॥ ४६ ॥ माझें जें कां मीपण । तें सद्‌गुरु झाला आपण । तेव्हां रूप एक नांवें भिन्न । एका जनार्दन एकत्वें ॥ ४७ ॥ अवघा जनार्दनचि देखा । तोचि उपनांवें झाला एका । तेणें नामें श्रीभागवत देखा । देशभाखा अर्थवी ॥ ४८ ॥ तेविसावे अध्यायाचे अंतीं । देवो बोलिला उद्धवाप्रती । द्वंद्वभोगांची निजप्राप्ती । सहावी शांति धरोनी ॥ ४९ ॥ ज्यांसी बाणली अढळ शांती । ते मज अजितातें जिंकिती । तेचि साचार परमार्थी । स्वमुखें श्रीपति बोलिला ॥ ५० ॥ तें ऐकोन कृष्णवचन । उद्धवाचें दचकलें मन । द्वंद्वसहिष्णुता अतिकठिण । कैसेनि आपण साहावी ॥ ५१ ॥ द्वंद्वसहिष्णुतासाधन । पुसता उबगेल श्रीकृष्ण । ऐशिया भिडा उद्धव पूर्ण । धरोनि मौन राहिला ॥ ५२ ॥ तो उद्धवाचा अभिप्रावो । जाणोनिया देवाधिदेवो । द्वंद्वसहिष्णुताउपावो । समूळ पहावो सांगत ॥ ५३ ॥ अद्वयत्वें परिपूर्ण । प्रकृतीहूनि पुरुष भिन्न । हें आकळल्या निजज्ञान । द्वंद्वबंधन बाधीना ॥ ५४ ॥ द्वंद्वें जीणावया पूर्ण । प्रकृतिपुरुषविवेचन । उद्धवें न करितां प्रश्न । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ५५ ॥ भक्तअंतरींचें जाणता । यालागीं अंतर्यामी तत्त्वतां । तो निजभक्तांचिया स्वार्था । पूर्ण परमार्थ सांगत ॥ ५६ ॥ निजभक्तांचें मनोगत । जाणोनियां श्रीकृष्णनाथ । करावया भक्तहित । कृपेनें सांगत कृपाळु ॥ ५७ ॥ जगीं धन्य भाग्य उद्धवाचें । कृष्ण दैवत तिहीं लोकींचें । कृपा वोरसोनियां साचें । प्रकृतिपुरुषांचें निज सांगे ॥ ५८ ॥ आशंकेचें निरूपण । उद्धवें न सांगतांही जाण । तें जाणोनियां श्रीकृष्ण । कृपां निरूपण निरूपी ॥ ५९ ॥ कृष्ण म्हणे ज्यासी तारीन । तो पहिलाची तरला जाण । करावया जगाचें उद्धरण । कृपें श्रीकृष्ण बोलत ॥ ६० ॥ धेनु वत्साचेनि लोभें । जेवीं घरापुरतें दुभे । तेवीं उद्धवाचेनि वालभें । जग पद्मनाभें उद्धरिलें ॥ ६१ ॥

नाहींसा केल्यावर मग 'मी एक कर्ता' हें बोलणें कसें संभवतें ! ४५ बरें, मीपणाचें अहंकार स्वीकारावा तर मीपणाच्या रूपानें अहंतेच्या आंत गुरुच आहे. गुरूवांचून रेंसभरहि जागा रिकामी नाहीं. मीपणाच्या मस्तकावर गुरुरायाच बसला आहे. ४६ माझें जें मीपण तें सद्‌गुरु आपणच झाला. तेव्हां एकनाथ व जनार्दन यांच्या एकत्वाचें रूप एकच; पण नांवें मात्र भिन्न झालीं. ४७ सगळा जनार्दनच भरलेला आहे; पण तोच उपनांवानें एकनाथ झाला आणि त्याच नांवानें त्यानें या श्रीभागवताचा मराठी भाषेंत अर्थ करविला. ४८ तेविसाव्या अध्यायाच्या शेवटीं श्रीकृष्णानें उद्धवाला मनांत शांति ठेवून सुख-दुःखादि द्वंद्वभोग सहन करावे, असें सांगितलें. ४९ श्रीकृष्ण स्वमुखानें बोलिले कीं, ज्य ज्या ठिकाणीं कधींहि न ढळणारी शांति बाणली आहे ते मजसारख्या अजिंक्याला जिंकतात, तेच खरे परमार्थी ५० तें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धव मनांत दचकला. 'द्वंद्वें सहन करणें अत्यंत कठिण आहे. तीं आपण कशीं सहन करावीं! ५१ आतां द्वंद्वसहिष्णुतेचें साधन विचारिलें तर श्रीकृष्णाला कंटाळा येईल' अशा भिडेनें उद्धव अगदीं गप्प बसला. ५२ म्हणून उद्धवाच्या मनांतील आशय जाणून देवाधिदेव श्रीकृष्णच द्वंद्वें सहन करण्याचा उपाय सविस्तर सांगत आहे, पहा ! ५३ परिपूर्ण अद्वैतभावनेनें प्रकृतीहून पुरुष भिन्न आहे, असें ज्ञान मिळविलें म्हणजे द्वंद्वांचें बंधन बाधत नाहीं. ५४ द्वंद्वांना पूर्णपणें जिंकण्यासाठीं प्रकृतिपुरुषांचें विवेचन श्रीकृष्ण आपण होऊन, उद्धवानें न विचारितांच, करीत आहे. ५५ भक्तांच्या अंतःकरणांतील भाव जाणणारा म्हणूनच तो अंतरात्मा होय. तो आपल्या भक्तांच्या स्वार्थासाठीं पूर्ण परमार्थ सांगत आहे. ५६ आपल्या भक्ताचें मनोगत जाणून दयाळु श्रीकृष्णनाथ भक्ताचें हित करण्यासाठीं कृपा करून सांगत आहे. ५७ उद्धव मोठा भाग्यवान् खरा. कारण त्रिभुवनाचें दैवतच असा श्रीकृष्ण कृपाकरून प्रकृति-पुरुषांचें लक्षण सांगूं लागला. ५८ उद्धवानें आपल्या मनांतील आशंका न विचारितांच श्रीकृष्णानें ती जाणून निरूपण करण्यास आरंभ केला. ५९ श्रीकृष्ण ज्याला 'तारीन' असें बोलतो, तो आधींच तरून गेला असें समजावें. याप्रमाणें उद्धवाचा उद्धार जरी पूर्वींच झाला होता, तरी जगाचा उद्धार करण्यासाठीं श्रीकृष्ण कृपा करून सांगूं लागला. ६० गाय जशी वासराच्या निमित्तानें सगळ्या घराला दुभतें पुरविते, तसें श्रीकृष्णानें उद्धवाच्या निमित्तानें व त्याच्यावरील प्रीतीनें जगाचा उद्धार केला. ६१.

श्रीभगवानुवाच–अथ ते संप्रवक्ष्यामि साङ्ख्यं पूर्वविनिश्चितम् ।
यद्विज्ञाय पुमान् सद्यो जह्याद्वैकल्पिकं भ्रमम् ॥ १ ॥

जो योगियांचा योगेंद्र । जो ज्ञानियांचा ज्ञानेंद्र । जो भक्तचित्तचकोरचंद्र । जो यादवेंद्र यदुवंशीं ॥ ६२ ॥ जो प्रकृतिपुरुषांहूनि पर । तो स्वयें बोले शार्ङ्गधर । उद्धवा द्वंद्वसहनप्रकार । अतिगुह्य विचार अवधारीं ॥ ६३ ॥ जें ऐकतांच निरूपण । सुखदुःखातीत आपण । हे संपूर्ण पावे खूण । तें गुह्य ज्ञान अवधारीं ॥ ६४ ॥ मी कपिलरूपें अवतरूनी । प्रकृतिपुरुष विवंचोनी । उपदेशिली निजजननी । ते जुनी काहाणी सांगेन ॥ ६५ ॥ जे परिसतां सावधान । स्वयें होइजे ज्ञानसंपन्न । पुरुषाहूनि प्रकृति भिन्न । सुखदुःख जाण तीपाशीं ॥ ६६ ॥ सुखदुःखें मायिक पूर्ण । ऐसें ज्यासी कळलें ज्ञान । तेव्हां भवभयभ्रम दारुण । तत्काळ जाण तो सांडी ॥ ६७ ॥ जेवीं मोतियांची कंठमाळा । भ्रमें सर्प भासली डोळां । ते भ्रमांतीं घालित गळां । न बाधी कंटाळा सर्पभयाचा ॥ ६८ ॥ तेवीं शिवशक्तिविवंचन । तुज मी सांगेन संपूर्ण । जें आकर्णितां सावधान । द्वंद्वें सकारण हारपती ॥ ६९ ॥ ब्रह्म सुखरूप एकलेपणीं । तेथ प्रकृतिपुरुष कैंचीं दोनी । द्वंद्वसुखदुःखें ज्यापासोनी । त्रिभुवनीं न समाती ॥ ७० ॥ तेचि अर्थीचें निरूपण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । प्रकृतिपुरुषांचें जन्म जाण । तें मुख्य कारण सुखदुःखां ॥ ७१ ॥

[या चोविसाव्या अध्यायांत सांख्यतत्त्वज्ञानानें मनाचा मोह घालविला जातो. आत्म्याहून भिन्न असलेल्या सर्व पदार्थांच्या उत्पत्ति-विनाशचिंतनानें त्याचें निवारण होतें. आपल्या चरणकमलद्वंद्वाची भक्ति करणाऱ्या भक्तांच्या सुख-दुःखादि द्वंद्वाच्या निवृत्तीसाठीं चित्ताचा संयम वर सांगितला. आतां येथें पुनः त्यांच्या चित्तसंयमासाठींच भगवान् कृष्ण सांख्य सांगतात–]

—अद्वितीय परमात्म्यापासून मायेनें प्रकृति-पुरुषांच्या द्वारां सर्व द्वैत उदय पावतें व पुनः त्याच्याच ठिकाणीं लय पावतें असें अनुसंधान करणाऱ्या पुरुषांचा द्वैतभ्रम निवृत्त होतो, हें सांगण्यासाठीं सांख्यांचा प्रस्ताव करितात—

श्रीभग० उ०-भगवान् म्हणाले--अथ ते पूर्वविनिश्चितं सांख्यं प्रवक्ष्यामि–आतां मी तुला प्राचीन कपिलादिकांनीं निश्चित केलेलें सांख्य सांगेन, यद्विज्ञाय पुमान् सद्यः वैकल्पिकं भ्रमं जह्यात्–ज्या सांख्याला जाणून पुरुष तत्काल भेदामुळें प्राप्त झालेला सुख-दुःखादिरूप भ्रम टाकितो. [त्याच्या भ्रमाची निवृत्ति होते.] १.

जो योग्यांतील श्रेष्ठ योगीश्वर, ज्ञान्यांचा स्वामी, भक्तांच्या चित्तरूपी चकोरांस तृप्त करणारा चंद्र, यदुवंशांतील यादवश्रेष्ठ, ६२ प्रकृति-पुरुषांहून अतीत असा तो श्रीकृष्ण स्वतः म्हणाला कीं, हे उद्धवा! द्वंद्वसहिष्णुतेच्या प्रकाराचा अतिशय गूढ विचार सांगतों, ऐक. ६३ जें ज्ञान ऐकतांच 'आपण सुख-दुःखादि द्वंद्वांहून भिन्न आहोंत,' ही खूण पूर्णपणें पटते, तें गुह्यज्ञान ऐक. ६४ मी पूर्वीं कपिलमुनीच्या रूपानें अवतरलों आणि आपल्या मातेला प्रकृति-पुरुषांचा विचार म्ह० सांख्यशास्त्राचा उपदेश केला. ती जुनी कथा तुला सांगतों, ऐक. ६५ जी कथा सावधान चित्तानें ऐकिली असतां 'पुरुष प्रकृतीहून भिन्न आहे व सर्व सुख-दुःख प्रकृतीचें आहे,' या ज्ञानानें मनुष्य संपन्न होतो. ६६ सुख-दुःख मायिक आहे असें एकदां ज्ञान झालें, म्हणजे मग संसाराचें दारुण भय तो तत्काल सोडितो. ६७ मोत्याची कंठी भ्रमानें 'ही सर्पच आहे' अशी जरी आरंभीं भासली तरी तो भ्रम नाहींसा झाल्यावर ती गळ्यांत घातली असतां सर्पबाधेचें जसें भय रहात नाहीं, ६८ त्याप्रमाणें पुरुष व प्रकृति यांचें विवेचन मी तुला सांगतों, तें लक्षपूर्वक ऐकलें असतां कारणांसह सगळीं द्वंद्वें नाहींशीं होतात. ६९ सुखस्वरूप ब्रह्म एकटेंच असतां तेथें ज्यापासून सुख-दुःखांचें द्वंद्व उद्भवतें व तें सगळ्या त्रिभुवनांतहि मावत नाहीं, ७० अशी ही प्रकृतिपुरुषांची जोडी कशी संभवते, याचेंच निरूपण आतां श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. प्रकृति-पुरुषांचा जन्मच सुख-दुःखांचें कारण आहे. ७१.

आसीज्ज्ञानमथो ह्यर्थ एकमेवाविकल्पितम् । यदा विवेकनिपुणा आदौ कृतयुगेऽयुगे ॥ २ ॥

जेवीं निजेल्या पुरुषाची छाया । पुरुषातळीं जाय लया । तेवीं सविकार गिळोनि माया । ब्रह्म एकल्या एकाकी ॥ ७२ ॥ ब्रह्म एकाकी परिपूर्ण । हेंही म्हणावया म्हणतें कोण । नाहीं नाम रूप व्यक्ति पूर्ण । ब्रह्मीं ब्रह्मपण स्फुरेना ॥ ७३ ॥ तेथ नाहीं युगसंख्या काळ वेळ । नाहीं दिनमान घटिका पळ । नाहीं शून्यत्वें शून्य मंडळ । ब्रह्म केवळ परिपूर्णत्वें ॥ ७४ ॥ तेथ मी ब्रह्म स्फुरे जें स्फुरण । तेंचि मायेचें मुख्य लक्षण । तेंचि प्रकृतिपुरुषांचें जन्मस्थान । जावळीं फळें जाण जन्मलीं ॥ ७५ ॥ जेवीं कां कवळूनियां कण । निकण कोंडा वाढे आपण । तेवीं पुरुषयोगें पूर्ण । प्रकृति जाण थोरावे ॥ ७६ ॥ धरूनि गोडपणाचा सांठा । फणसाअंगीं वाढे कांटा । तेवीं पुरुषयोगें ताठा । चढला मोटा प्रकृतीसी ॥ ७७ ॥ जेवीं कां डोळींचेंचि जळ । गोठोनि डोळां होय पडळ । तेवीं ब्रह्मीं मायामळ । करी शबळ शुद्धासी ॥ ७८ ॥ पडळ डोळा मंद करी । माया निजानंद आवरी । वाढोनि त्याची त्यावरी । वेडा करी पुरुषातें ॥ ७९ ॥ ऐसें कर्तेनवीण आपसया । कार्यकरण जें आलें आया । त्यातें कृतयुग म्हणावया । वेदू लवलाह्यां उदेला ॥ ८० ॥ अकारउकारमकारेंसीं । वेदू उपजे प्रकृतिपुरुषीं । जेवीं उकलल्या बीजासी । प्रथम ये त्यासी तिवणा डिरू ॥ ८१ ॥ ते वेदींचा अभिप्रावो । ब्रह्म सत्य माया वावो । आपुलेनि अभेदें ब्रह्मभावो । विवेकनिपुण पहा वो जाणती ॥ ८२ ॥ ऐसे वेदविवेकें अभेदयोगी । ते कृतादीं होत कां कलियुगीं । वर्तता ते सदा अयुगीं । युग त्यांलागीं असेना ॥ ८३ ॥ कृतयुगादि युगपंक्ती । चराचर नाना व्यक्ती । यांसी उपजवी प्रकृति । तिची उत्पत्ति हरि सांगे ॥ ८४ ॥

ज्ञानं अथो अर्थः अविकल्पितं एकं एव आसीत्–ज्ञान म्ह० द्रष्टा व त्यानें दृश्य असा सर्वहि अर्थ, हें सर्व विकल्पशून्य एकच होतें (म्हणे ब्रह्ममध्येंच लीन होतें असा याचा भावार्थ. केव्हां ? उत्तर–) **अयुगे**–युगांच्या पूर्वी (म्ह० प्रलयांत असा याचा भावार्थ.) तसेंच, **आदौ कृतयुगे**–आरंभीं जें कृतयुग झालें त्यामध्यें दुसऱ्या वेळीं, **यदा विवेकनिपुणाः**–जेव्हां विवेकनिपुण जन होतात, तेव्हांहि त्यांना भेदाची स्फूर्ति होत नसल्यामुळें हें सर्व एकच होतें. २.

निजलेल्या पुरुषाची छाया जशी त्याच्या अंगाखालीं लोपून जाते, त्याप्रमाणें विकारांसह मायेला गिळून ब्रह्म एकटेंच रहातें. ७२ ब्रह्म एकटेंच आहे, हें तरी म्हणणार कोण ! कारण त्याला नाम रूपव्यक्ति इत्यादि कांहींहि नाहीं. ब्रह्ममध्यें ब्रह्मत्वच स्फुरत नाहीं. ७३ त्याला युगाची संख्या, काळ, वेळ दिनमान, घटका, पळें हें कांहीं नसतें. ब्रह्म शून्यत्वानें परिपूर्ण भरून रहातें. ७४ त्या मज ब्रह्माचें स्फुरण हेंच मायेचें लक्षण होय. तेंच प्रकृति-पुरुषांचें जन्मस्थान. त्यापासून हीं दोन जुळीं फळें जन्माला येतात. ७५ पोटांत दाणा ठेवून निःसत्त्व कोंडा जसा स्वतः वाढतो, तशी ही प्रकृति पुरुषामुळें वाढते. ७६ गोडपणा सांठवून फणसाचा कांटा जसा वाढतो, तसा पुरुषामुळें प्रकृतीला मोठा ताठा चढतो. ७७ किंवा डोळ्यांतीलच अश्रु गोठून डोळ्यांवर जसा पडदा येतो, त्याप्रमाणें ब्रह्ममध्यें मायारूपी मळ सांठून परब्रह्मावर आवरण पडतें. ७८ डोळ्यावर पडदा आला कीं, तो दृष्टि मंद करितो. माया आत्मानंदाला झांकिते व त्याच्या आश्रयानेंच वाढून पुरुषाला वेड लाविते. ७९ याप्रमाणें कर्त्यावांचूनच आपोआप जें कार्य-कारण उत्पन्न झालें, त्याला कृतयुग म्हणावयास वेद तत्काळ उद्युक्त झाला. ८० रुझलेल्या बीजाला ज्याप्रमाणें तीन पानांचा अंकुर फुटतो, त्याप्रमाणें अकार, उकार व मकार मिळून 'ओं' या अक्षरानें वेद प्रकृति-पुरुषांत प्रकट झाला. ८१ 'ब्रह्म सत्य व माया मिथ्या' हाच त्या वेदाचा सारांश आहे. आपल्या स्वाभाविक अभेदानें ब्रह्मस्वरूपच प्राप्त होतें, हें पूर्ण विवेकी लोक जाणतात. ८२ अशा वेदाचा विचार करून जे अभेदभावानें योगी होतात ते कृतयुगांत जन्मोत किंवा कलियुगांत होवोत, ते युगरहितच वागत असतात. त्यांना युग नाहीं. ८३ कृतादि युगें व चराचरादि अनेक प्रकारच्या व्यक्ति प्रकृतीपासूनच उद्भवतात. त्यांचीच उत्पत्ति आतां हरि सांगत आहे. ८४.

तन्मायाफळरूपेण केवलं निर्विकल्पितम् । वाङ्मनोगोचरं सत्यं द्विधा समभवद्बृहत् ॥ ३ ॥

तें बृहत् जें परब्रह्म । जेथ न रिगे रूपनाम । जें मनबुद्धींसी अगम्य । जें दुर्गम इंद्रियां ॥ ८५ ॥ जें निर्गुण निराकार । जें सत्यस्वरूप साचार । जें परेहूनि परात्पर । निर्विकार निजवस्तु ॥ ८६ ॥ तेथ अतर्क्य मायाचमत्कार । करी दृश्यद्रष्टृत्वें सविकार । तेचि प्रकृति पुरुष साचार । जे चराचर वाढवी ॥ ८७ ॥ जेवीं रूपासवें छायेची व्यक्ती । तेवीं ब्रह्मीं मायेची निजस्थिती । तिणें उपजविली शिवशक्ति । पुरुष प्रकृति द्विधा भेदें ॥ ८८ ॥ ब्रह्मांडीं ईश्वरस्वभावो । पिंडीं त्यासीच जीवभावो । ऐसा प्रकृतिपुरुषनिर्वाहो । मायेनि पहा हो द्विधा केला ॥ ८९ ॥ ब्रह्म अच्छेद्य वेदु बोले । तें फाडूनि द्विधा कैसें केले । जेवीं आरिसां आपण आपुलें । मुख देखिलें संमुख ॥९०॥ आपण पूर्वामुख आहे । प्रतिबिंब पूर्वेकडे न होये । आपलें आपणा संमुख होये । हें लाघव पाहें मायेचें ॥ ९१ ॥ प्रतिबिंब दिसतां संमुख । संमुख म्हणतां अतिविमुख । पुरुष पूर्वेकडे देख । प्रतिबिंबाचें मुख पश्चिमेकडे ॥ ९२ ॥ तेवीं आत्मदृष्टि स्वरूपीं पडे । जीवनदृष्टि प्रपंचाकडे । येणें संमुखत्व न घडे । विमुखत्व गाढें जीवासी ॥ ९३ ॥ तेवीं ब्रह्मीं जें ब्रह्मस्फुरण । तेंचि मूळमायेचें लक्षण । तेथ ईश्वरत्वें जाण । होय आपण्या आपण संमुख ॥ ९४ ॥ जे अद्वितीय वस्तु शुद्ध । तेथ मिथ्या मायासंबंध । अभेदीं उपजवूनि भेद । केलीं विविध शिवशक्ति ॥ ९५ ॥

तयोरेकतरो ह्यर्थः प्रकृतिः सोभयात्मिका । ज्ञानं त्वन्यतमो भावः पुरुषः सोऽभिधीयते ॥ ४ ॥

तत् केवलं निर्विकल्पितं वाङ्मनोगोचरं सत्यं बृहत्–तें केवल–निरुपाधिक, निर्विकल्पित–नाम-रूपरहित सत्य ब्रह्म वाङ्मनोगोचरं मायाफलरूपेण द्विधा समभवत्–वाक् व मन यांचा विषय होईल अशाप्रकारें माया– दृश्य व फल–त्याचा प्रकाश अशा रूपानें दोन प्रकारचें झालें. ३.

जें परब्रह्म तें बृहत् म्ह० व्यापक आहे. तें नाम-रूपरहित असल्यामुळें मन-बुद्धीला अगम्य व त्यामुळेंच इंद्रियगोचर नाहीं. ८५ तें निर्गुण, निराकार, सत्यस्वरूप, परेच्या पलीकडे, निर्विकार असें तत्त्व आहे. ८६ मायेचा चमत्कार अतर्क्य आहे. निर्विकल्प ज्ञानमय ब्रह्मच माया व प्रतिबिंब या दोन प्रकारचें होतें. तेंच प्रकृति-पुरुष या रूपानें चराचर वाढवितें. ८७ रूपाबरोबर छाया जशी व्यक्त होते, त्याचप्रमाणें ब्रह्ममध्यें मायेची स्थिति आहे. तिनेंच शिव-शक्तीला प्रकृति व पुरुष अशा दोन प्रकारच्या भेदानें उत्पन्न केलें आहे. ८८ पुरुष ब्रह्माण्डांत ईश्वररूपानें रहातो आणि देहामध्यें जीवभावाला प्राप्त होतो. असा हा मायेनें प्रकृति-पुरुषांचा दोन प्रकारचा विभाग केला आहे. ८९ 'ब्रह्म अच्छेद्य आहे' असें जर वेद सांगत आहे, तर त्याचे दोन विभाग कसे होतील ! (असें जर म्हणशील तर) आरशामध्यें जसें आपण आपलेंच मुख आपल्या समोर पहातों, त्याप्रमाणें (त्याचे दोन भाग दिसतात.) ९० पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां आपलें प्रतिबिंब पूर्वेकडे न पडतां आपल्या समोरच पडतें, हें मायेचें कौतुक होय. ९१ प्रतिबिंब समोर दिसतें; पण समोर म्हणावें तर अगदीं उलट दिशेला दिसूं लागतें. म्हणजे पूर्वेकडे तोंड करून उभें राहिलें असतां पश्चिमेला प्रतिबिंब पडतें. ९२ त्याप्रमाणें आत्मदृष्टि स्वरूपाकडे असते व जीवदृष्टि प्रपंचाकडे असते; त्यामुळें तो जीवाच्या संमुख न होतां विमुखच होतो. ९३ त्याचप्रमाणें ब्रह्मामध्यें ब्रह्माचें स्फुरण होतें. तेंच मूळमायेचें कारण आहे. तेथें ईश्वरस्वरूपानें आपण आपल्याच संमुख होतो. ९४ जें खरें शुद्ध व अद्वितीय ब्रह्म, त्यांत मायेचा संबंध मिथ्या होय, परंतु अशा अभेदांतहि भेद उत्पन्न करून त्यानें दोन प्रकारें शिव आणि शक्ति म्ह० पुरुष व प्रकृति, यांना उत्पन्न केलें. ९५.

तयोः सा उभयात्मिका प्रकृतिः एकतरः अर्थः–त्या दोनप्रकारच्या अंशांतील कार्य-कारणरूपिणी प्रकृति हा एक पदार्थ आहे. हि ज्ञानं तु अन्यतमः भावः–आणि ज्ञान हा त्यांतील दुसरा पदार्थ आहे. सः पुरुषः अभिधीयते–तोच पुरुष म्हटला जातो. ४.

त्या दोहीं भागांमाझारीं । प्रकृतिभाग तो विकारी । पुरुषभाग तो अविकारी । स्वयें श्रीहरि सांगत ॥ ९६ ॥ तेथ आपण आपुली कांता । आपुले कांतेचा आपण भर्ता । एकपणीं दावूनि द्वैता । भिन्नविभागता शिवशक्ति ॥ ९७ ॥ जेवीं आपुलें एक अंग । तेथ बोलती वाम सव्य भाग । तेवीं प्रकृतिपुरुषविभाग । जाणावे सांग मायिक ॥ ९८ ॥ अर्धनारीनटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । प्रकृति पुरुषीं तैशी परी । एक शरीरीं एकात्मता ॥ ९९ ॥ जैं पुरुषविभाग लपवी । तैं स्वेच्छा प्रकृति नाचवी । प्रकृतिविभाग जैं लपवी । तैं पुरुषाची पदवी प्रकट दिसे ॥ १०० ॥ मधील पडदा जैं तोडिती । तैं पुरुष ना प्रकृती । तेव्हां प्रकटे निजात्मस्थिती । स्त्रीपुरुषव्यक्ति समूळ मिथ्या ॥ १ ॥ ऐशी मिथ्या मायिक प्रकृती । तीपासाव गुणोत्पत्ती । गुणास्तव संसारस्थिती । स्वयें श्रीपति सांगत ॥ २ ॥

तमो रजः सत्त्वमिति प्रकृतेरभवन्गुणाः । मया प्रक्षोभ्यमाणायाः पुरुषानुमतेन च ॥ ५ ॥

प्रकृति गुणमयी पूर्ण । ते लाहोनि पुरुषईक्षण । प्रकट करी तिन्ही गुण । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३ ॥ जेवीं सूर्यावलोकनमेळीं । कळी विकासे कमळदळीं । ते वेगळवेगळी पांकोळी । होती मूळीं कळिकेमाजीं ॥ ४ ॥ तेवीं पुरुषाच्या ईक्षणीं । गुणमयी झाली गुर्विणी । ते तमरजसत्त्वगुणी । प्रसवली तिनी गुणांतें ॥ ५ ॥ जेवीं जळें बीज क्षोभूनि । दोनी दळें उलवूनी । डिरू निघाला त्यांतूनी । तरतरूनी तिवणा पैं ॥ ६ ॥ तेवीं परमात्मा मी आपण । पुरुषत्वातें पावोनि जाण । प्रकृति क्षोभवूनि पूर्ण । तिनी गुण प्रकटविले ॥ ७ ॥ जेवीं कां सूर्याचे किरणीं । सूर्यकांतीं पडे अग्नी । तेवीं पुरुषें प्रकृति भोगुनी । गुण तिनी ते प्रसवे ॥ ८ ॥

त्या दोन विभागांतील प्रकृतीचा भाग विकारी आहे व पुरुष अविकारी आहे, असें स्वतः श्रीहरि सांगत आहे. ९६ तो पुरुष स्वतःच आपली स्त्री होतो व स्वतःच तिचा पति होतो. अशा एकत्वांत दोन भाग दाखवून भिन्न विभागानें शिव-शक्ति झालीं आहेत. ९७ आपल्या एकाच देहाचा एक उजवा भाग व एक डावा भाग जसा असतो, त्याप्रमाणें हा प्रकृति-पुरुषविभाग मायिक समजावा. ९८ अर्धनारी-नटेश्वरांत जसा जो पुरुष तोच स्त्री, तसाच प्रकृति-पुरुषांचा एका शरीरांत ऐक्यभाव आहे. ९९ पुरुषाचा विभाग लपविला असतां, प्रकृति स्वेच्छेनें नाचत असते आणि प्रकृति लपविली असतां पुरुषाची योग्यता व्यक्त होते. १०० स्त्री व पुरुष हा भिन्नभावाचा मधला पडदा दूर केला कीं, पुरुष व प्रकृति हीं दोन्हीं नसून केवल आत्मस्थिति प्रकट होतें व स्त्री, पुरुष या व्यक्ति समूळ मिथ्याच भासतात. १ अशा मिथ्या काल्पनिक मायेपासून गुण उद्भवतात व त्या गुणांमुळें संसार उद्भवतो. त्याविषयींच श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. १०२.

मया पुरुषानुमतेन च प्रक्षोभ्यमाणायाः प्रकृतेः तमः रजः सत्त्वं इति गुणाः अभवन्—मज परमेश्वराकडून व पुरुषाच्या अनुमतानें अत्यंत क्षुब्ध केल्या जाणाऱ्या प्रकृतीपासून तम, रज व सत्त्व हे गुण अभिव्यक्त झाले. [पण तुज परमेश्वराचा व पुरुषाचा काय संबंध ! उत्तर- सृष्टि जीवांच्या अदृष्टामुळें होत असल्यामुळें तिला पुरुषानुमतत्व आहे किंवा परमेश्वराचीच ईक्षणरूप जी पुरुषावस्था तदनुमतानें म्ह० तिच्या द्वारां असा याचा भावार्थ.] ५.

पूर्ण प्रकृति गुणमयी आहे. ती पुरुषाच्या ईक्षणास प्राप्त होऊन तीन्ही गुण व्यक्त करिते. श्रीहरि त्याचेंच निरूपण करीत आहे. ३ सूर्याची किरणरूपी दृष्टि पडतांच कमलाची कळी विकास पावते; पण तिच्या निरनिराळ्या पाकळ्या तिच्यांतच जशा असतात, ४ त्याप्रमाणें पुरुषाच्या केवल ईक्षणानें प्रकृति गुणयुक्त होते व तिच्यापासून सत्त्व-रज-तम या तीन गुणांची उत्पत्ति होते. ५ पाण्यांत पडलेलें बीज जसें फुगतें व त्याचीं दोन दळें उघडून त्यांतून तीन पानांचा अंकुर फुटतो. ६ त्याप्रमाणें मी परमात्मा पुरुषत्वाला प्राप्त होऊन प्रकृतीचा क्षोभ करून तिच्यापासून तीन गुणांना प्रकट करवितों. ७ सूर्यकांत मण्यावर सूर्याचे किरण पडतांच जसा अग्नि उत्पन्न होतो, त्याप्रमाणें प्रकृति-पुरुषसंयोगापासून तीन गुण उपजतात. १०८.

तेभ्यः समभवत्सूत्रं महान् सूत्रेण संयुतः । ततो विकुर्वतो जातोऽहङ्कारो यो विमोहनः ॥ ६ ॥

ते तिनी गुण भिन्नभिन्न । भिन्नपणें वाढी समान । त्या नांव सूत्र प्रधान । क्रियाशक्ति जाण या नांव ॥ ९ ॥ क्रियाशक्तीस जडपण । तेथ चेतनात्मक उपजे ज्ञान । तेंचि महत्तत्त्व नांव जाण । भिन्नाभिधान या हेतू ॥ ११० ॥ महत्तत्त्व आणि प्रधान । दोहींचें रूप एकचि जाण । तेथ क्रिया आणि स्फुरे ज्ञान । यालागीं नांव भिन्न दोहींचें ॥ ११ ॥ क्रियायुक्त जें स्फुरे ज्ञान । तेथ चेतवे अभिमान । त्रिगुणीं अहंकार पूर्ण । ते ठायीं जाण उठावे ॥ १२ ॥ अहं खवळल्या दारुण । शिवासी विसरवी शिवपण । देहात्मवादें भुलवी पूर्ण । जन्ममरण भोगवी ॥ १३ ॥ त्या अहंकाराची मोहक शक्ती । भवभ्रमें पाडी भ्रांती । अहंकाराची विकार उत्पत्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ १४ ॥

वैकारिकस्तैजसश्च तामसश्चेत्यहं त्रिवृत् । तन्मात्रेन्द्रियमनसां कारणं चिदचिन्मयः ॥ ७ ॥

तेभ्यः सूत्रं समभवत्—त्या त्रिगुणांपासून सूत्र म्ह० क्रियाशक्तिमान् प्रथम विकार झाला. ततः महान्—त्यापासून ज्ञानशक्ति झाली. (अहोपण, महान् हाच प्रथम विकार प्रसिद्ध आहे, अशी आशंका घेऊन भगवान् म्हणातात—)सूत्रेण संयुतः—तो महान् ज्ञान व क्रिया यांनीं युक्त असल्यामुळें सूत्रानें युक्त आहे. [त्याहून पृथक् नाहीं. एकच तत्त्व क्रियाशक्ति व ज्ञानशक्ति यांच्या योगानें द्विधा सांगितलें जातें.] विकुर्वतः ततः—विकार पावणाऱ्या त्याच्यापासून यः विमोहनः अहंकारः सः जातः जो जीवाला भ्रम पाडणारा अहंकार, तो उत्पन्न झाला. ६.

ते तीन्ही गुण भिन्न भिन्न आहेत व ते भिन्नत्वानें सारखेच वाढत असतात. त्यालाच सूत्र, प्रधान व क्रियाशक्ति हीं नांवें आहेत. ९ क्रियाशक्तींत जडपणा आहे; परंतु त्यांत चेतनात्मक ज्ञान उत्पन्न होतें. यालाच महत्तत्त्व म्हणतात. त्याला निराळें नांव देण्याचें कारणहि हेंच आहे. ११० महत्तत्त्व व प्रधान या दोहोंचें स्वरूप सारखेंच आहे. पण सूत्रात्मा क्रियाशक्तिमान् आहे व महत्तत्त्व ज्ञानशक्तिमान् आहे. म्हणून या दोहोंचीं नांवें भिन्न आहेत. ११ क्रियायुक्त जें ज्ञान स्फुरतें, तेथें अभिमान उपजतो आणि तीन गुणांमध्यें पूर्ण अहंकार उत्पन्न होतो. १२ अहंकार अतिशय खवळला म्हणजे शिवाला त्याच्या शिवपणाचा विसर पडतो व देहात्मवादानें म्ह० ' देह हाच आत्मा ' या भावनेनें पूर्णपणें भ्रांत होतो. त्यामुळें त्याला जन्म-मरण भोगावें लागतें. १३ त्या अहंकाराची मोहक शक्ति संसारभ्रमानें भ्रांतींत टाकिते. अहंकारापासून उत्पन्न होणाऱ्या विकारांचा प्रकार आतां श्रीहरि स्वतः सांगत आहे. ११४.

वैकारिकः तैजसः च तामसः इति अहं त्रिवृत्—सात्त्विक, राजस व तामस असा अहंकार तीन प्रकारचा आहे. कारण, **तन्मात्रेन्द्रियमनसां कारणं**-तो भूत-तन्मात्रें, इंद्रियें व मन यांचें कारण आहे. [येथें मनः-शब्दानें देवतांचेंहि ग्रहण करावें.] **चिदचिन्मयः**-तो चिद्रूप व अचिद्रूप आहे. [चिदाभासानें व्याप्त असल्यामुळें तो उभयग्रंथिरूप आहे, असें म्हणून त्याचें जीवोपाधित्व दर्शविलें आहे. तैत्तिरीयांत या ब्रह्मरूप आत्म्यापासून आकाशादिभूतें उत्पन्न झालीं असें म्हटलें आहे. (तै. भा. २-१ पृ. ९८) छान्दोग्यांत मन अन्नमय आहे, असें म्हटलें आहे. त्यावरून अपंचीकृत पंचभूतें होतात व त्यांपासून प्राणादि क्रमानें समष्टिरूप लिंगशरीर व पंचीकृत भूतांपासून ब्रह्माण्ड होतें. त्या ब्रह्माण्डांत वैराज, त्याचा अंतर्यामी, लीलाविग्रही, क्षीराब्धिशायी श्रीनारायण, त्याच्या नाभिकमलामध्यें वैराजाचें चतुर्मुख भोगशरीर, त्याच्यापासून यथावसर अन्य जीवांचा आविर्भाव होतो, अशी प्रक्रिया जरी सांगितली आहे, तरी चित्ताची अभिव्यक्ति झाल्यावर अहंकार होतो व त्यानंतर भूत-इंद्रियें इत्यादिकांचा व्यवहार होतो एवढ्याच अभिप्रायानें महदादि क्रमानें येथें सृष्टि सांगितली आहे. गौडपादाचार्यांनीं आपल्या कारिकांत ' मृत्तिका, लोह, किटाळें इत्यादि दृष्टान्तांनीं जी निरनिराळी सृष्टि सांगितली आहे, तो अधिकाऱ्याला आत्मज्ञानामध्यें प्रवृत्त करण्याचा उपाय आहे. आत्मतत्त्वामध्यें भेद कोणत्याच प्रकारें नाहीं ' असें स्पष्ट म्हटलें आहे. मां. भा. ३-१५ पृ. १७०] ७.

अहंकार अतिदुर्धर । गुणानुसारें त्रिप्रकार । गुण अहंता दृढ संसार । गुणविकार तो ऐसा ॥१५॥ प्रथम अहंभावो सात्त्विक । झाला अंतःकरणद्योतक । तोचि देवताविकारजनक । यालागीं वैकारिक बोलिजे त्यासी ॥ १६ ॥ अहंकार जो राजस्‌ । तो ज्ञानकर्मेंद्रियप्रकाश्‌ । वांछी रजतेजाविलास्‌ । यालागीं तैजस्‌ बोलिजे ॥ १७ ॥ तामसाहंकाराची सिद्धी । सूक्ष्म भूतांतें उत्पादी । यालागीं म्हणिजे तो भूतादी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ १८ ॥ नवल अहंकाराची थोरी । सचेतना अचेतन नोवरी । स्वयें लग्न लावी प्रीतीवरी । चिदचिद्‌ग्रंथी पुरी पाडूनी ॥ १९ ॥ चिन्मात्रस्वरूपता जीवासी । लग्न लावी जड देहेंसी । 'ओं पुण्या' एकात्मतेसी । कर्ता ज्योतिषी अभिमान ॥ १२० ॥ जीव ज्ञानस्वरूप चोखडा तो करूनि जड मूढ वेडा । दृढ घाली हाडांचे खोडां । तो हा धडफुडा अहंकारू ॥ २१ ॥ तोचि सात्त्विक आणि राजस । होऊनि तिसरा तामस । त्रिविध विकारीं बहुवस । वाढवी असोस संसारू ॥२२॥

अर्थस्तन्मात्रिकाज्जज्ञे तामसादिन्द्रियाणि च। तैजसाद्देवता आसन्नेकादश च वैकृतात्‌ ॥ ८ ॥

विषय तेचि महाभूतें । तामस प्रसवला अपंचीकृतें । विषयास्तव प्रकटती भूतें । ऐक तूतें सांगेन ॥ २३ ॥ शब्दापासाव नभ उद्भवत । स्पर्शापासाव मारुत । रूपापासाव तेज होत । रसास्तव येथ आप उपजे ॥ २४ ॥ गंधापासोनि पृथ्वी कठिण । उपजली आपीं आपण । येरयेरांचें अनुस्यूतपण । सर्वथा जाण मोडेना ॥ २५ ॥ शब्द निःशब्दीं जन्मला । तो आकाशातें प्रसवला । आकाशीं सूक्ष्म स्पर्श झाला । तो स्पर्श व्याला मारुत ॥ २६ ॥ जन्मल्या मारुताआंत । शब्द स्पर्श दोनी नांदत । मारुत रूपातें

अहंकार अति दुर्धर आहे. तोहि गुणानुसार तीन प्रकारचा होतो. गुणाहंकार हाच दृढ संसार आहे. गुणांचा विकार असा असतो. १५ पहिल्यानें सात्त्विक अहंकार उद्भवतो. तो अंतःकरणाला प्रकाशित करून देवतांचे विकार उत्पन्न करितो. म्हणून त्याला वैकारिक म्हटलें आहे. १६ राजस अहंकार ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें यांना प्रकाशित करितो. त्याला राजस तेजाचे विलास आवडतात, म्हणून त्याला तैजस म्हणतात. १७ तामस अहंकार सूक्ष्म भूतांना उत्पन्न करितो, म्हणून त्याला भूतादि म्हणतात. १८ उद्धवा! अहंकाराचा प्रभाव फार विलक्षण आहे. तो सचेतनाला अचेतन वधू बनवितो आणि ज्ञान-अज्ञानाची पक्की गांठ मारून मोठ्या प्रेमानें स्वतःचें लग्न तिच्याशीं लावितो. १९ तो ज्ञानरूप जीवांचें जड देहाबरोबर लग्न लावून देतो. 'ॐ पुण्याहं' हा मंत्र म्हणून त्यांचें ऐक्य करणारा अहंकारच ज्योतिषी होय. १२० जीव शुद्ध ज्ञानस्वरूप असून त्याला हा खटाटोपी अहंकार जड, मूढ व वेडा करून हाडांच्या बेडीनें जखडून टाकितो. २१ तोच अहंकार सात्त्विक, राजस व तामस या तीन प्रकारांनीं जिकडे-तिकडे पसरून अनिवार संसार वाढवितो. १२२.

—त्या त्रिविध अहंकारापासून तीन प्रकारच्या प्रपंचाची उत्पत्ति दाखवितात—

तन्मात्रिकात्‌ तामसात्‌ अर्थः जज्ञे—शब्दादि तन्मात्रांचें कारण असा जो तामस अहंकार त्याच्या द्वारां महाभूतरूप विषय झाला. (कारण भूतांना आवरणस्वभावत्व आहे.) तैजसात्‌ इंद्रियाणि च—तैजस म्ह० राजस अहंकारापासून दहा इंद्रियें झालीं. कारण त्यांना प्रवृत्तिस्वभावत्व आहे. वैकृतात्‌ च एकादश देवताः आसन्—आणि सात्त्विक अहंकारापासून दहा इंद्रियांच्या दहा व मनाची एक अशा अकरा देवता झाल्या. [कारण त्यांना प्रकाशस्वभावत्व आहे. दिक्‌, वायु, सूर्य, वरुण, अश्विनीकुमार, अग्नि, इंद्र, उपेंद्र, मित्र व चंद्र या देवता.] ८.

विषय हींच महाभूतें होत. तामस अहंकारापासून हीं अपंचीकृत महाभूतें म्ह० परस्परांचें मिश्रण व झालेलीं पंचमहाभूतें विषयांसाठीं उत्पन्न होतात. (पंचीकृताचा सविस्तर प्रकार सु. पं. १–२७ पृ. १७ पहा.) त्या विषयांपासूनच भूतें कशीं उत्पन्न होतात, तेंच मी तुला सांगतों, ऐक. २३ शब्दापासून आकाश, स्पर्शापासून वायु, रूपापासून तेज, रसापासून जल २४ व गंधापासून कठिण पृथ्वी जलामध्यें उत्पन्न होते, तथापि या भूतांचा परस्पर संबंध सर्वथा मोडत नाहीं. २५ निःशब्दापासून शब्द व्यक्त झाला व त्यानें आकाश झालें. त्या आकाशांत सूक्ष्म स्पर्श उत्पन्न झाला. तोच वायु होय. २६ वायूमध्यें शब्द व स्पर्श हीं दोन्हीं रहातात. वायूपासून रूप उद्भवतें व

प्रसवत । त्या रूपांत तेज जन्मलें ।। २७ ।। त्या जन्मल्या तेजाआंत । शब्द स्पर्श रूप नांदत । रूप रसातें प्रसवत । आप रसांत जन्मलें ।। २८ ।। जन्मले आपीं समरस । शब्द स्पर्श रूप रस । नांदताती सावकाश । विषयीं विषयांस प्रवेशू ।। २९ ।। आपामाजीं जन्मे गंध । गंधापासाव पृथ्वी शुद्ध । शब्द स्पर्श रूप रस गंध । पृथ्वी पंचविध विषययुक्त ।। १३० ।। विषययुक्त अपंचीकृतें । पूर्वीं लीन होतीं समस्तें । तींचि स्थूळावलीं येथें । महाभूतें प्रसिद्ध ।। ३१ ।। ज्ञान कर्म उभयपंचक । श्रोत्रादि इंद्रियदशक । राजसापासोनि देख । स्वाभाविक जन्मलीं ।। ३२ ।। सत्त्वअहंतेचा विकार । चित्तचतुष्टय चमत्कार । मन बुद्धि चित्त अहंकार । अकराहि सुर इंद्रियाधिप ।। ३३ ।। महाभूतें अतिजडें देख । इंद्रियें तेथें प्रवर्तक । अंतःकरणचाळक । देव प्रकाशक कर्मांचे ।। ३४ ।। त्रिविध अहंकारवृत्ती । गुणक्षोभें क्षोभक शक्ती । यापरी झाली उत्पत्ति । ब्रह्मांडस्थितीलागुनी ।। ३५ ।।

मया संचोदिता भावाः सर्वे संहत्यकारिणः । अण्डमुत्पादयामासुर्ममायतनमुत्तमम् ।। ९ ।।

भूतां परस्परें वैर देख । पृथ्वीतें गिळूं धांवे उदक । उदकातें आवश्यक । तेज देख निर्दळी ।। ३६ ।। तेजातें ग्राशी पवन । पवनातें ग्रासी गगन । एवं भूतांसी सौजन्य । सर्वथा जाण असेना ।। ३७ ।। तेथ अंतर्यामिरूपें मी जाण । स्वयें प्रवेशोनि आपण । भूतें मिळवूनि पूर्ण । करी संरक्षण मर्यादा ।। ३८ ।। माझे मर्यादेची रेखा । पृथ्वी न विरवी उदका । उदकातें तेज देखा । न लववी नखा शोषाचे ।। ३९ ।। तेजातें न ग्राशी पवन । वायु स्वेच्छा विचरतां जाण । सर्वथा ग्रासीना गगन । गतिबंधन करीना ।। १४० ।। यापरी हीं महाभूतें । एकवटूनि समस्तें । सृजिलें ब्रह्मांडातें । मज

त्या रूपांतून तेज उदय पावतें. २७ त्या तेजामध्यें शब्द, स्पर्श व रूपहीं तीन्हीं रहतात. त्या तेजापासून रस निर्माण होतो. रसापासून जल होतें. २८ त्या जलांत शब्द, स्पर्श, रूप, रस हीं रहातात. त्याचप्रमाणें विषयांत विषय मिसळतात. २९ जलापासून गंध उत्पन्न होतो. त्या गंधापासून ही शुद्ध पृथ्वी उपजते. ती शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या पांच विषयांनीं युक्त होते. १३० अशीं हीं सर्व अपंचीकृत विषययुक्त भूतें सूक्ष्मरूपानें पूर्वीं लीन होतीं, तीं स्थूलरूपानें पंचमहाभूतें या नांवांनीं प्रसिद्ध झालीं. ३१ राजस अहंकारापासून पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें अशीं हीं चक्षु-श्रोत्रादि दहा इंद्रियें स्वभावतःच उत्पन्न होतात. ३२ सात्त्विक अहंकाराच्या विकारांपासून मन, बुद्धि, चित्त व अहंकार हें चित्तचतुष्टय उद्भवतें. प्रजापति, इंद्र, विष्णु, मित्र, चंद्र, सूर्य, दिशा, वरुण, अश्विनीकुमार व मन या इंद्रियांच्या अकरा अधिष्ठात्री देवता आहेत. ३३ वस्तुतः महाभूतें जड आहेत; पण इंद्रियें त्यांचीं प्रवर्तक आहेत. अंतःकरण तीन गुणांच्या क्षोभानें चालक आहे व देवता कर्मांच्या प्रकाशक आहेत. ३४ तीन प्रकारच्या अहंकारवृत्ति गुणक्षोभानें क्षोभक शक्ति होतात. याप्रमाणें ब्रह्माण्डाची उत्पत्ति झाली आहे. १३५.

मया संचोदिताः सर्वे संहत्यकारिणः भावाः मम उत्तमं आयतनं अण्डं उत्पादयामासुः—माझ्याकडून प्रेरित झालेले व सर्वहि परस्पर एकरूप होऊन कार्य करणारे हे पदार्थ वैराजाचा अंतर्यामी जो मी त्या माझें उत्तम आयतन असें जें ब्रह्माण्ड त्याला उत्पन्न करिते झाले. ९.

भूतांचें परस्परांशीं वैरच असतें. जल पृथ्वीला बुडविण्यास धांवत असतें. तेज जलाचा नाश करीत असतें. ३६ वायु तेजाला शोधून घेत असतो. वायूला आकाश ग्रासून टाकितें. याप्रमाणें भूतांमध्यें परस्परांविषयीं स्नेहभाव मुळींच नसतो. ३७ त्यांत मी अंतःकरणरूपानें प्रवेश करून सगळीं भूतें एकत्र करून त्यांच्या मर्यादेचें रक्षण करितों. ३८ माझ्या मर्यादेची रेषा ओलांडून जल पृथ्वीला बुडवून टाकीत नाहीं. तेज जलाला शोषणारें असूनहि तें त्याला बोटहि लावूं शकत नाहीं. ३९ वायु तेजाला ग्रासीत नाहीं व स्वेच्छेनें वाहणाऱ्या वायूच्या गतीला आकाश प्रतिबंध करीत नाहीं. १४० याप्रमाणें हीं सर्व महाभूतें एकत्र होऊन त्यांनीं मज महापुरुषाला रहाण्यासाठीं ब्रह्माण्ड निर्माण

महापुरुषातें वस्तीशीं ॥ ४१ ॥ सप्तावरणेंसी प्रचंड । आवो साधूनि उदंड । निर्माण केलें ब्रह्मांड । मयूरांड आकारें ॥ ४२ ॥

तस्मिन्नहं समभवमण्डे सलिलसंस्थितौ । मम नाभ्यामभूत्पद्मं विश्वाख्यं तत्र चात्मभूः ॥ १० ॥

असें ब्रह्मांड जें विद्यमान । त्यामाजीं मी नारायण । लीलाविग्रही झालों जाण । आपण्या आपण विश्वात्मा ॥ ४३ ॥ त्या माझे नाभीसी नाभिपद्म । विकासलें विश्वधाम । त्याहीमाजीं उत्तमोत्तम । आत्मभू नाम जन्मला ब्रह्मा ॥ ४४ ॥ नाहीं योनिद्वारा उदरगर्भू । मज आत्म्यापासूनि स्वयंभू । उपजला यालागीं आत्मभू । नामाचा शोभू ब्रह्मयासी ॥ ४५ ॥ ब्रह्मांड तो विराटदेहो । त्याचा मुख्य भाग विग्रहो । माझे नाभिकमळीं पहा हो । ब्रह्मदेवो जन्मला ॥ ४६ ॥ करावया लोकसर्जन । पद्मनाभाचे नाभीसी जाण । स्वयें जन्मला चतुरानन । रजोगुणप्राधान्यें ॥ ४७ ॥

सोऽसृजत्तपसा युक्तो रजसा मदनुग्रहात् । लोकान् सपालान् विश्वात्मा भूर्भुवःस्वरिति त्रिधा ॥ ११ ॥

ब्रह्मा रजोगुणप्रधान । नाभिकमळीं बैसोनि जाण । मी जन्ममूळ जो नारायण । त्यासी तो आपण देखेना ॥ ४८ ॥ स्वयें बैसल्या कमळासी । कमळमूळ न कळे त्यासी । देखे एकार्णव जळासी । रजोगुणेंसीं मोहित ॥ ४९ ॥ ते कमळमूळ पहावया बुडीं । एकार्णवीं घालोनि उडी । बुडतां दिवसांचिया कोडी । त्या मूळाची जोडी न लभेचि ब्रह्मा ॥ १५० ॥ तेथ निबुजला जळभयें । बाहेरी उसासे लवलाहें कमळावरी बैसोनि पाहें । करावें काये स्मरेना ॥ ५१ ॥ धांव पाव गा अच्युता । निवारीं माझी जगदंधता । तुजवांचूनि सर्वथा । संरक्षिता मज नाहीं ॥ ५२ ॥ ब्रह्मा माझें पोटींचें बाळ । रजें रजांध झालें

केलें. ४१ त्यानीं प्रचंड सात आवरणांसह विस्तृत जागा व्यापून मोराच्या अंड्याच्या आकाराचें हें ब्रह्माण्ड रचिलें आहे. १४२.

सलिलसंस्थितौ तस्मिन् अण्डे अहं समभवं—जलामध्यें ज्याची संस्थिति आहे अशा त्या ब्रह्माण्डामध्यें मी श्रीनारायणरूप लीलाविग्रहानें स्थित झालों. मम नाभ्यां विश्वाख्यं पद्मं अभूत्—माझ्या नाभीमध्यें लोककारणभूत कमल उत्पन्न झालें. तत्र च आत्मभूः—आणि त्या कमलामध्यें चतुर्मुखरूप भोगशरीरानें वैराज अभिव्यक्त झाला. १०.

अशा विद्यमान असलेल्या ब्रह्माण्डांत मीं विश्वात्मा नारायणानें आपण होऊन लीलाशरीर धारण केलें. ४३ त्या माझ्या नाभींतून विश्वाला आधारभूत असलेलें असें नाभिकमल विकास पावलें. त्यांतून उत्तमोत्तम स्वयंभू ब्रह्मदेव जन्मला. ४४ तो योनिद्वारां उदरांत गर्भ राहून जन्मला नाहीं. मज आत्म्यापासून स्वभावतःच उपजला, म्हणून त्याला 'आत्मभू किंवा स्वयंभू' असें भूषणावह यथार्थ नांव दिलें आहे. ४५ ब्रह्माण्ड हाच विराट् देह. तोच त्याचा शरीररूप मुख्य भाग आहे, याप्रमाणें माझ्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव जन्मला. ४६ लोकांची उत्पत्ति करण्यासाठीं मज पद्मनाभाच्या नाभिकमलामधून रजोगुणप्राधान्यानें चतुर्मुख ब्रह्मदेव स्वतःच उत्पन्न झाला. १४७.

रजसा युक्तः सः विश्वात्मा मदनुग्रहात् तपसा भूः भुवः स्वर् इति त्रिधा सपालान् लोकान् असृजत्-रजोगुणानें युक्त असलेला तो विश्वात्मा माझ्या अनुग्रहानें तपोबलानें अतलादि पातालासह भूलोक, अंतरिक्षलोक व महर्लोकादिकांसह स्वर्लोक असे तीन प्रकारचे लोक त्यांच्या पालकांसह उत्पन्न करिता झाला. ११.

अशा प्रकारें रजोगुणप्रधान ब्रह्मदेव माझ्या नाभिकमलांत बसून मी जो त्याच्या जन्माचें मूळ नारायण त्याला पाहीनासा झाला ४८ तो स्वतः कमलांत बसल्यामुळें कमलाचा देंठ त्याला दिसेना. रजोगुणानें मोहित होऊन तो सर्वत्र एकरूप जलच पाहूं लागला. ४९ त्या कमलाचा देंठ पहाण्यासाठीं त्यानें समुद्रांत उडी टाकिली. असंख्य दिवस बुड्या मारूनहि त्या ब्रह्मदेवाला कमलदेंठ सांपडला नाहीं. १५० त्या जलाच्या लाटांत तो घाबरला. बाहेर येऊन कमलावर बसून उसासे टाकूं लागला. काय करावें हें त्याला सुचेना. ५१ त्यानें 'धांव पाव बाबा अच्युता ! माझें हें जगाविषयींचें अंधत्व घालीव. तुझ्यावांचून माझें रक्षण करणारा दुसरा कोणी नाहीं.' अशी प्रार्थना केली.

केवळ । धरोनि ठेला नाभिकमळ । कृपा तत्काळ मज आली ॥ ५३ ॥ मज विश्वात्म्याचें अपत्य । जडत्वें राहिला तटस्थ । म्यां उपदेशिला तेथ । सृष्टिसर्जनार्थ तपोनिष्ठा ॥ ५४ ॥ महाकल्पादींचे मांडणी । माझिया अशरीरी वाणी । तप तप या दों वचनीं । उपदेशिला अग्रगणी चतुरानन ॥ ५५ ॥ यथोक्त तप करितां जाण । वृद्धि पावला सत्त्वगुण । त्याचिया सात्त्विकता पूर्ण । प्रत्यक्ष नारायण मी झालों ॥५६॥ काळत्रयीं अबाधित । तूंचि विश्वात्मा निश्चित । हें चतुःश्लोकी भागवत । म्यां त्यासी तेथ उपदेशिलें ॥ ५७ ॥ माझिया उपदेशविधीं । होऊनियां समबुद्धी । कल्पकल्पांचिये अवधी । मोह त्रिशुद्धी बाधीना ॥ ५८ ॥ यापरी ब्रह्मा कल्पादी । पावला परम समाधी । प्रकटोनि निजात्मबुद्धी । सर्जनसिद्धी तेणें केली ॥ ५९ ॥ सुरासुर मानव पन्नग । यांचे वसते तिन्ही लोक । सप्ततळ घरें देख । गोपुरें अलोलिक सप्तसंख्या ॥ १६० ॥ भूशब्दें पाताळलोक । भुवःशब्दें मृत्युलोक । स्वःशब्दें स्वर्गलोक । त्रिलोक देख या नांव ॥ ६१ ॥ चतुर्दश भुवनें सकळ । तेथ वसते लोकपाळ । तेंचि करोनियां विवळ । सांगे प्रांजळ श्रीकृष्ण ॥ ६२ ॥

देवानामोक आसीत्स्वर्भूतानां च भुवः पदम् । मर्त्यादीनां भूर्लोकः सिद्धानां च त्रितयात्परम् ॥ १२ ॥
अधोऽसुराणां नागानां भूमेरोकोऽसृजत्प्रभुः । त्रिलोक्या गतयः सर्वाः कर्मणां त्रिगुणात्मनाम् ॥ १३ ॥

मागील श्लोकाचे अंतीं । भूर्भुवःस्वर इति । यापरी त्रिलोकीं श्रीपती । जाण निश्चितीं बोलिला ॥ ६३ ॥ तेवीं पुढील श्लोकार्था । पाताळलोक होय चौथा । तो मृत्युलोक एकात्मता । जाण तत्त्वतां व्याख्यान ॥ ६४ ॥ इंद्रादि सकळ देवांसी । स्वर्ग निजमंदिर त्यांसी । यक्षरक्षभूतगंधर्वांसी । निवा-

---

५२ ब्रह्मदेव माझ्याच पोटचें मूल. तो केवल रजोगुणामुळें आंधळा झाला व नाभिकमलाला धरून बसला. तव्हां मला तत्काल त्याची दया आली. ५३ मज विश्वात्म्याचाच तो पुत्र; पण केवल जडत्वामुळें तटस्थ होऊन राहिला. त्या वेळीं मीं त्या तपोनिष्ठाला सृष्टीच्या उत्पत्तीसाठीं उपदेश केला. ५४ महाकल्पादिकांच्या आरंभीं मीं आपल्या आकाशवाणीनें 'तप तप' या दोन शब्दांनीं श्रेष्ठ ब्रह्मदेवाला उपदेश केला. ५५ माझ्या सांगण्याप्रमाणें तप आचरिलें असतां त्याचा सत्त्वगुण वाढला व त्याच्या पूर्ण सात्त्विक गुणामुळें मी नारायण प्रत्यक्ष झालों. ५६ 'त्रिकालाबाधित तूंच विश्वात्मा आहेस' या चतुःश्लोकी भागवताचा मीं त्याला उपदेश केला. ५७ माझ्या उपदेशानुसार त्याची बुद्धि सम झाली व आतां कल्पाचे कल्प लोटले, तरी त्याला मोह कसा तो स्पर्श करीत नाहीं. ५८ याप्रमाणें कल्पाच्या आरंभीं ब्रह्मदेवानें परम समाधीनें आत्मज्ञान मिळविलें व त्यानें सृष्टीच्या उत्पत्तीचें कार्य केलें. ५९ देव, राक्षस, मनुष्य, नाग यांच्या वस्तीचे तीन्ही लोक, सप्त पाताळ व सात गोपुरें निर्माण केलीं. १६० भूः म्ह० पाताळ लोक, भुवः म्ह० मृत्युलोक; स्वः म्ह० स्वर्गलोक, यांसच त्रिभुवन म्हणतात. ६१ एकंदर चौदा लोक, तेथें रहाणारे प्राणी व लोकपाल, यांनाच श्रीकृष्ण आतां अधिक स्पष्ट करून सांगत आहे. ४६२.

—या लोकसृष्टीचें प्रयोजन पुढील दीड श्लोकांनीं सांगतात—

देवानां ओकः स्वर आसीत्–देवांचें निवासस्थान स्वर्गलोक झालें. भुवः च भूतानां पदं–आणि अंतरिक्ष हें भूतांचें स्थान आहे, भूर्लोकः च मर्त्यादीनां–भूलोक हे मनुष्य पशु इत्यादिकांचें स्थान झालें. सिद्धानां त्रितयात् परं–सिद्धांचें स्थान या तीन लोकांहून पलीकडे असलेले जे महर्लोकादि तें आहे. प्रभुः असुराणां नागानां च ओकः भूमेः अधः असृजत्–त्या प्रभूनें असुर व नाग यांचें स्थान भूमीच्या खालीं असलेलें जे अतलादि पाताल लोक तें केलें (अशी व्यवस्था करण्याचें कारण पुढील दीड श्लोकांनीं सांगतात—) त्रिगुणात्मनां कर्मणां त्रिलोक्यां सर्वाः गतयः–कारण त्रिगुणात्मक कर्मांच्या सर्व गति पातालादिसहित या तीन लोकांत होतात. १२-१३.

मागील श्लोकाच्या शेवटीं 'भूः, भुवः, स्वर्' हे तीन लोक श्रीकृष्णानें सांगितले. ६३ त्याचप्रमाणें पुढील श्लोकांत चवथा पाताळ लोक सांगितला आहे. त्याचें मृत्युलोकाशीं ऐक्य आहे, याचेंच आतां व्याख्यान ऐक. ६४

सासी अंतरिक्ष ॥ ६५ ॥ जेणें पाविजे निजमोक्षासी । जेथूनि गमन लोकांतरासी । ते कर्मभूमी मनुष्यासी । निजभाग्येंसीं भूर्लोक ॥ ६६ ॥ त्रिलोकीवरतें जाण । सिद्ध वोळंगती आपण । तें सिद्धांचें सिद्धिस्थान । वसतें जाण निरंतर ॥ ६७ ॥ अतळ वितळ सुतळ । रसातळ महातळ । तळातळ आणि पाताळ । अधःसंख्या सकळ पाताळा ॥ ६८ ॥ सप्तपाताळीं अधिकारमेळू । अतळीं वसे मयपुत्र बळू । प्रतापें अतिप्रबळू । दैत्यमेळू समुदाय ॥६९॥ वितळीं वसे हाटकेश्वरू । जो उमाकांत कर्पूरगौरू । जेथिले हाटकनदीचा पूरू । सुवर्णसंभारूप्रवाही ॥ १७० ॥ सुतळीं महावैष्णव बळी । ज्याचा द्वारपाळ वनमाळी । प्रऱ्हादही त्याचजवळीं । वैष्णवकुळीं नांदत ॥ ७१ त्रिपुर भेदूनि शंकरू । रसातळीं स्थापिला मयासुरू । तो मायालाघवी महावीरू । सपरिवारू वसताहे ॥ ७२ ॥ महातळीं कद्रूसुत । जे विषधर क्रोधयुक्त । ते सर्प जाण समस्त । तेथ नांदत निजवासें ॥ ७३ ॥ तळातळीं नांदती दानव । निवातकवची वीर सर्व । फणिमुख्य राजगौरव । रचना अपूर्व ते ठायीं ॥ ७४ ॥ सातवे पाताळीं वसती नाग । शतसहस्र फणिगणभोग । वासुकिप्रमुख अनेग । पद्मिनीभोग भोगिती ॥ ७५ ॥ स्वर्गीं रंभा उर्वशी सुंदरी । कां पाताळीं पद्मिणी नारी । त्यांच्या सौंदर्याची थोरी । लोकांतरीं वाखाणे ॥ ७६ ॥ त्या तळीं तीं शतयोजनांवरी । शेष वसे सहस्रशिरी । जयाच्या निजांगावरी । निद्रा करीं मी भगवंत ॥ ७७ त्याहूनि तळीं आत्यंतिक । अंधतामिस्रादि महानरक । त्याहीतळीं कूर्म देख । आवरणोदक तयातळीं ॥ ७८ ॥ ज्याचा स्वर्गभोग होय क्षीण । अधोभोगाचें उरे पुण्य । तेणें पुण्यानुक्रमें जाण । सप्तपाताळीं जन जन्मती ॥ ७९ ॥ ज्याचे गांठीं पाप चोख । तो भोगी नाना नरक । ऐशी त्रिलोकीं देख । चतुर्मुख स्वयें रची

स्वर्ग हें इंद्रादि सर्व देवांचें रहाण्याचें स्थान आहे. यक्ष, राक्षस, भूतें, गंधर्व हे अंतरिक्षांत रहातात. ६५ ज्या लोकांतून जीवांना मोक्ष प्राप्त होतो व ज्यांतून इतर लोकीं जातां येतें, ती मनुष्यांची कर्मभूमि होय. ती मोठ्या भाग्यवानांस प्राप्त होते. ६६ त्रिभुवनाच्या वर सिद्ध रहातात. तेंच सिद्धांचें नित्य रहाण्याचें सिद्धिस्थान आहे. ६७ अतल, वितल, सुतल, रसातल, महातल, तलातल आणि पाताल हे पृथ्वीच्या खालीं असणारे सात लोक आहेत. ६८ या सप्तपातालांतील अधिकारी कोण कोण आहेत ! (तें सांगतों, ऐक.) अतलांत मयासुराचा पुत्र बळ रहातो. तो महापराक्रमी असून त्याच्यापाशीं असंख्य दैत्यांचा समुदाय आहे. ६९ वितलामध्यें हाटकेश्वर म्ह० कर्पुरगौर उमापति श्रीशंकर रहातो. तेथें हाटकनदी वहात असते. तिच्या प्रवाहांतून सुवर्णाच्या राशी वहात असतात. म्हणून तिला हाटक म्हणतात. (हाटक म्ह० सोनें.) १७० सुतलांत महान् भगवद्भक्त बलि रहातो. तेथें साक्षात श्रीहरि त्याचा द्वारपाल होऊन राहिला आहे व प्रल्हादहि तेथेंच त्या वैष्णवकुलांत रहात असतो. ७१ रसातलांत श्रीशंकरानें त्रिपुराचा संहार करून मयासुराला स्थापन केलें. तो मायालाघवी पराक्रमी वीर आपल्या परिवारासह तेथें रहात आहे. ७२ महातलांत विष धारण करणारे अत्यंत क्रोधयुक्त असे सर्व कद्रुसुत सर्प रहातात. (कद्रु ही दक्षकन्या व कश्यपपत्नी असून ती सर्पांची जननी आहे. म्हणून सर्पांना कद्रुसुत म्हटलें आहे.) ७३ तलातलांमध्यें दानव रहातात. ते प्रल्हादाचा भाऊ जो संऱ्हाद त्याचे पुत्र होत. त्यांना ' निवातकवची वीर ' म्हणतात. त्यांचा पूज्य राजा नाग आहे. त्या लोकाची रचना अपूर्व आहे. ७४ सातव्या पाताल लोकांत नागांची वस्ती आहे. तेथें एक लक्ष नाग असून त्यांचा राजा वासुकि पद्मिनीबरोबर अनेक विलास भोगीत असतो. ७५ स्वर्गांत जशा रंभा, उर्वशी इत्यादि सुंदर स्त्रिया आहेत, तशा पातालांत पद्मिनी नांवाच्या लावण्यवती नागकन्या आहेत. त्यांच्या सौंदर्याची कीर्ति इतर लोकांतून पसरलेली आहे. ७६ या लोकांच्या तीनशें कोस खालीं सहस्रमुखांचा शेष रहातो. त्याच्या अंगावर मी भगवान शयन करितों. ७७ त्याच्या खालीं अंधतामिस्रादि भयंकर महानरक आहेत. त्याच्याहि खालीं कूर्म असून त्याच्या खालीं आवरणोदक आहे. ७८ स्वर्गभोग संपल्यानंतर ज्यांचे अधोभोगांचें पुण्य उरलेलें असतें ते जीव त्या पुण्याच्या क्रमानें सप्तपातालांत जन्म घेतात; ७९ व ज्यांच्या पदरीं केवळ पातकच असतें ते नाना प्रकारच्या नरकयातना भोगितात. त्रिभुवनाची ही रचना

॥ १८० ॥ ज्यांसी निष्कामता नाहीं चित्तीं । जे स्वप्नीं न देखती विरक्ती । त्यांसी त्रिलोकीवरती गती । नाहीं निश्चितीं उद्धवा ॥ ८१ ॥ जे न करितीचि माझी भक्ती । जे नायकतीचि माझी कीर्ती । जे माझें रामनाम नुच्चारिती । भवबंधपंक्तिच्छेदक ॥ ८२ ॥ त्यांसी पुनःपुनः स्वर्गलोक । पुनःपुनः भोगिती नरक । पुनः पातळ मृत्युलोक । नानायोनीं दुःख भोगिती ॥ ८३ ॥ जे त्रिगुणगुणी सदा सकाम । जे सर्वदा करिती सकाम कर्म । त्यांसी त्रैलोक्याबाहेरी निर्गम । त्रिगुणधर्म निघों नेदी ॥ ८४ ॥ सांगितली पाताळविवंचना । आतां ऐक स्वर्गरचना । लोकीं लोकांतरगणना । समूळ जाणां सांगेन ॥ ८५ ॥ रविचंद्रप्रभा जेथवरी । तेथवरी पृथ्वीची थोरी । तळीं पाताळ स्वर्ग वरी । लोकलोकांतरीं निवास ॥ ८६ ॥ पायीं चालिजे तो भूलोक जोडे । येथूनि सूर्याऐलीकडे । भुवर्लोकींची थोरी वाढे । तेथ वस्ती घडे यक्षरक्षगंधर्वां ॥ ८७ ॥ भुवर्लोकाहीवरी । सूर्यलोकाची वाढी थोरी । पृथ्वीपासूनि लक्षावरी । जाण निर्धारीं रविलोक ॥ ८८ ॥ वायूपासूनि चक्राकारीं । रविचंद्रतारालोक कुसरी । खेवणोनियां तयावरी । काळ सूत्रधारी भवंडीत ॥ ८९ ॥ त्या काळाहीवरी माझी सत्ता । माझेनि भेणें काळू तत्त्वतां । क्षणलवनिमिषावस्था । अधिकन्यूनता होऊं नेदी ॥ १९० ॥ नवल काळचक्रगती । मासां रवि चंद्र समान होती । सूर्याआड चंद्राची गती । जाण निश्चितीं दिनद्वयें ॥ ९१ ॥ ते अमावास्याप्रतिपदेसी । चंद्र चंद्रमंडळीं सावकाशीं । सूर्यसमभागें गमन त्यासी । तें या लोकांसी दिसेना ॥ ९२ ॥ इतुक्यासाठीं ते दिवशीं । जीवें जित्या चंद्राशीं । नष्टत्व स्थापिती ज्योतिषी । तें या लोकांसी सत्य माने ॥ ९३ ॥ रवि चंद्र एकासनीं । सर्वथा नव्हती गमनीं । लक्षांतरे वसती दोन्ही । मंडळसमानीं मासांतीं गती ॥ ९४ ॥ रविआड गति ज्या ग्रहासी । त्याचा अस्त सांगे ज्योतिषी । सत्य माने या लोकांसी । तो ग्रहो दृष्टीसी दिसेना ॥ ९५ ॥ दृष्टिसृष्टीचा जो

स्वतः चतुर्मुख ब्रह्मदेवानें केलीं आहे. १८० उद्धवा ! ज्याच्या मनांत निष्कामता नाहीं, विरक्ति ज्यांना स्वप्नींहि ठाऊक नाहीं त्यांना या त्रैलोक्याच्या वर जातां येत नाहीं. ८१ जे माझी भक्ति करीत नाहींत, माझी कीर्ति ऐकत नाहींत. भवबंधाचे फेरे तोडणारें माझें रामनाम उच्चारीत नाहींत ८२ त्यांना पुनः पुनः स्वर्ग, पुनः पुनः नरक व पुनः पुनः पाताळादि मृत्युलोक प्राप्त होतो व अनेक योनींत जन्म घेऊन दुःख भोगावें लागतें. जे या तीन गुणांत गुंतलेले असतात, ते निरंतर सकाम कर्मेंच करीत असतात. त्यांना ते त्रिगुणधर्म त्रिभुवनाच्या बाहेर पडूंच देत नाहींत. ८४ याप्रमाणें पाताळांचा प्रकार स्पष्टपणें सांगितला. आतां स्वर्गाची रचना ऐक. त्याचप्रमाणें इतर लोकांचेंहि सविस्तर वर्णन करितों, तें ऐक. ८५ जेथपर्यंत सूर्य-चंद्रांचा प्रकाश पोंचतो तेथपर्यंतच पृथ्वीचें महत्त्व आहे. खालीं पाताल आणि वर स्वर्ग. यांत सर्व प्रकारचे प्राणी रहातात. ८६ ज्या लोकांत पायीं चालतात तो भूलोक. तेथपासून सूर्याच्या अलीकडे भुवर्लोक पसरलेला आहे. तेथें यक्ष, राक्षस व गंधर्व यांची वस्ती आहे. ८७ भुवर्लोकाच्या वर सूर्य लोकाची हद्द सुरू होते. पृथ्वीपासून लक्षावधि योजनें वर सूर्यलोक आहे, असें समजावें. ८८ काळरूपी सूत्रधार वायूपासून चक्राकार गतीनें सूर्य, चंद्र, तारागण यांस भूषित करून मोठ्या कुशलतेनें फिरवीत असतो. ८९ त्या काळावरहि माझी सत्ता चालते. वास्तविक माझ्या भीतीनें काल एक क्षण-लव-निमिषहि अधिक उणा होऊं देत नाहीं. १९० कालाची गति विलक्षण आहे. एक महिन्यानें चंद्र व सूर्य समरेषेंत येतात. दोन दिवसांनीं चंद्राची गति सूर्याच्या आड येते. ९१ अमावास्या व प्रतिपदा, यांच्या संधींत चंद्र सूर्याच्या मंडलांतून सावकाश जाऊं लागला म्हणजे सूर्य व चंद्र एकत्र येतात. म्हणून चंद्र लोकांना दिसत नाहीं. ९२ यासाठींच ज्योतिषि त्या दिवशीं विद्यमान असलेल्या चंद्राला नष्ट झाला असें म्हणतात व लोक तें खरें मानितात. ९३ सूर्य व चंद्र एकाच जागेवर केव्हांहि येत नाहींत. कारण ते परस्परांपासून लक्षावधि योजनें दूर असतात. परंतु ते दर महिन्याच्या शेवटीं आपल्या कक्षेच्या समान रेषेंत येतात. (म्ह० समोरासमोर असतात.) ९४ जो ग्रह चालला असतां सूर्याच्या आड जातो त्या ग्रहाचा अस्त झाला असें ज्योतिषि म्हणतात. त्या वेळीं तो ग्रह दिसत नाहीं. म्हणून लोक तें म्हणणें खरें समजतात. ९५ दृष्टि-सृष्टीचा जो न्याय म्हणतात तो ज्योतिषशास्त्रांत खरा ठरतो,

न्यावो । ज्योतिषशास्त्रीं सत्य पहा हो । न दिसे त्याचा अस्तभावो । दिसे तो पहा हो पूजिती ।। ९६ ।। अभ्राआड ग्रहण झालें । देखिलें तेथें पर्व फावलें । न दिसे ते देशीं नाहींच झालें । येणें बोलें वर्तती ।। ९७ ।। रविचंद्राहूनि आरती । राहुकेतूंची असे वस्ती । ते जैं मंडळाआड येती । तैं ग्रासिलें म्हणती रविचंद्रा ।। ९८ ।। राहु सूर्या गिळिता साचें । तैं तोंड जळतें राहूचें । मंडळीं मंडळ आड ये त्याचें । हें सर्व ग्रासांचें संमत ।। ९९ ।। सूर्य सूर्यमंडळीं राज्य करी । त्याच्या सर्वग्रासाची थोरी । ज्योतिषी सांगे घरोघरीं । तें देखोनि नरीं महाशब्द कीजे ।।२०० ।। सूर्यसर्वग्रासाचिया गोठी । जगीं एक बोंब उठी । शेखीं रविराहूंसी नाहीं भेटी । स्पर्शही शेवटीं असेना ।। १ ।। ग्रहचक्र वेगें चळतां पाहीं । रविचंद्रादि चालणें नाहीं । ते निश्चळ निजराज्याच्या ठायीं । न चालतां पाहीं चालती ।। २ ।। रविलोकाहूनि वरी । चंद्रलोक लक्षांतरी । चंद्रलोकाहूनि दूरी । लक्षांतरीं तारालोक ।। ३ ।। तारालोकाहूनि वरी । बुधलोक दों लक्षांतरीं । बुधलोकाहूनि वरी । दों लक्षांतरीं शुक्रलोक ।। ४ ।। मिळोनियां दैत्यगण । ज्याच्या चरणां येती शरण । नित्य घालिती लोटांगण । तो शुक्राचार्य जाण दैत्यगुरु ।। ५ ।। शुक्रलोकाहूनि दों लक्षांतरीं । भौमलोक वसे अंबरीं । भौमलोकाहूनि दों लक्षांतरीं । देवगुरु करी निजवास ।। ६ ।। ज्याचे चरण वंदिती देख । इंद्रचंद्रवरुणादि अर्क । नित्य येती आवश्यक । तो बृहस्पतिलोक गुरूचा ।। ७ ।। त्याहीवरी लक्ष दोनी । सूर्यसुत वसे शनी । लक्षांतरें तेथूनी । सप्तऋषिजनीं निवास ।। ८ ।। सप्तऋषींची ऋषिपंक्ती । तेथेंचि वसे अरुंधती । यावरी वसे अमरावती । इंद्रसंपत्तीसमवेत ।। ९ ।। जेथ अंगें वसे इंद्र जाण । ऐरावती आरोहण । पार्षदगण मरुद्गण । सुरसेना जाण जयाची ।। २१० ।। उच्चैश्रवा वारू जाण । कल्पतरूंचें उद्यान । कामधेनूंचें गोधन । नंदनवन क्रीडेसी ।। ११ ।। जेथींच्या पायऱ्या चिंतामणी । रंभा उर्वशी

पहा. जें दिसत नाहीं त्याचा अस्त मानतात व जें दिसतें त्याची पूजा करितात. ९६ ग्रहण असलें व तें अभ्राआड गेलें तर तें कोणीं मानीत नाहींत. जेथें तें दिसतें, तेथले लोक पर्वकाळ मानितात व ज्या देशांत दिसत नाहीं तेथले 'ग्रहण लागलेंच नाहीं,' असें समजतात. ९७ सूर्य-चंद्रांच्या अलीकडे राहु-केतूंची वस्ती आहे. ते जेव्हां सूर्य किंवा चंद्र, यांच्या मंडलाच्या आड येतात, तेव्हां त्यांनीं चंद्र-सूर्याला ग्रासिलें, असें म्हणतात. ९८ राहूनें जर खरेंच सूर्याला ग्राशिलें असतें तर त्याचें मुखच जळालें असतें, तो मंडळाच्या आड येतो, हेंच खग्रास ग्रहणाचें कारण सर्वांना पटतें. ९९ सूर्य आपल्या सूर्यमंडळांत राज्य करीत असतो; परंतु ज्योतिषी घरोघर हिंडून त्याच्या ग्रहणाचें माहात्म्य सांगत सुटतात व तें ग्रहण पहातांच लोक मोठी ओरड करितात. २०० खग्रास ग्रहणाच्या वेळीं जगांत लोक शंखध्वनि करीत बसतात; परंतु वास्तविक पहातां सूर्य व राहु यांची कधीं भेटहि होत नाहीं किंवा ते दोघे परस्परांस स्पर्शहि करीत नाहींत. १ ग्रहमंडळ वेगानें चाललें असतां रवि-चंद्रास गति नसते. ते आपापल्या राज्यांत निश्चल बसलेले असतात. पण ते न चालतांच चालल्याचा भास होतो. २ सूर्यलोकांपासून चंद्रलोक लक्षावधि योजनें दूर आहे. व चंद्रलोकाहून नक्षत्र लोक दूर आहे. नक्षत्र लोकापासून दोन लक्ष योजने वर बुधलोक आहे. बुधाच्या दोन लक्ष योजनांवर शुक्र रहातो. ४ सगळ्या दैत्यांचा समुदाय जमून ज्यास शरण आला तो ज्यास नित्य लोटांगण घालीत असतो तो दैत्यांचा गुरु शुक्राचार्य हाच होय. ५ शुक्रापासुन दोन लक्षांच्या अंतरावर.आकाशांत मंगळाची वस्ती आहे. मंगळापासून दोन लक्षांवर देवांचा गुरु बृहस्पति रहातो. ६ ज्याच्या चरणांना वंदन करण्यास इंद्र-चंद्र-वरुण-सूर्य इत्यादि येतात नित्य त्या गुरूचा बृहस्पतिलोक तेथें आहे. ८ त्याच्याहि वर दोन लक्ष योजनें सूर्याचा पुत्र शनि रहातो. तेथून पुढें एक लक्ष योजनांवर सप्तऋषींचें निवासस्थान आहे. ८ सप्तऋषींच्या मंडळाबरोबरच अरुंधती रहाते. त्याच्यावर सर्व वैभवानें युक्त असलेली इंद्राची अमरावती आहे. तेथें इंद्र स्वतः रहातो, ऐरावतावर बसतो. ९ मरुद्गण त्याचे सभासद असून त्याच्यापाशीं सेना सज्ज असते. २१० उच्चैःश्रवा त्याचा अश्व आहे; तेथें कल्पतरूंचीं उद्यानें आहेत; कामधेनूंचीं खिल्लारें आहेत; नंदनवन क्रीडास्थान आहे. ११ त्याच्या पायऱ्यांवर

विलासिनी । अष्टनायिका नाचणी । ज्याच्या रंगणीं नांदती ॥ १२ ॥ येणें वैभवें अमरावती । इंद्र तेथील अधिपती । येथूनि स्वर्गाची समाप्ती । त्रैलोक्य निश्चितीं या नांव ॥ १३ ॥ आतां त्रैलोक्याबाहेरी । एक लक्ष योजनांवरी । भक्तकृपाळू श्रीहरी । ध्रुवमंडळ करी कृपेनें ॥ १४ ॥ त्रिलोकीं होतां प्रळयकाळ । ध्रुवासी कदा नव्हे चळ । तो सर्वदा अचळ । यालागीं अढळ ध्रुवपद ॥ १५ ॥ पृथ्वीपासोन कोटि योजन । महर्लोक वसे जाण । तेथ वसती कल्पायु जन । तें वसतिस्थान तयांचें ॥ १६ ॥ तेथूनि कोटि योजनें देख । वरुता असे जनोलोक । तेथ वसती सनकादिक । ऊर्ध्वरेते देख महायोगी ॥ १७ ॥ तेथूनि दोन कोटी अधिक । वसताहे तपोलोक । तेथील निवासी आवश्यक । वैराजदेव देख तपस्वी ॥ १८ ॥ तपोलोकाहूनि देख । चौकोटी उंच अधिक । तेथ वसताहे सत्यलोक । तेथील नायक चतुरानन ॥ १९ ॥ तेथ मूर्तिमंत चारी वेद । मूर्तिमंत धर्म प्रसिद्ध । मूर्तिमंत ब्रह्मचर्य शुद्ध । तपही विशद मूर्तिमंत ॥२२०॥ गायत्री मूर्तिमंत तेथ । वाचा मूर्तिमंत वर्तत । दया मूर्तिमंत नांदत । योग मूर्तिमंत ब्रह्मसदनीं ॥२१॥ तेथ अग्नि तिनी मूर्तिमंत । ते एक रूपें त्रिधा भासत । सत्य सत्यलोकीं मूर्तिमंत । असत्य तेथ असेना ॥ २२ ॥ ते लोकीं वसते कोण लोक । जे गायत्रीमंत्रजापक । जे ब्राह्मणतीर्थप्राशक । जे यागउपासक निष्काम ॥ २३ ॥ जे ब्राह्मणकार्यीं निमाले । जे गोसंरक्षणीं जीवें गेले । जे परोपकारार्थ वेंचले । ते पावले सत्यलोक ॥ २४ ॥ जे निष्काम द्विजां भजले । जिहीं निष्काम द्विज पूजिले । जिहीं निष्काम द्विज भोजिले । ते पावले सत्यलोक ॥२५॥ जे कृपाळु दीनार्थ देख । जे कृपाळु बंधमोचक । जे सत्यवादी सात्त्विक । ते सत्यलोकनिवासी ॥ २६ ॥ जे परापवादीं मूक । परदारानपुंसक । जे परद्रव्या पराङ्मुख । ते सत्यलोकनिवासी ॥ २७ ॥ ऐसी सत्य लोकींची स्थिती । तेथींचा ब्रह्मा अधिपती । ब्रह्मसृष्टि याहीवरती । नाहीं निश्चितीं उद्धवा ॥ २८ ॥ ब्रह्मांडाहूनि वेगळा । कैलास निर्माण करी भोळा । वैकुंठ रची घनसांवळा

चिंतामणि जडले आहेत; रंभा, उर्वशी इत्यादि विलासस्त्रिया आहेत व नृत्यांगना अष्टनायिका नित्य तेथें नृत्य करीत असतात. १२ अशा वैभवयुक्त अमरावतीचा इंद्र अधिपति आहे. येथें स्वर्गलोकाची सीमा संपली. यालाच त्रिभुवन म्हणतात. १३ आतां या त्रिभुवनाच्या बाहेर एक लक्ष योजनांच्या अंतरावर भक्तकृपाळु श्रीहरीनें परम कृपेनें ध्रुवमंडळ निर्मिलें आहे. १४ त्रिभुवनांत प्रलय जरी झाला तरी हें ध्रुवमंडळ अचल असतें. म्हणून ध्रुवपद अढळ आहे, असें म्हणतात. १५ पृथ्वीपासून एक कोटि योजनांवर महर्लोक आहे. तेथें एक कल्पपर्यंत जगणारे लोक रहातात. १६ त्याच्यावर एक कोटि योजनें दूर जनोलोक आहे. तेथें जितेंद्रिय महायोगी सनकादिक रहातात. १७ त्याच्यापुढें दोन कोटि योजनांवर तपोलोक आहे. तेथें तपस्वी वैराजदेवांची वस्ती आहे. १८ तपोलोकाच्या वर चार कोटि योजनें, इतक्या अंतरावर सत्यलोक आहे. तेथला स्वामी ब्रह्मदेव आहे. १९ तेथें प्रत्यक्ष चार वेद, साक्षात् धर्म, शुद्ध ब्रह्मचर्य व तप हीं सर्व मूर्तिमंत राहतात. २२० तसेंच गायत्री, वाणी, दया, योग हीं ब्रह्मलोकीं मूर्तिमंत आहेत. २१ एकच असून तीन प्रकारचा भासणारा गार्हपत्य, दक्षिणाग्नि व आहवनीय हे अग्नि व सत्यहि सत्यलोकांत मूर्तिमंत नांदत असतें. तेथें असत्याचें नांवहि नाहीं. २२ तेथें कोणत्या लोकांची वस्ती असते, तें ऐक. गायत्री मंत्राचा जप करणारे, ब्राह्मणांचें तीर्थ घेणारे, निष्काम यज्ञ-याग करणारे, ब्राह्मणांच्या कार्यासाठीं प्राणावर उदार होणारे, गायीच्या संरक्षणासाठीं जीव देणारे; परोपकारार्थ स्वतःला वाहून घेणारे, ब्राह्मणांची निष्काम सेवा करणारे, २३ निष्काम चित्तानें ब्राह्मणाचें पूजन करणारे २४ व निष्काम मनानें ब्राह्मणांना जेऊं घालणारे लोक या सत्यलोकाला प्राप्त होतात २५ गरिबांवर दया करणारे, दुसऱ्याला बंधमुक्त करणारे, सत्यवक्ते, सात्त्विक, २६ दुसऱ्यांच्या दोषांचा उच्चार न करणारे, परस्त्रीचा अभिलाष न धरणारे, परद्रव्याकडे न पहाणारे लोक सत्यलोकांत रहातात. २७ उद्धवा ! अशी सत्यलोकाची स्थिति आहे. ब्रह्मदेव तेथील अधिपति आहे. याच्यावर ब्रह्मदेवाची सृष्टि नाहीं. २८ भोळ्या शंकरानें ब्रह्माण्डाहून भिन्न असा कैलास निर्माण केला आणि सांवळ्या विष्णूनें वैकुंठाची

हे लोक स्वलीळा निर्मित ॥ २९ ॥ होतां ब्रह्मांडा घडमोडी । वैकुंठ कैलास न लगे वाढी । तेथील वस्तीची अभिनव गोडी । हरिहरभक्त फुडी जाणती ॥ २३० ॥ तेथ नाहीं काळाचें गमन । नाहीं कर्माचें कर्मबंधन । तेथ नाहीं जन्ममरण । हें भक्त अनन्य पावती ॥ ३१ ॥ वैकुंठकैलासरचना । सांगतां मन मुके मनपणा । ते लोकींची लोकलक्षणा । ऐक विचक्षणा सांगेन ॥ ३२ ॥ सकळ ब्रह्मांडाबाहेरी । मायाआवरणाभींतरीं । वैकुंठ कैलास हरहरीं । स्वलीलेकरीं निर्मिजे ॥ ३३ ॥ सकळ जीवां सुखकरू । कैलासीं वसे शंकरू । जो कां पार्वतीपरमेश्वरू । जो योगेश्वरू योगियां ॥ ३४ ॥ जटाजुटी गंगाधर । पिनाकपाणी पंचवक्त्र । कर्पूरगौर गोक्षीर । अभयवरदकर निजभक्तां ॥ ३५ ॥ त्रिमात्रातीत त्र्यंबक । त्रिपुटी त्रिपुर त्रिपुरांतक । त्रिविधतापउच्छेदक । तिनी लोकसुखकारी ॥ ३६ ॥ नागभूषणीं शोभे लीला । रुद्राक्षयुक्त रुंडमाळा । नीळकंठ जाश्वनीळा । भस्मोद्धूलितधूसर ॥ ३७ ॥ त्रिशूळडमरांकितकर । त्रिनेत्र व्याघ्राजिन अंबर । रामनामीं अतितत्पर । करी निरंतर जपमाळा ॥ ३८ ॥ सहस्रबाहु बळिपुत्र बाण । शृंगी भृंगी चंडी पार्षद पूर्ण । साठी सहस्र रुद्रगण । काळ्या त्रिशूळ जाण झेलिती ॥ ३९ ॥ गणेश स्वामिकार्तिक । नंदी पंचमुख षण्मुख । वीरभद्र सेनानायक । जेणें लाविली सीक दक्षासी ॥ २४० ॥ भूत प्रेत पिशाचक । महाप्रमथ ज्याचें सैन्यक । अवघे शिवांकित देख । शिवनामें घोष गर्जती ॥ ४१ ॥ शंभु शिव शूली शंकर । उमाकांत कर्पूरगौर । भव भर्ग भवानीवर । कपर्दी ईश्वर महादेव ॥ ४२ ॥ हरहरशंकरनामोच्चारीं । धाकें कळिकाळ पळे दूरी । शिवनामें गर्जे सदा गिरी । गिरिश राज्य करी ते ठायीं ॥ ४३ ॥ जेथ शिवनामाचा उच्चार । तेथ सुखेंसीं तिष्ठे शंकर । भक्तकृपाळु ईश्वर । भोळा निरंतर भावार्थ्यां ॥ ४४ ॥ निजदासांचे त्रिगुण वैरी ।

रचना केली. हे दोन्ही लोक त्यांनीं आपापल्या लीलेनें निर्मिलें आहेत. २९ त्यामुळें ब्रह्माण्डांत कितीहि घडामोडी झाल्या तरी वैकुंठ-कैलासाला त्याचा पत्ताहि नसतो. तेथल्या वस्तीची अपूर्व गोडी हरि-हरांचे भक्तच केवल जाणतात. २३० तेथें काळाचा प्रवेशहि होत नाहीं. कर्मांचें बंधन नाहीं. जन्म-मरण नाहीं. एकनिष्ठ भक्तांना च हे लोक प्राप्त होतात. ३१ वैकुंठ व कैलास, यांची रचना सांगूं लागल्यास मनाचें मनपणहि नाहींसें होतें. हे बुद्धिमान् उद्धवा! तेथल्या लोकांचें लक्षण सांगतों, ऐक. ३२ सगळ्या ब्रह्माण्डाच्या बाहेर आणि मायेच्या आवरणांमध्यें हरि-हरानें वैकुंठ व कैलास हे दोन लोक केवल आपल्या लीलेनें निर्मिले. ३३ सर्व जीवांचें कल्याण करणारा शंकर, योग्यांतील योगीश्वर, पार्वती-परमेश्वर कैलासांत रहातो. ३४ तो जटा धारण करणारा, मस्तकावर गंगा वहाणारा, 'पिनाक'-नांवाचें धनुष्य धारण करणारा पंचमुखी, कापूर किंवा गायीचें दूध यांसारखा शुभ्रवर्ण, आपल्या भक्तांना अभय देणारा, ३५ अकार, मकार, उकार या तीन मात्रांहून भिन्न, त्रिनयन, त्रिपुटी हेंच त्रिपुर त्यांचा नाश करणारा, त्रिविध तापहारक, तीन्ही लोकांना सुख देणारा, ३६ सर्पांचीं भूषणें धारण करून त्यांच्या लीलेनें शोभणारा, रुद्राक्ष व रुंडमाळा धारण करणारा, नीलरत्नासारखा नीलकंठ, भस्मलेपनामुळें मलिन दिसणारा, ३७ त्रिशूळ, डमरु हातीं घेणारा, त्रिनेत्र, व्याघ्रांबरधारी, रामनामांत तत्पर, निरंतर रामनामाचा जप करणारा, ३८ बलीचा पुत्र सहस्रबाहु बाणासुर, शृंगी, भृंगी, चंडी या सभासदांनीं व काळ्या, त्रिशूळ इत्यादि झेलणाऱ्या हजारों रुद्रगणांनीं युक्त, ३९ गणेश, कार्तिकस्वामी, नंदी, पंचमुख, षण्मुख आणि दक्षाचें पारिपत्य करणारा वीरभद्र हे ज्याचे सेनापति आहेत, २४० व भूत, प्रेत, पिशाच्च व महा प्रमथ यांचें बलाढ्य सैन्य ज्याच्यापाशीं आहे आणि हे सर्व ज्याच्या आज्ञेंत राहून सतत शिवनामाचा गजर करीत असतात. ४१ शंभु, शूली, शिव, उमाकांत, कर्पूरगौर, भव, भर्ग, भवानीपति, कपर्दी, ईश्वर, महादेव, ४२ या नांवांच्या किंवा 'हरहर महादेव' या नामाच्या भीतीनेंच कळिकाळ दूर पळून जातो. म्हणून कैलास पर्वत शिवनामाची सतत गर्जना करीत असतो. असा श्रीशंकर तेथें राज्य करितो. ४३ जेथें शिवनामाचा उच्चार होतो तेथें शंकर सुखानें रहातो. तो भक्तावर कृपा करणारा ईश्वर भाविक भक्तांस सतत सुलभ आहे. ४४ आपल्या भक्ताचे त्रिगुणरूपी वैरी नाहींसे करण्यासाठीं तो निरंतर हातांत त्रिशुल घेऊन सज्ज असतो.

छेदावया सदा त्रिशूळ करीं । निजडमरूच्या गजरीं । पापाची उरी उरों नेदी ॥ ४५ ॥ कैलासीं तृण तरु समस्त । पशु पक्षी जे जे तेथ । ते अवघेचि शिवांकित । सर्वरूपें समस्त शिवू नांदे ॥ ४६ ॥ यापरी ब्रह्मांडाबाहेरी । शिवू स्वलीला निर्माण करी । नेमूनियां कैलासगिरी । भवू राज्य करी भवानीशीं ॥ ४७ ॥ आतां वैकुंठींची स्थिती । ऐक सांगेन तुजप्रती । जे ऐकतां चित्तचित्तीं । स्वानंदस्फूर्ति वोसंडे ॥ ४८ ॥ ऊंस गाळूनि काढिजे सार । त्याची आळूनि कीजे साकर । तिचेही नाना प्रकार । करिती नानाकार अतिकुशळ ॥ ४९ ॥ तेवीं चैतन्यचिनिश्चितें । मुसावूनि श्रीभगवंतें । वैकुंठ रचिलें तेथें । निजसामर्थ्यें नांदावया ॥ २५० ॥ स्वलीला सगुण साकार । सुकुमार अतिसुंदर । घनश्याम मनोहर । मूर्ति चिन्मात्र चोखडी ॥ ५१ ॥ शंख चक्र पद्म गदा । चारी भुजा सायुधा । डोळे लांचावले आनंदा । सगुण गोविंदा देखोनी ॥ ५२ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कांसे पिंवळा सोनसळा कौस्तुभ झळके गळां । आपाद वनमाळा शोभत ॥ ५३ ॥ चरणींची गंगा अतिपुनीत । जे जगातें पवित्र करित । ते माथां वाहे उमाकांत । निजस्वार्थ देखोनी ॥ ५४ ॥ त्या श्रीहरीचें पदद्वंद्व । वानितां मुका झाला वेद । अगम्य हरीचें निजपद । महिमा अगाध श्रीहरिचरणीं । ॥ ५५ ॥ पाहतां मुकुंदाचें श्रीमुख । फिकें झालें जी पीयूख । डोळ्यां झालें परम सुख । धन्य श्रीमुख हरीचें ॥ ५६ ॥ ज्याचें निमेषार्ध देखिल्या मुख । हारपे कोटि जन्मांचें दुःख । त्रिलोकीं न माय हारिख । धन्य श्रीमुख हरीचें ॥ ५७ ॥ ज्याचा देखिलिया वदनेंदु । बाधूं न शके द्वंद्वबाधू । चढता वाढता परमानंदु । स्वानंदकंदु जगाचा ॥ ५८ ॥ जयाची विक्षेपभ्रुकुटी । रची ब्रह्मांडें उठाउठी । ज्याचे रोमकूपीं ब्रह्मांडे कोटी । ओटी । तो हरि वैकुंठीं नांदत ॥ ५९ ॥ ज्याची झालिया कृपादृष्टी । अहंकाराची विरे गांठी । दुसरें दिसों नेदी सृष्टीं । तो हरी वैकुंठीं नांदत ॥ २६० ॥ जया दादुल्याचें नाम ।

आपल्या डमरूच्या आवाजानें पाप निःशेष घालवितो. ४५ कैलासांतील गवत, झाडें, पशु, पक्षी, किंवा जेवढे सजीव पदार्थ आहेत, तेवढे सगळे शंकराच्या आज्ञेंत रहातात. त्या सर्वांच्यारूपानें साक्षात् शंकरच तेथें नांदत असतो. ४६ याप्रमाणें ब्रह्माण्डाच्या बाहेर आपल्या लीलेनें कैलास पर्वत निर्माण करून तेथें श्रीशंकर भवानीसह राज्य करितो. ४७ आतां वैकुंठाचा प्रकार तुला सांगतों, तो ऐक. जो वृतान्त ऐकला असतां चित्तवृत्ति स्वानंदस्फूर्तीनें तुडुंब भरून वाहूं लागते, ४८ ऊंस पिळून त्याचा रस काढितात, तो आळवून त्याची साखर करितात व सुग्रणी स्त्रिया त्या साखरेचे नाना प्रकारचे विविध आकृतीचे पदार्थ बनवितात. ४९ त्याप्रमाणें श्रीभगवंतानें स्वतःच्या वस्तीसाठीं आपल्या सामर्थ्यानें चैतन्यच मुशींत घालून वैकुंठाचा ठसा ओतला. २५० स्वलीलेनें त्यानें धारण केलेली सगुण, साकार, सुकुमार, अत्यंत सुंदर, घनश्याम, मनोहर, ज्ञानरूप मोहक मूर्ति, ५१ चारी हात, शंख, चक्र, पद्म, गदा या आयुधांनीं युक्त, अशा सगुण गोविंदाचें रूप पहाण्यास नेत्र अत्यंत आनंदानें लोलुप होतात. ५२ मस्तकावर मुकुट, कानांत कुंडलें, कमरेला मेखला, पिवळा पीतांबर, गळ्यांत कौस्तुभ, पायापर्यंत रुळणारी वनमाला यांनीं तो शोभत असतो. ५३ त्याच्या चरणापासून निघालेली अतिशय पावन गंगा जगाला पवित्र करिते. म्हणून शंकर आपल्या स्वार्थासाठीं त्या गंगेला आपल्या मस्तकावर धारण करितो. ५४ ज्या श्रीहरीच्या चरणकमलाचें वर्णन करितांना वेदहि मुका झाला ते श्रीहरीचे चरण अगम्य आहेत. त्यांचा महिमा अगाध आहे. ५५ श्रीकृष्णाचें मुख पाहून अमृतहि फिकें पडतें. श्रीहरीचें तें धन्य मुख पाहून डोळ्यांना अतिशय सुख होतें. ५६ त्याच्या मुखाकडे अर्धाक्षण जरी पाहिलें तरी कोट्यावधि जन्मींचें दुःख नाहींसें होतें. आनंद त्रिभुवनांत मावत नाहीं. असें श्रीहरीचें मुखकमल धन्य होय. ५७ त्याचा मुखचंद्र पाहिला असतां द्वंद्वाची बाधा होत नाहीं. जगांतील स्वानंदाचा कंदच असा वाढता आनंद होतो. ५८ कमानदार भुवईच्या नुसत्या दृष्टिक्षेपानें ब्रह्माण्डाची तत्काळ रचना होते. ज्याच्या रोमछिद्रांत कोट्यावधि ब्रह्माण्डें आहेत असा तो श्रीहरि वैकुंठांत नांदत असतो. ५९ ज्याची कृपादृष्टि झाली असतां अहंकाराची गांठ कधींच सुटून जाते, सृष्टींत दुसरें कांहीं दिसत नाहीं, तो श्रीहरि वैकुंठांत रहातो. २६०

निर्दाळी गा मरणजन्म । समूळ उपडी कर्माकर्म । तो पुरुषोत्तम नांदत ॥ ६१ ॥ ते वैकुंठीं पाहता साचार । अवघे चतुर्भुज नर । घनश्याम पीतांबरधर । शंख चक्र अवघ्यांसी ॥ ६२ ॥ अवघ्यांचें एक स्वरूप । अवघे दिसती एकरूप । जेथ हरि नांदे स्वयें सद्रूप । तेथ कोणी कुरूप । दिसेना ॥ ६३ ॥ तेथ नाहीं आधिव्याधी । नाहीं विषयवार्ता उपाधी । स्त्रीपुरुषां समान बुद्धी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ६४ ॥ तेथ नाहीं तहानभूक । नाहीं कामक्रोध द्वंद्वदुःख । नाहीं जन्ममरण निःशेख । ऐसा वैकुंठलोक नांदत ॥ ६५ ॥ लक्ष्मीनें करावें अवलोकन । यालागीं कष्टती सुरगण । ते लक्ष्मी अंगें आपण । करी समार्जन वैकुंठीं ॥ ६६ ॥ ते वैकुंठीं जगन्नाथ । उद्धरावया निजभक्त । स्वलीला असे नांदत । दीनकृपायुक्त दयाळू ॥ ६७ ॥ अंतीं नाममात्र घेतल्यासाठीं । उद्धरल्या जीवकोटी । तो स्वामी श्रीविष्णू वैकुंठीं । दीनकृपादृष्टी नांदत ॥ ६८ ॥ जैसा ज्यासी भावार्थ । तैसा पुरवी मनोरथ । पढिये पंचम पुरुषार्थ । तो हरि नांदत वैकुंठीं ॥ ६९ ॥ लोकलोकांतरगणना । ब्रह्मांडसंख्या अवघी जाणा । वैकुंठकैलास रचना । समूळ विवंचना सांगीतली ॥ २७० ॥ लोक सांगीतले भिन्न भिन्न । तेथील प्राप्तीचे कोण जन । ऐसें कल्पील तुझें मन । ते अर्थीं निरूपण अवधारीं ॥ ७१ ॥ महर्जनतपःसत्यलोक । वैकुंठरचना अलोलिक । तेथील प्राप्तीचे लोक । ते यदुनायक सांगत ॥ ७२ ॥

योगस्य तपसश्चैव न्यासस्य गतयोऽमलाः । महर्जनस्तपः सत्यं भक्तियोगस्य मद्गतिः ॥ १४ ॥

निश्चळ करावया निजचित्ता । साधिली प्राणापानसमता । षट्चक्रें भेदूनि तत्त्वतां । पुढें निजात्मता पाववी ॥ ७३ ॥ तंव आयुष्या झालें अस्तमान । निजांगी आदळे मरण । ऐसें निमाले जे योगीजन । त्यांसी ऊर्ध्व गमन महर्जनादि लोकीं ॥ ७४ ॥ जो गृहस्थाश्रमी ब्रह्मचारी । ब्रह्मचर्यनेमें व्रतधारी ।

ज्या प्रभूचें नांव जन्म-मरण नाहींसें करितें, कर्म-अकर्म नष्ट करितें तो पुरुषोत्तम तेथें रहातो. ६१ त्या वैकुंठांत सगळीं मनुष्यें चतुर्भुज, घनश्याम, पिवळा पीतांबर धारण करणारीं व शंख-चक्रादि आयुधांनीं युक्त असतात. ६२ सगळ्यांचें रूप सारखेंच असतें. सगळे एकरूप दिसतात. जेथें स्वतः श्रीहरि सद्रूपानें नांदत असतो तेथें कोणीच कुरूप दिसत नाहीं. ६३ तेथें आधि, व्याधि, उपाधि नाहीं. विषयांचें नांव नाहीं. तेथें स्त्री-पुरुषांविषयीं समदृष्टि असते. उद्धवा ! तूं हें अगदीं खरें समज. ६४ त्या वैकुंठलोकीं तहान-भूक, काम-क्रोधादि द्वंद्वें जन्म-मरण यांचा लेशहि नाहीं. ६५ ज्या लक्ष्मीनें आपल्याकडे नुसती नजर टाकावी म्हणून देव प्रयत्न करीत असतात, ती लक्ष्मी वैकुंठांत स्वतः सडा-संमार्जन घालीत असते. ६६ त्या वैकुंठांत दीन-दयाळ जगन्नाथ स्वतः आपल्या भक्तांचा उद्धार करण्या-साठीं आपल्या लीलेनें नांदत असतो. ६७ अंतसमयीं ज्याचें नुसतें नांव घेतलें असतां कोट्यवधि जीव उद्धरून जातात तो दीनावर कृपादृष्टि ठेवणारा प्रभु श्रीविष्णु वैकुंठांत रहातो. ६८ ज्याचा जसा भाव असेल तसा त्याचा मनोरथ पुरविणारा व पांचव्या पुरुषार्थाचा चहाता श्रीहरि वैकुंठांत वास करितो. ६९ याप्रमाणें निरनिराळे लोक, ब्रह्माण्डाची संख्या, वैकुंठ-कैलासाची रचना, या सर्वांचें सविस्तर विवेचन केलें. २७० हे जे मीं भिन्नभिन्न लोक सांगितले, त्या लोकांच्या प्राप्तीचे अधिकारी कोण ! अशी जर तुझ्या मनांत कल्पना येईल तर त्याचेंहि निरूपण करितों. ऐक. ७१ आतां महर्, जन, तप, सत्यलोक व अपूर्व रचना असलेलें वैकुंठ यांस कोणते जीव प्राप्त होतात तेंच यदुनायक सांगत आहे २७२.

योगस्य च तपसः न्यासस्य एव अमलाः गतयः महर्, जन तपः सत्यं:-योग, तप व आश्रमसंन्यास यांच्या शुद्ध गति, योगादिकांच्या न्यूनाधिकतेप्रमाणें उत्तरोत्तर महर्लोक, जनोलोक, तपोलोक व सत्यलोक या आहेत व, भक्तियोगस्य मद्गतिः—भक्तीयोगाची वैकुंठलोक ही गति आहे. १४.

चित्त स्थिर करण्यासाठीं प्राणापान सम करणारे साधक आधारादि सहा चक्रांचा भेद करून आत्मस्वरू-पाला जाऊन पोंचतात; ७३ परंतु मध्येंच त्यांचें आयुष्य संपून मृत्यु आला म्हणजे ते योगी महर्जनादि वरच्या लोकांस जातात. ७४ गृहस्थाश्रमी किंवा ब्रह्मचर्य व्रताचे नियम पाळणारे, स्वप्नांतहि स्त्रीला स्पर्श न करणारे,

जो स्वप्नींही नातळे नारी । जो भिक्षाहारी सर्वदा ।। ७५ ।। जो सदा धडधडीत विरक्ती । एक भिक्षा न धरी हाती । सद्गुरूचिया सेवा करिती । आत्मज्ञानप्राप्ती पावावया ।। ७६ ।। जे संधी व्हावें आत्मज्ञान । ते संधीसी आलें मरण । ऐशा ब्रह्मचारीयासी जाण । ऊर्ध्व गमन महर्जनादि लोकीं ।। ७७ ।। जे कां नैष्ठिक नेटक । जे अग्निसेवें साग्निक । जे स्वधर्में चित्तशोधक । जे सेवक द्विजदेवां ।। ७८ ।। जे भूतदयाळु भाविक । जे सत्यवादी सात्विक । जे निजात्मज्ञानसाधक । जे अवंचक गुरुभजनीं ।। ७९ ।। गुरुकृपा साधूनि ज्ञान । पावावें ब्रह्म सनातन । तंव वेचलें आयुष्यधन । अंगी निधन आदळलें ।। २८० ।। तेणें खोळंबली ब्रह्मप्राप्ती । परी ऊर्ध्वलोकीं होय गती । जैसी उपासना विरक्ती । तेणें तारतम्यें जाती महर्जनादि लोकीं ।। ८१ ।। जे वनवासी वानप्रस्थ । जे वैराग्यें अतिविरक्त । जे कंदमूळफळीं तृप्त । जे सदा नेमस्त आश्रमधर्मीं ।। ८२ ।। वर्षाकाळीं आसारीं राहे । हेमंतऋतीं जळाशयें । उष्णकाळीं पंचाग्नि साहे । तपश्चर्या वाहे अतिनिष्ठा ।। ८३ ।। शरीरशोषणाचें पाहें । सर्वथा न धरी भयें । स्वार्थाचेनि लवलाहें । तपोनिष्ठा साहे दारुण ।। ८४ ।। वैराग्य साधूनि पूर्ण । करावें संन्यासग्रहण साधावया ब्रह्मज्ञान । तेचि काळीं मरण ओढवलें ।। ८५ ।। ऐसेनि देहांतस्थिती । त्यासी ऊर्ध्वलोकीं होय गती । महर्जनतपोलोकप्राप्ती । तारतम्यस्थिती उपासना ।। ८६ ।। जो समूळसंकल्पसंन्यासी । लोकलोकांतर न घडे त्यासी । हें न टकेचि गा जयासी । आणि झाले संन्यासी विधियुक्त ।। ८७ ।। जे कां पोटींहून अतिविरक्त । स्वप्नीं धातूंसी न लाविती हात । जे यतिधर्मीं सदा निरत । जे सदा जपत प्रणवातें ।। ८८ ।। अंगीकारिले आश्रमविधि । उबगू न मानी जो त्रिशुद्धी । मरणीं डंडळीना बुद्धी । त्या गमनसिद्धी सत्यलोकीं ।। ८९ ।। ऐसे सत्यलोकातें पावती । तेथिल्या भोगांची ज्यां विरक्ती । ते ब्रह्मयांसवें मुक्त होती । येर ते येती माघारे ।। २९० ।। ज्यांसी सत्यलोकीं

भिक्षान्नावर निर्वाह करणारे, ७५ तीव्र वैराग्यानें युक्त असलेले, भिक्षेला स्पर्शहि न करणारे, आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठीं सद्गुरूची सेवा करणारे, ७६ ब्रह्मचारी यांस आत्मज्ञान प्राप्तीच्या वेळीं मरण आलें असतां तेहि महर्जनादि वरच्या लोकीं जातात. ७७ जे नैष्ठिक ब्रह्मचारी, अग्निसेवेसाठीं अग्निहोत्र ठेवणारे, स्वधर्माचरणानें चित्तशुद्धि करणारे, देव-ब्राह्मणांची पूजा करणारे, ७८ भक्तिमान्, भूतदयेनें युक्त, सात्विक, सत्यवक्ते, आत्मज्ञान साध्य करणारे व गुरुसेवेंत तत्पर असतात. ७९ गुरुकृपा संपादन करून सनातन ब्रह्मज्ञान मिळविण्याच्या मार्गांत असतांना त्यांचें आयुष्य संपलें व मरण आलें तर त्यांच्या ब्रह्मप्राप्तींत अडथळा येतो. २८० परंतु ते ऊर्ध्वलोकीं जातात. त्यांची उपासना व विरक्ति जशी न्यूनाधिक असेल तिच्या अनुसार ते महर्जनादि लोकीं जातात. ८१ जे वनांत रहाणारे विरक्त, वानप्रस्थ, कंद, मूळें व फळें यांवर निर्वाह करणारे, आश्रमधर्माचे नियम पाळणारे, ८२ पावसाळ्यांत पर्जन्यवृष्टींत, हिंवाळ्यांत जलामध्यें, उन्हाळ्यांत पंचाग्नीमध्यें बसून कष्टकर तपश्चर्या करणारे, ८३ शरीरकष्टांचें यत्किंचित्‌हि भय न धरणारे, आत्महितासाठीं तीव्र तप सहन करणारे, ८४ ते पूर्ण विरक्ति आल्यानंतर ब्रह्मज्ञानासाठीं संन्यास घेणार इतक्यांत त्यांजवर मरण ओढवलें. ८५ तर त्यांच्या उपासनेच्या न्यूनाधिकतेप्रमाणें त्यांस महर्जनलोकांची प्राप्ति होते. ८६ जो सगळ्या संकल्पांचाच संन्यास करितो त्याला इतर लोकीं जावेंच लागत नाहीं. तो मरणोत्तर तत्काल मुक्त होतो. परंतु ज्यांस हें साधन नाहीं, त्यांनीं विधियुक्त संन्यास करावा. ८७ जे अंतःकरणापासून विरक्त असतात, जे सोन्या-रुप्याला स्वप्नांतहि स्पर्श करीत नाहींत, जे निरंतर संन्यासधर्मांतच निमग्न असतात, सर्वकाळ प्रणवाचा जप करीत असतात, ८८ एकदां स्वीकारलेल्या आश्रमविधीला कंटाळत नाहींत, ज्यांची बुद्धि मरणसमयीं त्यापासून ढळत नाहीं, ते मरणोत्तर सत्यलोकीं जातात. ८९ असे जे योगी सत्यलोकीं जातात व तेथल्या भोगांची ज्यांस विरक्ति येते ते ब्रह्मदेवाबरोबर मुक्त होतात आणि

भोगासक्ती । तेहि खचोनि माघारे येती । इतर लोकांची कोण गती । पुनरावृत्ती सोडीना ॥ ९१ ॥ जेथवरी भोगासक्ती । तेथवरी पुनरावृत्ती । जेथ भोगाची निवृत्ती । तेथ चारी मुक्ती । आंदण्या ॥ ९२ ॥ ज्या लोकीं ज्या भोगविरक्ती । तेथूनि ते पुढारे जाती । जे लोकीं ज्या भोगासक्ती । ते खचोनि पडती भूलोकीं ॥ ९३ ॥ तैशी नव्हे माझी भक्ती । भक्तां नाहीं इतरप्राप्ती । मद्भक्तां माझी गती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९४ ॥ जे सकाम माझी सेवा करिती । त्यांसी कामनाफळीं पडे वस्ती । ज्यांसी निष्काम माझी भक्ती । त्यांसी माझी प्राप्ती अनन्य ॥ ९५ ॥ सकाम भक्तांचे पुरवूनि काम । त्यांसी मी करीन नित्य निष्काम । निजभक्तांसी निजधाम । मी पुरुषोत्तम पाववीं ॥ ९६ ॥ यालागीं गोपींची कामासक्ती । म्यांचि आणूनि निष्कामस्थिती । त्यांसी दिधली सायुज्यमुक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ९७ ॥ म्यां गोपिकांसी कामू केला । कीं निःशेष कामू त्यांचा हरिला । न विचारितां या बोला । कृष्ण व्यभिचारला मूर्ख म्हणती ॥ ९८ ॥ सलोकता आवडे भक्तांसी । तैं मी करीं वैकुंठवासी । भक्त मागे समीपतेसी । करीं मी तयासी जिवलग ॥ ९९ ॥ हितगुज अळोंच्यासी । हृदयींचें गोड सांगावयासी । उद्धवा तूं जैसा आवडशी । ऐशीच त्यांशीं करी प्रीति ॥ ३०० ॥ भक्त मागे सरूपता । त्यासी मी दें चतुर्भुजता । शंखचक्रादि सायुधता । घनश्यामता सुरेख ॥ १ ॥ मुकुट कुंडलें मेखळा । कांसे मिरवे सोनसळा । वांकीं तोडरू चरणकमळा । कौस्तुभ गळां मत्सम ॥ २ ॥ ठाणमाण गुणलक्षण । वीर्य शौर्य गांभीर्य पूर्ण । रूप रेखा समसमान । दोघेही अनन्य सरूपता ॥ ३ ॥ रमा दोघांसी एकत्र देखे । देवो कोण हें तों नोळखे । पार्षदक्रिया ठकली ठाके । कोणासी सेवकें सेवावें ॥ ४ ॥ छत्रधरू चवके चित्तीं । कोणावरी धरूं छत्री । चवरधरें चवरें हातीं ।

ज्यांस विरक्ति नसते ते पुण्यक्षय होतांच खालीं मृत्युलोकीं परत येतात. २९० ज्यांस सत्यलोकींच्या भोगांची आसक्ति असते, तेहि खालीं गळून पडतात. मग इतर लोकांची काय कथा ! त्यांना जन्म-मरणपरंपरा सोडीत नाहीं. (सु. गी. ९-२०-२१ पृ. १८४) ९१ जोंवर भोगासक्ति असतें तोवर जन्म मरण आहे. जेव्हां भोगाची निवृत्ति होते, तेव्हां चारी मुक्ति त्याच्या आंदण दिलेल्या दासी होतात. ९२ ज्यांस ज्या लोकीं त्या भोगांची विरक्ति येते, तो वरच्या लोकीं जातो आणि त्या लोकींच्या भोगाची आसक्ति असली कीं, तेथून तो गळून खालीं मृत्युलोकांत पडतो; ९३ पण माझी भक्ति तशी नाहीं. उद्धवा ! माझ्या भक्तांना दुसऱ्या कोणत्याहि लोकीं जावें लागत नाहीं. माझे भक्त मलाच प्राप्त होतात हें निश्चित जाण. ९४ जे फलाची इच्छा ठेवून माझी सेवा करितात, त्यांना त्याच इष्ट फलांत रहावें लागतें आणि जे माझी निष्काम भक्ति करितात त्यांस माझी अनन्यप्राप्ति होते. ९५ सकाम भक्तांच्या इच्छा पूर्ण करून मी त्यांना नित्य निष्काम करितों व त्या माझ्या भक्तांना मी पुरुषोत्तम निजधामाला नेतो. ९६ उद्धवा ! त्याचकरितां मी गोपींच्या कामासक्तीचें निवारण करून त्यांस निष्काम केलें व सायुज्यमुक्ति दिली. ९७ मीं गोपिकांची विषयासक्ति पूर्ण करून त्यांना निष्काम केलें. परंतु याचा विचार न करितां 'कृष्णानें व्यभिचार केला' असें मूर्ख लोक म्हणतात ९८ ज्या माझ्या भक्तांना सलोकता आवडते, त्यांना मी वैकुंठलोक देतों. जे भक्त समीपता मागतात, त्यांना मी माझे जिवलग करितों. ९९ उद्धवा ! मनांतील हितगुज व हृदयांतील गोड गोष्टी सांगण्यासाठीं तूं जसा मला आवडतोस, तसेच ते मला प्रिय होतात. ३०० जे माझे भक्त सरूपतेची इच्छा करितात त्यांस मी चतुर्भुज, शंख-चक्रादि आयुधांनीं युक्त व सुंदर घनश्याम करितों. १ त्यांस मी माझ्याप्रमाणेंच मुकुट, कुंडलें, मेखला, पिवळा पीतांबर धारण करणारे, वांकी, पायांत तोडरू, गळ्यांत कौस्तुभाची माळ यांनीं युक्त करितों. २ त्याच्या एकंदर शरीराची ठेवण माझ्यासारखीच करून, त्यांस पराक्रम, शौर्य, गांभीर्य, रूप-रेखा इत्यादि माझ्यासारखींच देऊन आम्ही दोघेहि परस्परांच्या सादृश्यास प्राप्त होतों. ३ लक्ष्मीला मी व ते भक्त एकसारखेच वाटतात. त्यांतील मी कोणता हें तिला ओळखितां येत नाहीं. माझे पार्षद फसले जातात. कोणाची सेवा करावी हेंच सेवकांना कळत नाहीं. ४ छत्र धरणारा संशयांत पडतो व 'कोणावर छत्र धरावें' असा मनांत विचार करूं लागतो. चवरी धरणारे हातांत चवऱ्या घेऊन 'या कोणावर वाराव्या'

कोणाप्रती विंजावें ॥ ५ ॥ नमना येती ब्रह्मादि देव । तेही मानिती अतिअपूर्व । दोंमाजीं कोण आदिदेव ।त्यांसीही स्वयमेव कळेना ॥६॥ जेवीं दीपें दीपू लाविला । न कळे वडील कोण धाकुला । तेवीं माझी सरूपता पावला । न वचे ओळखिला आनासी ॥ ७ ॥ जेवीं आरिशाचें प्रतिबिंब । दिसे समरूपें स्वयंभ । तैशी सरूपतेची शोभ । सम विडंब दोहींचा ॥ ८ ॥ देवो होऊनियां प्रसन्न । आपुली सरूपता दे संपूर्ण । नेदी हृदयींचा द्विजचरण । श्रीवत्सलांछन अविनाशी ॥ ९ ॥ श्रीवत्स चिन्ह द्यावयासी पाहीं । विष्णु म्हणे मज सामर्थ्य नाहीं । तें असे ब्राह्मणाच्या पायीं । त्याचा चरण हृदयीं धरिल्या लाभे ॥ ३१० ॥ सरूपतेमाजी जाण । देवा भक्तांची हे खूण । ज्याचे हृदयीं श्रीवत्सलांछन । तो स्वामी विष्णु जाण सर्वांचा ॥ ११ ॥ ऐशी सरूपता जरी झाली प्राप्त । तरी हा देवो मी एक भक्त । हा भिन्नत्वाचा भेद किंत । त्याआंत उरला असे ॥ १२ ॥ देवभक्तांमाजी भेदू । भिन्न सरूपतासंवादू । जंव नाहीं अद्वयबोधू । तंव परमानंदू प्रकटेना ॥ १३ ॥ सांडूनि भिन्न भेदवार्ता । भक्त मागे सायुज्यता । ते गोड निरूपण कथा । तेथील स्वादता मी जाणें ॥ १४ ॥ सायुज्याचें गोडपण । माझें मी जाणें आपण । उद्धवा तुज तेंही जाण । सांग संपूर्ण सांगेन ॥ १५ ॥ देह सरूपता सारिखेपण । हृदयीं भिन्न मीतूंपण । ऐशियेही मुक्तीसी जाण । भक्त सज्ञान नातळती ॥ १६ ॥ मी होऊनियां मातें । भजन स्वतःसिद्ध आइतें । तें सांडूनियां भेदातें । निजभक्त चित्तें नातळती ॥ १७ ॥ देवेंसीं भक्त अनादि सिद्ध । ठायीं मूळींहून अभेद । तेथ दाटूनि जो धरी भेद । तो भक्तिमंद मायिक ॥ १८ ॥ अति जिज्ञासु आणि अर्थार्थी । हे भेद केले मायिका भक्ती । जे अभेदभावें मज भजती । सायुज्यमुक्ती तयांसी ॥ १९ ॥ ज्यांसी रावो रंक समान । वंद्य निंद्य न मनी मन । जे न धरिती देहाभिमान । सायुज्य जाण तयांसी ॥ ३२० ॥ जैशी आपुली साउली । मिथ्या आपणासवें लागली । तैशी

म्हणून विचारांत पडतात. ५ ब्रह्मदेवादि देव नमन करावयास आले म्हणजे त्यांसहि तें अपूर्व वाटतें. या दोघांपैकीं आदिदेव भगवान् कोणतां हें त्यांनाहि ओळखतां येत नाहीं. ६ एका दिव्यानें दुसरा दिवा लावल्यानंतर मग पहिला दिवा कोणता हें जसें ओळखतां येत नाहीं ७ त्याप्रमाणें माझ्या सरूपतेस पावलेला भक्त दुसऱ्या कोणालाहि ओळखितां येत नाहीं. आरशांतील प्रतिबिंब जसें मूळच्या स्वाभाविक रूपासारखेंच दिसतें, त्याप्रमाणे सरूपतेमध्यें दोहोंची शोभा सारखींच असतें. ८ देव याप्रमाणें प्रसन्न होऊन आपली पूर्ण सरूपता देतो; परंतु आपल्या हृदयावरील द्विजचरणाचें जें निग्य श्रीवत्सलांछन तें मात्र कदापि भक्ताला देत नाहीं. ९ श्रीविष्णु म्हणतो कीं, तें श्रीवत्स चिन्ह देण्याचें मला सामर्थ्य नाहीं. कारण तें ब्राह्मणाच्या पायांना आहे. त्याचा चरण हृदयावर धारण केला असतां तें लाभतें. ३१० सरूपतेमध्यें देव व भक्त या दोघांना ओळखण्याची हीच मुख्य खूण आहे. ज्याच्या हृदयावर श्रीवत्सलांछन आहे तोच सर्वांचा स्वामी श्रीविष्णु जाणावा. ११ अशी सरूपता जरी प्राप्त झाली तरी हा देव आणि हा मी एक भक्त, हा किंतु त्यांत उरतोच. १२ देव भक्तांतील भेद असेपर्यंत सरूपता म्हणणेंहि योग्य नव्हे. जोंपर्यंत अद्वयज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत परमानंद प्रगट होत नाहीं. १३ म्हणून भक्त भिन्नत्व सोडून सायुज्यता मागतो. त्या कथेचें निरूपण फार गोड आहे. १४ त्या सायुज्याची गोडी मीच काय तो जाणें. उद्धवा ! तेंहि मी तुला सविस्तर सांगतों, ऐक. १५ सायुज्यांत देहाला सारखेपणा प्राप्त होतो; पण हृदयांत 'मी तूं-' पणा हा भेदभाव रहातोच. यास्तव सज्ञान भक्त अशा मुक्तीला स्पर्शहि करीत नाहींत. १६ माझ्या स्वरूपाला प्राप्त होऊन माझें स्वाभाविक भजन करावयाचें सोडून माझे भक्त भेदाला मनानेंहि स्पर्श करीत नाहींत. १७ देव आणि भक्त यांच्यात मूळचाच अनादिसिद्ध अभेद आहे; तेथें जो मुद्दाम भेदभाव धरितो तो भक्तिहीन मायिकच जाणावा. १८ आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी हे भेद मायिक भक्तीचेच आहेत. जे अभेदभावानें मला भजतात त्यांना सायुज्यमुक्ति प्राप्त होतें. १९ ज्यांस श्रीमंत व दरिद्री सारखे वाटतात, निंद्य व वंद्य हा भाव ज्यांच्या मनांत नसतो, जे देहाभिमान धरीत नाहींत, त्यांस सायुज्यमुक्ति मिळते. ३२० आपली

देहबुद्धी ज्यांसी झाली । त्यांसी फावली सायुज्यता ॥ २१ ॥ जन्मूनि छाया सरिसी वाढे । माझी हे ममता नुठी पुढें । ऐसें देहाचें न बाधी सांकडें । सायुज्य रोकडें तयासी ॥ २२ ॥ सांडूनि देहाची विषयासक्ती । जो करी भाव अभेदभक्ती । त्यासीचि सायुज्यमुक्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ २३ ॥ ज्यासी देहीं नुठी मीपण । भूतमात्रीं न देखे तूंपण । त्यासी सायुज्यमुक्ती जाण । सांग संपूर्ण सांपडे ॥ २४ ॥ जेवढी मज आत्म्याची व्यक्ती । तेवढीच त्याची प्रतीती । त्यासीच सायुज्यता मुक्ती । सहज आपैती उद्धवा ॥ २५ ॥ त्यासी विष्णुस्वरूप व्हावा देहो । हा सर्वथा नुपजे अहंभावो । त्यासी विष्णुसगट स्वदेह वावो । यालागीं सारूप्य पहा हो वांच्छीना ॥ २६ ॥ निजविवेकें पाहतां ठायीं । देहो तितुका मिथ्या पाहीं । तेथ सारूप्यता कोणे ठायीं । सज्ञानीं कायी मागावी ॥ २७ ॥ सायुज्यता आलिया हाता । वस्तूवीण ठावो नाहीं रिता । सकळ भूतीं एकात्मता । सायुज्य तत्त्वतां या नांव ॥ २८ ॥ सकळ रूपें नांदतें जग । तें जो जाणे आपुलें अंग । आपण सर्वात्मा अभंग । त्यासीच सांग सायुज्य ॥ २९ ॥ मी एक सबाह्याभ्यांतरीं । मी एक जंगमीं स्थावरीं । मीचि आत्मा चराचरीं । जाण त्याचे घरीं सायुज्य नांदे ॥ ३३० ॥ मीचि एक एकला । एकपणेंचि संचला । ज्यासी द्वैताचा दुकाळ पडिला । सत्य पावला सायुज्य ॥ ३१ ॥ एवं भावार्थाच्या अतिप्रीतीं । जें जें निजभक्त वांछिती । तें तें मी पुरवीं श्रीपती । चारी मुक्ती भक्तांसी ॥ ३२ ॥ यावेगळे माझे प्रिय भक्त । भक्तिप्रतापें प्रतापवंत । भजनशौर्य अति अद्‍भुत । निष्काम निरत मद्भजनीं ॥ ३३ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी या कल्पना न धरोनि हातीं । नित्य निष्काम अतिप्रीतीं । मज भजती महाभाग ॥ ३४ ॥ नेघे सालोक्य सामीप्य सरूपता । शेखीं न मागती सायुज्यता । निष्काम भजती भगवंता । भक्ति तत्त्वतां या नांव

स्वतःची छाया जशी मिथ्याच आपल्या मागें लागली आहे, त्याप्रमाणेंच जो ही देहबुद्धि मिथ्या समजतो, त्याला सायुज्यता प्राप्त होते. २१ आपली छाया देहाबरोबर उत्पन्न होऊन सारखी वाढत असते; पण ती माझी अशी भावना उत्पन्न होत नाहीं. त्याप्रमाणेंच देहाचेंहि ममत्व ज्याला बाधत नाहीं त्यालाच सायुज्य प्राप्त होतें. २२ उद्धवा! देहावरील आसक्ति सोडून जो श्रद्धेनें अभेदभक्ति करितो त्यालाच ही सायुज्यमुक्ति मिळते. हें निश्चित जाण. २३ ज्याच्या अंतःकरणांत 'मीपणा' नसतो, सर्व प्राणिमात्रास जो आत्मवत् पहातो; त्यालाच पूर्णपणें सायुज्यता लाभते. २४ माझ्या आत्म्याचा जेवढा विस्तार आहे तेवढीच ज्याला आत्मप्रतीति येते त्यालाच सायुज्यमुक्ति तत्काळ सहज प्राप्त होते. २५ 'आपला देह विष्णुरूप व्हावा' असा अहंभाव त्याच्या मनांत केव्हांहि उपजत नाहीं. त्याला आपला देह जसा मिथ्या तसाच विष्णुहि मिथ्याच वाटतो. म्हणून तो सरूपतेची इच्छा करीत नाहीं, २६ विचारानें पाहिलें असतां वस्तुतः देह मिथ्याच आहे. मग ज्ञानी माणसानें सरूपता कसली मागावी ! २७ सायुज्यता हातीं आली कीं, मग आत्मवस्तूवांचून रेंसभरहि जागा रिकामी सांपडत नाहीं. सर्व प्राणिमात्रांत एकात्मता पहाणें, यालाच खरें सायुज्य म्हणतात. २८ हें विविधरूपानें वागणारें जगत् आपलेंच अंग आहे, आपण सर्वात्मा अभंग आहोंत, अशी ज्याची दृढ भावना असते त्यालाच सायुज्यमुक्ति प्राप्त होते. २९ 'मीच एक आत्मा अंतर्बाह्य, स्थावरजंगमांत, चराचरांत आहे' असें जो जाणतो, त्याच्या घरीं सायुज्यमुक्ति नांदत असते. ३३० सर्वत्र मीच एकटा, एकत्वानें व्यापून राहिलों आहे असें जो मानितो, द्वैताचें नांवहि ज्याला ठाऊक नाहीं, तोच खरोखर सायुज्याला प्राप्त होतो. ३१ अशा भावनेनें अत्यंत प्रेमानें माझे भक्त जें जें इच्छितात तें तें मी श्रीपति त्यांस देतों. माझ्या भक्तांना मी चारी मुक्ति देतों. ३२ याशिवाय दुसरेहि माझे प्रिय भक्त आहेत ते माझ्या भक्तिप्रतापानें प्रतापी होतात. त्यांच्या भजनाचा पराक्रम अति अद्‍भुत असतो. ते निष्काम चित्तानें माझ्या भजनांत तल्लीन होतात. ३३ आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी ही कल्पना सोडून निष्काम होऊन ते श्रेष्ठ भक्त मला अति प्रीतीनें भजतात. ३४ ते सालोक्य, सामीप्य, सारूप्य हातांतहि धरीत नाहींत. शेवटीं सायुज्यहि मागत नाहींत. निष्काम मनानें भगवंताचें

॥ ३५ ॥ नवल भजनाची परवडी । आवडीतें प्रसवे आवडी । क्षणोक्षण चढोवढी । नित्य नूतन गोडी प्रेमाची ॥ ३६ ॥ माझिया आवडी तत्त्वतां । सर्वस्वें वेंचित जीविता । कदा पालट नव्हे चित्ता । भावार्थतां विश्वासी ॥ ३७ ॥ मीच एक देवाधिदेवो । सर्वभूतीं माझाचि भावो । विकल्प विकृति संदेहो । घालितां पहा हो उपजेना ॥ ३८ ॥ नवल भावार्थाची थोरी । मद्भावें देखे नरनारी । श्वानसूकरादि आकारीं । नमस्कारी मद्भावें ॥ ३९ ॥ नवल त्याची भजनख्याती । सायुज्यतादि चारी मुक्ती । माझ्या नांवावरूनि ओंवाळिती । भक्ति पढियंती येणें पाडें ॥ ३४० ॥ मांडल्या अतिविघ्न सांकडें । ग्लानी न करिती आणि-कांकडे । जाणती रामनामापुढें । विघ्न बापुडें तें कायी ॥ ४१ ॥ गगन पडों पाहे कडाडे । पृथ्वी उलथावया गडबडे । ऐसें मांडलीया सांकडें । नाम पढे श्रीहरीचें ॥ ४२ ॥ ऐशी देखोनि अन्यय प्रीती । मी सर्वस्वें भुललों श्रीपती । मग न पाहतां कुळ जाती । त्याच्या घराप्रती मी धांवें ॥ ४३ ॥ ते न घेती वैकुंठींची वाट । त्यांचें घरचि मी करी वैकुंठ । तेथें चिन्मात्रें फुटे पांहाट । पिके पेंठ संतांची ॥ ४४ ॥ उपनिषदें येती तयांपाशीं । स्वधर्म यें सुखवस्तीसी । नारदादि सनकादिकांसीं । तया घरासी अतिप्रीती ॥ ४५ ॥ गर्जती नामाचे पवाडे । माझी कीर्ति गाती वाडेंकोडें । माझ्या रामनामापुढें । द्वंद्वाचें उडे बाधकत्व ॥ ४६ ॥ ऐशी देखोनि माझी भक्ती । बोरसोनियां निजशांती । धांवोनि ये तयां-प्रती । बोळली मागुती जावों विसरे ॥ ४७ ॥ त्यांसी छळों ये जें जें दूषण । तें तें त्यांसी होय भूषण । माझे भक्तीचें प्रसन्नपण । जाण संपूर्ण या नांव ॥ ४८ ॥ तेथ सायुज्यादि चारी मुक्ती । त्यांचे सेवेसी स्वयें येती । ते जेथ विषय सेवूं जाती । तेथ सायुज्यमुक्ती सेवा करी ॥ ४९ ॥ ऋद्धिसिद्धि त्याच्या घरीं । होऊनि राहती कामारी । तरी तो सिद्धींची चाड न धरी । माझे भक्तीवरी निश्चयो ॥ ३५० ॥ ऐशी

भजन करितात. यालाच खरी भक्ति म्हणतात. ३५ त्यांच्या भजनाची आवड आश्चर्यकारक आहे. त्या आवडीनें भजनाची आवड अधिक वाढतच जाते. क्षणोक्षणीं भजनाची चढाओढ लागते. ३६ नित्य भजनप्रेमाची नवी गोडी उत्पन्न होते. माझ्या आवडीनें त्यांचें जीवितसर्वस्व जरी गेलें तरी त्यांच्या चित्तांत बदल होत नाहीं. इतका त्यांचा भक्तीवर विश्वास बसतो. ३७ 'मीच काय तो देवाधिदेव, सर्व प्राण्यांत मीच आहें,' या त्यांच्या भावनेंत कितीहि विकल्प, विकृति, संशय उत्पन्न केले, तरी ते उपजत नाहींत. (म्ह० ते आपल्या भावनेपासून रेंसभरहि ढळत नाहींत.) ३८ त्यांच्या भावार्थाचा महिमा अगाध आहे. ते सर्व स्त्री-पुरुष कुत्रे, डुक्कर, इत्यादि सगळ्या प्राणिमात्रां-मध्ये मद्भाव ठेवून त्यांस मद्भावानेंच नमस्कार करितात. ३९ त्यांच्या भजनाचा प्रकारहि विलक्षणच असतो. ते सायुज्यादि चारी मुक्तींना माझ्या नांवावरून ओंवाळून टाकितात इतकी त्यांस माझी भक्ति आवडते. ३४० मोठालीं विघ्नें किंवा संकटें आलीं असतां ते दुसऱ्यापाशीं दीनपणानें साहाय्य मागण्यास जात नाहींत. रामनामाच्या प्रभावा-पुढें विघ्नें तीं बापडीं काय करणार ! हें ते जाणत असतात. ४१ आकाश कडाडून कोसळलें किंवा पृथ्वी गडबडून उलथून पडली, असें संकट जरी ओढवलें तरी ते श्रीहरीचें नामस्मरण करीत स्वस्थ बसतात. ४२ अशी त्यांची एकनिष्ठ प्रीति पाहून, मी श्रीपति त्यांस भाळतों व मग जात-गोत न पहातां त्यांच्या घरीं धांव घेतों. ४३ ते वैकुंठाचा मार्ग धरीत नाहींत, तर मीच त्यांचें घर वैकुंठ करितों. तेथें ज्ञानाचा उदय होतो व संतांची पेठ वसते. ४४ उपनिषदे त्यांच्या-पाशीं येतात. स्वधर्म सुखानें वस्ती करून रहातो. नारद-सनकादिकांस तर त्यांच्या घरीं जाण्याची अतिशय आवड. ४५ ते माझ्या नामकीर्तीचा गजर करून आवडीनें माझी कीर्ति गातात. माझ्या रामनामापुढें द्वंद्वाची बाधा नाहींशी होते. ४६ अशी माझी भक्ति पाहून आत्मशांति अत्यंत स्नेहानें त्यांच्याकडे धांवत येते आणि एकदां ती आली म्हणजे इतकी प्रेमानें बद्ध होते कीं, ती परत जाण्यासहि विसरते. ४७ त्यांचा छळ करण्यास जेवढे दोष येतात, ते त्यांस भूषणावहच होतात. यालाच माझ्या भक्तीची पूर्ण प्रसन्नता म्हणतात. ४८ तेथें सायुज्यादि चारी मुक्ति स्वतः त्यांच्या सेवेला येतात. ते जेथें विषयांचें सेवन करण्यास जातात, तेथें सायुज्यमुक्ति त्यांची सेवा करिते. ४९ ऋद्धि-सिद्धि त्यांच्या घरीं दासी होऊन रहातात. पण तें त्या सिद्धींचीहि पर्वा करीत नाहींत. माझ्या भक्तीवर त्यांचा सर्व विश्वास असतो. ३५० असा त्यांचा निश्चय पाहून मी त्यांवर अनन्य प्रीति करितों. माझे भक्त माझी जेथें वाट

देखोनि निश्चयें भक्ती । मीही करीं अनन्य प्रीती । भक्त जेउती वास पाहती । तेउता मी श्रीपति स्वयें प्रकटें ॥ ५१ ॥ भक्त स्वभावें बोलों जाये । त्याचें बोलणें मीचि होयें । त्याचें बोलण्या सबाह्यें । मीचि राहें शब्दार्थें ॥ ५२ ॥ तो कौतुकें खेळे खडे । ते खडेचि मज होणें घडे । तो कृपाळु पाहे जयाकडे । त्याचे छेदीं मी गाढे भवबंध ॥ ५३ ॥ तो वास पाहे जेणें मोहरी । तेउती मी सुखाची सृष्टी करीं । तो म्हणे जयातें उद्धरीं । तो मी स्वपदावरी बैसवीं ॥ ५४ ॥ त्यासी अल्पही विंचबू पावे । तो सर्वांगें मी करूं धांवें । त्याचें नाम जिहीं स्मरावें । त्यांसी म्यां तारावें सर्वथा ॥ ५५ ॥ जेवीं तान्हयालागीं माता । तेवीं भक्तांची मज चिंता । त्यांची सेवाही करितां । मी सर्वथा लाजेना ॥ ५६ ॥ माता बाळकाचें पुरवी कोड । तैसे ते माझे लळेवाड । त्यांचें प्रेमचि मज गोड । उपचारचाड मज नाहीं ॥ ५७ ॥ मी शरीर तो माझा आत्मा । प्रेमळ असे पढिया आम्हां । प्रेमळावरती सीमा । भक्तीचा महिमा चढेना ॥ ५८ ॥ त्यासी झणें काळ संहारी । यालागीं त्या आंतबाहेरी । मी निजांगाचें दुर्ग करीं । ऐशी प्रीति पुरी प्रेमळाची ॥ ५९ ॥ तेथ काळाचेनि हटतटें । लावूनि ब्रह्मस्थितीचे वाटे । माझे भक्त नेटेंपाटें । आपणिया आंतवटें स्वसुखें वसवीं ॥ ३६० ॥ त्याचें स्वाभाविक कर्म जाण । तें माझें प्रीतीचें पूजन । तो देखे तें माझें दर्शन । त्याचा चावटी तें स्तवन खुणेचें माझें ॥ ६१ ॥ तो स्वयें करी आरोगण । तेंचि मज नैवेद्यअर्पण । त्याची निद्रा ते जाण । समाधि संपूर्ण पैं माझी ॥ ६२ ॥ त्याचा निमेषोन्मेषांचा व्यापार । तो मज अत्यंत प्रियकर । त्याचे साचे परिचार । मज अपार सुखविती ॥ ६३ ॥ भक्तांची शरीरस्वभावस्थिती । तेणें मी सुखावें श्रीपती । ऐसे सप्रेम भक्त आवडती । माझी अनन्यप्रीती मद्भक्तां ॥ ६४ ॥ चारी पुरुषार्थां नातळती । उपेक्षूनि चारी मुक्ती । सप्रेम करिती माझी भक्ती । मजचि पावती मद्भक्त

पहातात, तेथें मी श्रीपति स्वतः प्रकट होतों. ५१ भक्त सहज जें कांहीं बोलतात, तें त्यांचें बोलणें मी होतों. त्यांच्या बोलण्याला मी सबाह्य शब्दार्थानें व्यापून रहातों. ५२ माझा भक्त कौतुकानें खडे घेऊन त्याबरोबर खेळत असला तर ते खडे होणेंहि मला भाग पडतें. तो ज्याच्याकडे कृपादृष्टीने पहातो त्याचें दृढ भवबंधन मी तोडून टाकितों. ५३ तो ज्या मार्गांत माझी वाट पहातो, तेथें मी सुखाचें राज्य पसरितों. तो ज्याचा उद्धार करावा म्हणतो, त्याला मी माझ्या पदावर बसवितों. ५४ त्यावर यत्किंचित् संकट येतेंसें दिसलें कीं, मी सर्वांगानें त्याचें निवारण करण्यास धांवतों. अशा माझ्या भक्ताचें जे स्मरण करितात, त्यांचें मी सर्वप्रकारें रक्षण करितों. ५५ माता जशी आपल्या तान्ह्या बाळाची काळजी वाहते, तशी मला भक्तांची चिंता असते. त्यांची सेवा करण्यांत मला यत्किंचितहि लाज वाटत नाहीं. ५६ माता जशी बालकाचे लाड पुरविते, तसे माझे भक्त लाडके असतात. त्यांच्या प्रेमाचीच मला आवड असते. उपचारांची मला पर्वा नाहीं. ५७ मी शरीर आणि तो माझा आत्मा. असे प्रेमळ भक्त तर मला अतिशय प्रिय आहेत. भक्तीचा महिमा कितीहि जरी मोठा असला तरी तो या प्रेमळ भक्ताहून अधिक होऊं शकत नाहीं. ५८ काळ कदाचित् त्यांचा संहार करील म्हणून मी आपल्या शरीराचा त्याच्या आंत बाहेर तट घालितों, असें माझें प्रेमळ भक्तावर पूर्ण प्रेम असतें. ५९ तेथें काळाचा निग्रह करून भक्तांना ब्रह्मस्थितीच्या मार्गाला लावून त्यांना माझ्या स्वरूपांतच आत्मसुखानें वसवितों. ३६० भक्ताचें स्वाभाविक कर्म हेंच माझें प्रेमाचें पूजन होय. त्याचें पहाणें हेंच माझें दर्शन. त्याचें सहज बोलणें हेंच माझें लाक्षणिक स्तवन. ६१ तो स्वतः जें जेवतो तेंच मला नैवेद्य समर्पण, आणि त्याची निद्रा हीच माझी समाधि होय. ६२ त्याच्या नेत्राचे निमेषोन्मेषव्यापार मला अत्यंत प्रिय आहेत. त्याची प्रत्येक हालचाल मला अत्यंत सुख देते. ६३ भक्तांच्या शरीरव्यापारानेंच मज श्रीपतीला अत्यंत सुख होतें. असे एकनिष्ठ भक्त मला आवडतात. माझ्या भक्तांचें मजवर अनन्य प्रेम असतें. ६४ जे माझे भक्त चारी पुरुषार्थांना स्पर्शहि करीत नाहींत, चारी मुक्तींची उपेक्षा करून माझी सप्रेम भक्ति करितात, ते माझे भक्त

॥ ६५ ॥ गंगा सागरीं मीनली मिळे । मीनली त्याचीच त्यावरी लोळे । तैसा भक्त मिळोनि भावबळें । माझे भक्तीचे सोहळे । मजमाजीं भोगी ॥ ६६ ॥ जेवीं कां भरें तरुणांगी । तरुणपण भोगी सर्वांगीं । तेवीं भक्त मिळोनि मजलागीं । माझे भक्तीचें भोगी वैभव ॥ ६७ ॥ कां सतरावीचें गोडपण । चंद्र जाणे आपुलें आपण । तेवीं मी होऊनि माझें भजन । भक्त सज्ञान जाणती ॥ ६८ ॥ जाति स्वभावें उदक एक । तेंचि गंगा यमुना नांवीं देख । प्रयागसंगमीं उद्धरी लोक । तेवीं भक्त भाविक मद्योगें ॥ ६९ ॥ तेवीं माझे भक्त मज मिळून । अनन्य करिती माझें भजन । येथ भाविक सात्विक अतिदीन । उद्धरती जाण मद्योगें ॥ ३७० ॥ पृथ्वी निधानें भरली आहे । परी पायाळेंवीण प्राप्ति नोहे । तेवीं आत्मा स्वतःसिद्ध आहे । गुरुकृपा लाहे तैं प्राप्ती ॥ ७१ ॥ चहूं पुरुषार्थातें त्यागिती । चारी मुक्ति उपेक्षिती । पंचम पुरुषार्थाची भक्ती । मज पढियंती उद्धवा ॥ ७२ ॥ येचि भक्तीचें मज कोड । हेचि भक्त माझे लळेवाड । मज अवाप्तकामा त्यांची चाड । ऐसें प्रेम गोड तयांचें ॥ ७३ ॥ आम्ही प्रेमाचे पाहुणे । भावार्थाचे आंदणे । म्यां अनन्याची सेवा करणें । जीवेंप्राणें सर्वस्वें ॥ ७४ ॥ माझें नाम आत्माराम । मी अवाप्तसकळकाम । परी प्रेमळांलागीं सकाम । ऐसें गोड प्रेम तयांचें ॥ ७५ ॥ मग आपुलिये संवसाटीं । प्रेमळू घें मी उठाउठी । वरीव सुखही दें शेवटीं । मज प्रीति मोटी प्रेमाची ॥ ७६ ॥ प्रेम मजसीं मोलें अधिक । संवसाटी करितां देख । यालागीं वरीव देतां सुख । न ये तैं सेवक सेलेचा होय ॥७७॥ प्रेमाचा जिव्हाळा पूर्ण । भावार्थाची उणखूण । जाणता मी एक श्रीकृष्ण । इतरांसी जाण कळेना ॥७८॥ मज गोपिकांची कोण गोडी । त्यांच्या प्रेमाची जाति चोखडी । यालागीं मज त्यांची आवडी । अतिगाढी उद्धवा ॥ ७९ ॥ कुब्जा काय सुंदर होती । तिच्या प्रेमाची मज प्रीती । राधा प्रार्थी मी वनाप्रती । काय विषयासक्तीलागूनी ॥ ३८० ॥ कोण भक्ती केली गोपाळीं । काय तीं सोंवळीं कीं ओवळीं । त्यांचे

मलाच प्राप्त होतात. ६५ गंगा समुद्राला जाऊन मिळाली, म्हणजे त्याच्याशीं जशी एकरूप होते तसा माझा भक्त आपल्या भक्तिबळावर मला येऊन मिळतो, आणि माझ्यामध्येंच भक्तीनें सोहळे भोगितो. ६६ तरुणाच्या अंगीं तारुण्य भरलें म्हणजे तो त्या तारुण्याचा जसा सर्वांगानें उपभोग घेतो त्याप्रमाणें माझे भक्त मद्रूप होऊन माझ्या भक्तीचें वैभव भोगितात. ६७ किंवा चंद्र जसा आपल्या मूळच्या सतराव्या कलेची गोडी स्वतःच जाणितो त्याप्रमाणें मद्रूप होऊन माझी भक्ति कशी करावी हें ज्ञातेच जाणतात. ६८ जल स्वभवतः एकच असतें, पण तें गंगा-यमुना या दोन नावांनीं प्रयागच्या संगमांत लोकांचा उद्धार करितें. ६९ त्याप्रमाणें भाविक भक्त माझ्याशीं एकरूप होतात आणि माझें अनन्य भजन करितात. त्यामुळें भाविक, सात्त्विक व अतिदीन लोकांचा माझ्या ऐक्यानें उद्धार होतो. ३७० पृथ्वी गुप्त ठेवाच्या द्रव्यानें भरली आहे; पण तो ठेवा पायाळु माणसावांचून इतरांस दिसत नाहीं. त्याप्रमाणें आत्मा जरी स्वयंसिद्ध आहे, तरी जेव्हां गुरुकृपा होते तेव्हांच त्याची प्राप्ति होते. ७१ उद्धवा ! जे चारी पुरुषार्थ टाकून देतात, चारी मुक्तींची उपेक्षा करितात त्यांची पांचव्या पुरुषार्थाची भक्ति मला अतिशय प्रिय आहे. ७२ याच भक्तीची मला आवड आहे. हेच भक्त माझे लाडके होत. मज पूर्णकामालाहि ते आवडतात. असें त्यांचें प्रेम गोड असतें. ७३ मी प्रेमाचा भुकेला आहें. मीं भावार्थाला वाहून घेतलेलें आहें. मी त्यांची जीवा-भावानें सर्वस्वानें सेवा करितों. ७४ माझें नांव आत्माराम आहें. मी पूर्णकाम आहें तरीहि मी प्रेमळ भक्ताची इच्छा करीत असतों; इतकें त्यांचें प्रेम गोड आहे. ७५ मी स्वतःचा मोबदला देऊन अगोदर प्रेम घेतों. शेवटीं त्यास सुखहि देतों. मला प्रेमाची अशी मोठी आवड आहे. ७६ प्रेमाची किंमत माझ्याहूनहि अधिक आहे. यास्तव अदलाबदल करतांना मी स्वतःला अर्पण करून वर आणखी सुख देतों. ७७ प्रेमाचा पूर्ण जिव्हाळा व भावार्थाचें लक्षण हें एक मी श्रीकृष्णच जाणें. इतरांना तें कळणें शक्य नाहीं. ७८ उद्धवा ! मला गोपिकांची केवढी आवड ! कारण त्यांचें प्रेम अत्यंत शुद्धस्वरूपाचें होतें. त्यामुळें मला त्यांची अतिशय आवड होती. ७९ कुब्जा काय सुंदर थोडीच होती ! पण तिच्या अनन्य प्रेमाची मला आवड होती. वनांत जाऊन मीं राधेची प्रार्थना केली, ती काय विषयासक्तीनें ! ३८० गोपा-

उच्छिष्ट कवळ मी गिळीं । प्रेमसमेळीं डुल्लत ॥ ८१ ॥ पांडवांच्या बाचें मी काय लागें । त्यांचीं बेबटें सोशीं अनेगें । मी सुदाम्याच्या पाया लागे । काय त्याचेनि पांगें पांगलों ॥ ८२ ॥ मी काय अन्नासी दुकाळलों । तो यज्ञपत्न्यांसी मागों गेलों । मी भावार्थाचा भुकेलों । प्रेमाच्या पावलों पाहुणेरा ॥ ८३ ॥ माझी काय क्षीण झाली शक्ती । मज गोपिका दावीं बांधिती । त्यांच्या निजप्रेमाची जाती । मी स्वयें श्रीपति पोखितू ॥ ८४ ॥ मी न लागतां कोणाची कवडी । अर्जुनाची धूतसें घोडीं । धर्माघरीं उच्छिष्टें काढीं । मज अतिआवडी प्रेमाची ॥ ८५ ॥ मज प्रेमळांची अतिआवडी । ते लोकेषणालाज दवडीं । महत्त्वाच्या विसरवीं कोडी । त्याच्या सेवेची जोडी मजलागीं ॥ ८६ ॥ सकळ अळंकार लेऊनि माता । निजपुत्र मस्तकीं लाडवितां । त्याच्या कंटाळेना थुंकमुता । तेवी प्रेमळें सर्वथा मजलागीं ॥ ८७ ॥ ऐसा-प्रेमाचेनि अतिपांगें । म्यां पंगिस्त होइजे श्रीरंगें । यालागीं तयापुढेमागें । सदा सर्वांगें तिष्ठत ॥ ८८ ॥ उद्धवा यादव समस्त । असतां माझें बहुत गोत । तूंचि प्रियकर मज जो येथ । माझें प्रेम अद्‌भुत तुजलागीं ॥ ८९ ॥ हे ऐकोनि देवाची गोठी । उद्धवें पायीं घातली मिठी । देवो सुखावोनि पोटीं । उठाउठी आलिंगी ॥ ३९० ॥ हृदयीं हृदय जालें संलग्न । देहीं देहा पडिलें आलिंगन । मनेंसीं एक झालें मन । स्वानंदें पूर्ण बोसंडे ॥ ९१ ॥ देवो विसरला देवपण । भक्ता नाठवे भक्तपण । दोघांचें उडालें दोनीपण । स्वानंदीं पूर्ण बुडाले ॥ ९२ ॥ सेव्यसेवकता ठेली गोठी । द्वैतभावाची खुंटली दृष्टी । भक्ति-साम्राज्याच्या पाटीं । दोघां झाली भेटी निजात्मता ॥ ९३ ॥ स्थूळ लिंग आणि कारण । इंहीं उपलक्षिजे महाकारण । ते देहचतुष्टयाची आठवण । आठवितें कोण ते ठायीं ॥ ९४ ॥ तेथ निबिड आणि निघोट । सुखस्वरूप घनदाट । नाहीं आदि मध्य शेवट । तें झालें प्रकट स्वयंभ ॥ ९५ ॥ नवल देवाचें पूर्णपण ।

ळांनीं माझी केवढी भक्ति केली, तेव्हां मी ते सोवळे आहेत किंवा ओवळे आहेत याचा विचार न करितां त्यांचे उष्टे घास खाऊन मी प्रेमरसानें डुलत राहिलों. ८१ पांडवांच्या बापाचें मी काय देणें लागत होतो ! पण त्यांच्यावर आलेलीं अनेक किचाटें मी सोशिलीं. मी सुदाम्याच्या पायां पडलों, तो काय मी त्याच्या पायांचा दास होतो म्हणून ! ८२ माझ्या घरीं काय अन्नाचा दुष्काळ पडला होता, म्हणून मी यज्ञपत्न्यांच्या मागे गेलों ! मी भावाचा भुकेला आहें. प्रेमाचा पाहुणचार घेणारा आहे. ८३ मला गोपिकांनीं दाव्यानें बांधून ठेविलें, तेव्हां माझी शक्ति काय क्षीण झाली होती ! त्यांच्या प्रेमाचा प्रकार मी श्रीपति स्वतःच वाढवितों. ८४ मीं कोणाची एक कवडीहि लागत नसतां अर्जुनाचे घोडे धुतले. धर्मराजाच्या घरीं यज्ञाचे वेळीं ब्राह्मणांची उष्टीं काढिली. अशी मला प्रेमाची अतिशय आवड आहे. मला प्रेमळ भक्ताची अतिशय आवड आहे. ८५ त्यांच्यासाठीं मी लौकिकाची पर्वा करीत नाहीं. मोठ्या महत्त्वाचीं कामेंहि पलीकडे सारितों. त्यांच्या सेवेची इतकी मला गोडी आहे, ८६ माता ज्याप्रमाणें आपल्या बाळाला सगळ्या दागदागिन्यांनीं सजवून मांडीवर घेऊन, त्याचे लाड करीत असतां त्याच्या तोंडांतील लाळींचा किंवा लघ्वीचा कंटाळा करीत नाहीं, त्याप्रमाणें माझे प्रेमळ भक्त मला वाटतात. ८७ अशा प्रेमाच्या दृढ बंधनानें मी श्रीरंग पराधीन होतो. त्यामुळें त्यांच्या मागें व पुढें निरंतर स्वतः तिष्ठत उभा असतों. ८८ उद्धवा ! माझ्या यादवांचें एवढें गोत असतां त्यांतील तूंच मला अतिशय प्रिय आहेस व तुजवरच माझें विलक्षण प्रेम आहे. ८९ हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धवानें त्याच्या पायाला मिठी घातली. तेव्हां देव संतुष्ट होऊन त्यानें त्यास तत्काल आलिंगन दिलें ३९० दोन्ही हृदयें एकमेकाला मिळालीं. देहानें देहाला कवटाळिलें. मनाला मन भेटलें. तेव्हां स्वानंदाला भरती येऊन तो वाहूं लागला. ९१ देव आपलें देवपण विसरला. भक्ताला भक्तपणा आठ-वेनासा झाला. दोघांचा दुजाभाव नाहींसा झाला व ते पूर्ण स्वानंदांत बुडाले ९२ सेव्य-सेवकता बाजूस राहिली. द्वैतभावाची दृष्टि खुंटली. भक्तिसाम्राज्याच्या पीठावर त्या दोघांची आत्मैक्यानें भेट झाली. ९३ स्थूल, सूक्ष्म, कारण या तीन देहांनीं महाकारणदेह पहावयाचा; पण या देहचतुष्टयाची त्यावेळीं आठवण कोणाला होती ! ९४ तेव्हां तेथें घनदाट, परिपूर्ण, आनंदमय, आणि अंतरहित असें स्वरूप प्रकट झालें. ९५ देवाचा पूर्णपणा काय विचित्र

तेथेंही लाघव केलें जाण । मोडों नेदींचि उद्धवपण । ऐसा भक्त आन मज मिळेना ॥ ९६ ॥ उद्धवाऐसा मजपाशीं । कोण मिळेल अळोंचासी । माझें निजगोड कोणापाशीं । म्यां सावकाशीं सांगावें ॥ ९७॥ मज निजधामा गेलिया जाण । माझें जे निःसीम निजज्ञान । त्यासी उद्धव शुद्ध सांठवण । यालागीं उद्धवपण राखिलें ॥ ९८ ॥ उद्धव स्वानंदीं निमग्न । त्यासी थापटूनि आपण । सावध करी श्रीकृष्ण । येरा भक्तपण आठवलें ॥ ९९ ॥ म्हणे जय जय श्रीकृष्णनाथा । जें मज सुख दाविलें आतां । तें नित्य निर्वाहे सर्वथा । ऐशी कृपा तत्त्वतां करावी ॥ ४०० ॥ तंव श्रीकृष्ण म्हणे उद्धवा । हा माझा निजगुह्य गोप्य ठेवा । तुज म्यां सांगीतला कणवा । पुरुषार्थ पांचवा या नांव ॥ १ ॥ हें वेदशास्त्रां अगम्य । सकळ देवांसी अतिदुर्गम । जेणें लुब्धें मी पुरुषोत्तम । तें हें भक्तिप्रेमरहस्य ॥ २ ॥ मज वश्य करावयाचें वर्म । पोटीं धरावें भक्तिप्रेम । चहूं मुक्तींचा पडे भ्रम । पुरुषार्थकाम वोसरे ॥ ३ ॥ ज्यासी माझी सप्रेम भक्ती । त्याचेनि नांवें विघ्नें पळती । मज वेगळी अन्यथा गती । करावया प्राप्ती कोणाची ॥ ४ ॥ जयासी माझी अनन्य भक्ती । तेथ माझी पूर्ण कृपास्थिती । मद्भक्ता मजवेगळी गती । कदा कल्पांतीं असेना ॥ ५ ॥ वेदविधीं करावा बोधू । तो निःश्वासित माझा वेदू । जेथ माझा पूर्ण कृपाबोधू । तेथ विधिवादू बाधीना ॥ ६ ॥ जे कां माझे भक्त सकाम । ते फळभोगांतीं होऊनि निष्काम । तेही ठाकती माझें निजधाम । भक्तां अन्यगमन असेना ॥ ७ ॥ ज्यासी माझें अनन्य भजन । स्वकर्म त्याचे सेवी चरण । विधिवेदू वोळंगे अंगण । त्यासी अन्यथागमन असेना ॥ ८ ॥ जेथ सप्रेम नाहीं माझी भक्ती । तेथ कर्मे अवश्य बाधती । कर्मास्तव अन्यथागती । अभक्त पावती उद्धवा ॥ ९ ॥ जेथ माझी साचार भक्ती । तेथ कर्माची न चले गती । मद्भक्तां माझी प्राप्ती । सत्य निश्चिती

आहे पहा ! तेथेंहि त्यानें लीला दाखविली ! त्यानें उद्धवपणा घालविला नाहीं. कारण त्याला असा भक्त दुसरा कोठेंहि मिळाला नसता. ९६ उद्धवासारखा मला गुजगोष्टी सांगण्यास दुसरा कोण मिळणार ! मीं माझ्या मनांतील हितगुज कोणापाशीं बोलावें. ! ९७ मी निजधामाला गेल्यानंतर माझें जें हें निःसीम आत्मज्ञान, तें उद्धवच सांठवून ठेवील. म्हणून मी त्याचा उद्धवपणा कायम ठेवितों, ९८ असें म्हणून त्यानें स्वानंदांत पूर्ण निमग्न झालेल्या उद्धवाला थापटून सावध केलें. तेव्हां उद्धवाला त्याच्या भक्तपणाची आठवण झाली. ९९ व तो म्हणाला ' हे श्रीकृष्णनाथा ! तुझा जयजयकार असो ! तूं आतां मला जें सुख दाखविलेंस तें नित्य निरंतर कायम रहावें, अशी मजवर कृपा करावी. ४०० तेव्हां तूं श्रीकृष्ण म्हणाला ' उद्धवा ! माझ्या आत्मज्ञानाचा हा अतिशय गूढ व गुप्त ठेवा आहे. तो मीं तुला मोठ्या कृपेनें सांगितला. याला पांचवा पुरुषार्थ म्हणतात. १ वेद-शास्त्रांना अगम्य, सगळ्या देवांना दुर्मिळ व ज्यावर भी पुरुषोत्तमहि लुब्ध होतों, असें हें भक्तिप्रेमाचें रहस्य आहे. २ तें मला वश करण्याचें अचुक साधन आहे. अंतःकरणांत भक्तिप्रेम ठेविलें असतां चारी मुक्तींचा भ्रम नाहींसा होतो. पुरुषार्थाची इच्छा गळून जाते. ३ ज्याची मजवर सप्रेम भक्ति असते, त्याचें नांव ऐकतांच विघ्नें पळून जातात. तेव्हां माझ्यावांचून दुसरी कोणती गति प्राप्त करून घेण्यासारखी असणार ! ४ जे माझी अनन्य भक्ति करितात, त्यांच्यावर माझी पूर्ण कृपा असते. माझ्या भक्तांना माझ्याहून वेगळी गति कल्पांतींहि प्राप्त होत नाहीं. ५ वेदवचनानें उपदेश करावा, तर वेद माझ्या श्वासोच्छ्वासापासूनच व्यक्त झालेला आहे. म्हणून जेथें माझ्या पूर्ण कृपेचा बोध असतो, तेथें वेदविधि बाधत नाहीं. ६ माझे जे सकाम भक्त आहेत ते विषयोपभोग घेऊन निष्काम होतात व माझ्या निजधामाला येतात. माझ्या भक्तांना मजवांचून दुसरी गति नाहीं. ७ जो माझें अनन्य भजन करितो, त्याची स्वकर्मसेवा मी करितों. वेदविधि त्याच्या अंगणांत तिष्ठत बसतात. त्याला मजवांचून दुसरा लोक नाहीं. ८ हे उद्धवा ! परंतु जे माझी सप्रेम भक्ति करीत नाहींत त्यांस कर्मे अवश्य बाधतात व कामनापूर्वक कर्मे केल्यामुळें त्यांस इतर गति प्राप्त होते. ९ जेथें माझी अनन्य भक्ति असते, तेथें कर्मांचें कांहीं चालत नाहीं.

या हेतू ॥ ४१० ॥ भक्तांसी सर्वांभूतीं मद्भावो । तेथ कर्मबंधा कैंचा ठावो । कर्मानुगती खुंटली पहा वो । मत्प्राप्ति स्वयमेवो मद्भक्तां ॥ ११ ॥ भक्त पाऊल ठेवी अवनीं । परी म्यां ठेविलें न धरी मनीं । कर्ता भगवंत सत्य मानी । यालागीं कर्मबंधनीं बांधवेना ॥ १२ ॥ भक्तांस नाहीं अन्यथा गती । मद्भक्तां माझी अनन्य प्रीती । त्या भक्तभावार्थाच्या युक्ती । विशद श्रीपतीं स्वयें त्या केल्या ॥ १३ ॥ 'न मे भक्तः प्रण्यश्यति' । हें बोलिला अर्जुनाप्रती । तें साचार बिरुद श्रीपती । तो भक्तां अन्यगती घडोंचि नेदी ॥ १४ ॥ भक्तशापाची ऐकतां गोठी । देवो कैवारें सवेग उठी । सुदर्शन लावूनि पाठी । केला हिंपुटी दुर्वासा ॥ १५ ॥ एका अंबरीषाकारणें । दहा गर्भवास सोशिलें जेणें । तो अनन्य भक्तांसी उणें । कोण्याही गुणें येवों नेदी ॥ १६ ॥ भक्तकैवारी श्रीकृष्ण । हे भावार्थाची निजखूण । एका जनार्दना शरण । भावो प्रमाण भक्तीसी ॥ १७ ॥ शुद्धभावेंवीण जे भक्ती । तेचि दांभिक जाण निश्चितीं । ते अपक्वचि राहे प्रांतीं । जेवीं कांकड जाती मुगांची ॥ १८ ॥ 'भक्तियोगस्य मद्गती' । हे मूळपदींची पदस्थिती । तेंचि वाढविलें किती । ऐसें श्रोतीं न म्हणावें ॥ १९ ॥ 'मद्गती' या पदाची व्युत्पत्ती । कोण आहे जाणे किती । हें रहस्य जाणे विरळा क्षितीं । यालागीं क्षमा श्रोतीं करावी ॥ ४२० हो कां भक्ति माझी निजजननी । ज्यां प्रेमपान्हा ये वाढवूनी । सरता केलों भगवद्भजनीं । ते म्यां गौण महिमेनीं वानिली ॥ २१ ॥ भगवद्भक्तीचें महिमान । मी केवीं जाणें अज्ञान । जें बोलिलों तें सर्वथा गौण । क्षमा पूर्ण करवी ॥ २२ ॥ भक्ती माझी निजमाउली । ते मी आपुल्या बोबडे बोलीं । ग्रंथाधारें गौरविली । सप्रेम भुली भुलोनि ॥ २३ ॥ प्रेमाची निजजाती कैशी । आठवों नेदी आठवणेसीं । एवं विसरवूनि हेतूसी । भक्तिरहस्यासी बोलविलें ॥ २४ ॥ जेवीं कां निजबाळकातें । माउली बोल बोलवी त्यातें । तेवीं भक्तीनें मज

यास्तव माझ्या भक्तांना निश्चयानें माझीच प्राप्ति होते. ४१० माझे भक्त सर्व भूतांत मद्भाव पहातात. तेव्हां तेथें कर्मबंधाला जागा कोठची ! कर्माची गति खुंटली कीं, माझ्या भक्तांना स्वभवतःच माझी प्राप्ति होते. ११ माझा भक्त जमिनीवर पाऊल ठेविलें तरी तो 'तें मीं ठेविलें' असें मनांत आणीत नाहीं. भगवंत सगळ्या कर्मांचा कर्ता आहे, असें तो समजतो. त्यामुळें कर्में त्याला बद्ध करूं शकत नाहींत. १२ माझ्या भक्तांस दुसरी गति नाहीं. त्यांची मजवरच अनन्य प्रीति असते. त्या भक्ताच्या भावार्थाचीं हीं लक्षणें श्रीपतीनें स्वतः उघड केलीं आहेत. १३ 'न मे भक्तः प्रणश्यति' म्ह० माझा भक्त नाश पावत नाहीं, असें श्रीकृष्णानें अर्जुनाला भारतीय युद्धप्रसंगीं सांगितलें आहे. (सु. गी ९.३१. पृ. १८९) हेंच श्रीपतीचें ब्रीद आहे. त्यामुळें तो भक्तांना अन्यगति प्राप्त होऊं देत नाहीं. १४ भक्ताला शाप झाला आहे, अशी वार्ता कानीं पडतांच देव त्याचा कैवार घेऊन त्वरेनें उठला व आपलें सुदर्शन दुर्वासाच्या पाठीस लावून त्याचा गर्व उतरविला. १५ एका अंबरीषासाठीं ज्या भगवानानें दहा गर्भवास सोशिले, तो आपल्या अनन्य भक्ताचें कोणत्याहि प्रकारें यत्किंचित्‌हि उणें पडूं देत नाहीं. १६ श्रीकृष्ण भक्तांचा कैवारी आहे; हीच भावार्थाची खूणगांठ आहे. एकनाथ जनार्दन स्वामींना शरण जाऊन भक्तांना मोठ्या प्रेमानें वंदन करीत आहे. १७ शुद्ध भावावांचून जी भक्ति ती निश्चयानें दांभिक समजावी. मुगांतील चहाड दहा दिवस भिजत ठेविले तरी जसे अखेरपर्यंत शिजत नाहींत, त्याप्रमाणें दांभिकांची भक्ति शेवटपर्यंत अपरिपक्वच रहाते. १८ मूळ श्लोकांतील 'भक्तियोगस्य मद्गतिः, या एकाच पदाचें व्याख्यान किती वाढविलेंत, असें श्रोत्यांनीं बोलूं नये. १९ कारण 'मद्गतिः' या पदाचा विस्तार केवढा आहे हें जाणणारीं माणसें जगांत विरळाच ! यास्तव श्रोत्यांनीं माझ्या या पाल्हाळाची क्षमा करावी. ४२० भक्ति माझी माताच आहे. तिनेंच मला प्रेमरूपी दूध पाजून वाढविलें व भगवद्भजनांत प्रवीण केलें. तिचेंच मीं अपुऱ्या शब्दांत वर्णन केलें. २१ मी केवळ अज्ञ, भगवद्भक्तीचा महिमा काय जाणें ! मी जें बोललों तें सर्वथा गौणच आहे. तरी श्रोत्यांनीं पूर्ण क्षमा करावी. २२ भक्ति माझी आवडती जननी आहे. तिच्या सप्रेम भक्तीला भाळून मी आपल्या बोबड्या बोलांनीं ग्रंथाच्या आधारानें गौरव केला. २३ प्रेमाचें मूळ स्वरूप कसें आहे, पहा ! तें आठवणीलाहि आठवूं देत नाहीं. त्यामुळें मूळ हेतूचा विसर पडून भक्तिरहस्य बोलविलें. २४ माता जशी आपल्या बालकाकडून बोल बोलविते तसें भक्तीनें माझ्या

केलें येथें । म्यां चुकी कोणातें ठेवावी ॥ २५ ॥ माउलीचें लोभाळूपण । प्रकट करी तो मूर्ख जाण । याहीपरी मी अज्ञान । चुकलेपण दिसताहे ॥ २६ ॥ उडिदीं काळें जेथिंच्या तेथें । तेवीं चुकलेपण माझें येथें । चुकीचि मानावी निश्चितें । हेंही गुरुनाथें वारिलें ॥ २७ ॥ चुकलेपणाचि मानितां । मी हों पाहें कवि कर्ता । मीपण नावडे गुरुनाथा । तेणें तें तत्त्वतां सांडविलें ॥ ॥ २८ ॥ सांग झालिया कथाकथन । तेणें श्लोघें न घ्यावें मीपण । तंव गुरूंनीं दावूनि निजखूण । मीतूंपण उडाविलें ॥ २९ ॥ हेही हो बोल बोलता । मी नव्हें नव्हें गा सर्वथा । मी नव्हें कवि कर्ता । हें गुरूचें तत्त्वतां गुरु जाणे ॥ ४३० ॥ तंव श्रोते म्हणती चमत्कार । भक्तिसुखाचें सुखसार । भक्ति परमामृतसागर । उघड साचार तुवां केला ॥ ३१ ॥ भागवत मुख्य भक्तिप्रधान । जें भक्तीचें सुख सनातन । तें करतळामळ करूनि जाण । तुवां परिपूर्ण दाविलें ॥ ३२ ॥ तुवां हा थोर केला उपकार । तरावया स्त्रियादि शूद्र । जग व्हावया भजनतत्पर । भागवत निजसार काढिलें ॥ ३३ ॥ भागवतींचें गुप्त पीयूख । तें त्वां प्रकटिलें भक्तिसुख । तेणें संत सुखावले देख । श्रोते सकळिक निवाले ॥ ३४ ॥ तुज संतोषोनि श्रीपती । दीधली आपली निजभक्ती । यालागीं तुवां भक्तीची कीर्ति । यथार्थस्थितीं वर्णिली ॥ ३५ ॥ तुझे भक्तीचा एकेक बोल । ब्रह्मसुखेंसी सखोल । त्याहीमाजीं प्रेमाची वोल । येताति डोल चित्सुखें ॥ ३६ ॥ तुज वाखाणितां निजभक्ती । प्रेमें वोसंडे चित्तवृत्ती । विसरोनियां ग्रंथस्फूर्ती । भक्तीची कीर्ती वानिशी ॥ ३७ ॥ निजआवडीं वाडेंकोडें । वानितां भक्तीचे पवाडे । तुज नाठवे मागेंपुढें । प्रेम गाढें जाणवलें ॥ ३८ ॥ जंव जंव भक्तीचें निरूपण । अधिकाधिक वाढतां जाण । तंव तंव येतसे स्फुरण । तेथ कोण पुरे म्हणेल ॥ ३९ ॥ जंव जंव निरूपणा वाढी । तंव तंव भक्तीची अधिक गोडी । तेणें श्रोत्यांचीही आवडी । चडोवढी वाढली ॥ ४४० ॥ करितां भक्तिसुखनिरूपण । श्रोते वक्ते लांचावले जाण । होतां

तोंडून हें वदविलें. यांत मी दोष कोणाला द्यावा ! २५ मातेचा वात्सल्यलोभ जो प्रकट करितो, तो मूर्खच होय. यापेक्षां अज्ञानामुळें चुकलों हेंच म्हणणें; खरें दिसतें. २६ उडिदाचा काळेपणा जसा जागच्या जागींच रहातो त्याप्रमाणें माझी चुकी मानावी; पण श्रीगुरूनें त्याचेंहि निवारण केलें. २७ कारण चूक कबूल केली तर 'मीच काव्यकर्ता आहे' असें मानिल्यासारखें होतें. पण गुरुनाथांना 'मीपणा' मुळींच आवडत नाहीं. त्यांनीं तो खरोखरच सोडावयास लाविलें आहे. २८ संपूर्ण कथा जरी सांगितली तरी त्याच्या अभिमानानें 'मीपणा' पदरीं घेऊं नये. ही आत्मखूण दाखवून गुरूनें 'मीतूंपणा नाहींसा केला. २९ हे बोल बोलणाराहि मी सर्वथा नाहीं हो ! मी कवीहि नाहीं व कर्ताहि नाहीं ! हें गुरूचें गुरूच जाणोत. ४३० तेव्हां श्रोते म्हणाले कीं, काय चमत्कार पहा ! भक्तिपरमामृतसागरांतील भक्तिसुखाचें सारच तूं उघडून दाखविलेंस. ३१ भागवतांत मुख्यत्वेंकरून भक्तीचेंच प्रतिपादन केलें आहे. भक्तीचें शाश्वत सुख तूं तळहातावरील आवळ्याप्रमाणें (हातच्या आरशाप्रमाणें) स्पष्ट करून दाखविलेंस. ३२ स्त्री-शूद्रादिकांस तारण्याकरितां तूं हा मोठा उपकार केलास. जगत् भजनतत्पर व्हावें म्हणून तूं भागवताचें सार काढिलेंस ३३ भागवतांतील गुप्त अमृतच असें भक्तिसुख तूं प्रकट केलेंस. त्यायोगें संत सुखी झाले व सर्व श्रोते तृप्त झाले. ३४ श्रीहरीनें संतुष्ट होऊन आपली भक्ति तुला दिली. त्यामुळें तूं भक्तीचा प्रकार यथार्थ वर्णिलास. ३५ तुझ्या भक्तीचा एकेक शब्द ब्रह्मसुखाहूनहि गंभीर आहे. त्याला प्रेमाचा ओलावा मिळतांच तो चित्सुखानें डोलवूं लागतो. ३६ भक्तीची वाखाणणी करीत असतां तुझी चित्तवृत्ति प्रेमानें भरून जाते. त्यामुळें ग्रंथाची स्फूर्ति बाजूला राहून तूं भक्तीचा महिमा गात बसतोस. ३७ मोठ्या आवडीनें लाडिकपणानें भक्तीचे गुण गात असतां तुला मागचीं पुढचीं कांहीं आठवणहि रहात नाहीं. तुला इतक्या गाढ प्रेमाचें भरतें येतें. ३८ तूं जसें-जसें भक्तीचें वर्णन करितोस तसें-तसें तुझें स्फुरण अधिकच वाढत जातें. तेव्हां पुरे कोण म्हणणार ! ३९ जों जों तुझें निरूपण वाढत जातें तों तों भक्तीची अधिक गोडी लागते. त्यामुळें श्रोत्यांचीहि आवड चढा-ओढानें वाढते. भक्तिसुखाचें वर्णन करीत असतां श्रोते व वक्ता असे दोघेहि

अमृताचें आरोगण । पुरे कोण म्हणों शके ॥ ४१ ॥ यापरी गा अतिप्रीतीं । वाढली निरूपणीं भक्ती । ते आवरूनियां स्फूर्ती । पुढील ग्रंथार्थीं प्रवर्तत ॥ ४२ ॥ हें ऐकोन संतवचन । केलें साष्टांग नमन । भली दीधली आठवण । येरवीं निरूपण नावरतें ॥ ४३ ॥ 'भक्तियोगस्य मद्गती' । ये पदाची पदव्युत्पत्ती । निरूपिली भगवद्भक्ती । जेणें भगवत्प्राप्ती अतिसुलभ ॥ ४४ ॥ हे न करितां भगवद्भक्ती । त्रिगुणगुणीं जीवपंक्ती । बांधिल्या संसारीं उन्मज्जती । तेही स्थिती हरि सांगे ॥ ४५ ॥

मया कालात्मना धात्रा कर्मयुक्तमिदं जगत् । गुणप्रवाह एतस्मिन्नुन्मज्जति निमज्जति ॥ १५ ॥

मुख्य मूळीं मी जगाचा धरिता । स्रष्टरूपें मीचि स्रजिता । विष्णुरूपें मी प्रतिपाळिता । मीचि संहर्ता रुद्ररूपें ॥ ४६ ॥ हे त्रिगुण काळाची काळसत्ता । तो मी निजकाळ तत्त्वतां । स्रजिता पाळिता संहर्ता । गुणावस्थाविभागें ॥ ४७ ॥ जनांचें वासनाकर्म विचित्र । तेचि काळसत्ता निजसूत्र । तेणें रचिला संसार । चराचर गुणबद्ध ॥ ४८ ॥ गुणकर्में स्वर्गा चढे । गुणकर्में नरकीं पडे । नाना योनींचें सांकडें । भोगणें घडे गुणकर्में ॥ ४९ ॥ स्वर्गभोगूनि वाडेंकोडें । महर्जनतपोलोकांपुढें । सत्यलोकवरी वरता चढे । उन्मज्जन घडे या नांव ॥ ४५० ॥ पशुपक्षिस्थावरांत । वृक्षपाषाणकृमित्व प्राप्त । महानरकीं अधःपात । निमज्जन एथ त्या नांव ॥ ५१ ॥ उंचीं चढोनि नीचीं पडणें । भोगवी नाना जन्ममरणें । तें प्रकृतिपुरुषांचें साजणें । जीवबंधनें भोगवी ॥ ५२ ॥

अणुर्बृहत्कृशः स्थूलो यो यो भावः प्रसिध्यति । सर्वोऽप्युभयसंयुक्तः प्रकृत्या पुरुषेण च ॥ १६ ॥

त्यांत लोलुप होतात. अमृताचें भोजन होत असतां त्याला 'पुरे' कोण म्हणूं शकणार ! ४१ याप्रमाणें अतिशय प्रीतीनें निरूपणाची आवड वाढली असतां ती स्फूर्ति आंवरून ग्रंथ पुढें चालविण्यास प्रवृत्त व्हावें. ४२ संतांचें हें भाषण ऐकून एकनाथांनीं त्यांना साष्टांग नमस्कार केला व म्हटलें कीं, तुम्हीं मला बरी आठवण दिलीत. एरवीं माझें वर्णन कांहीं आवरलें नसतें. ४३ 'भक्तियोगस्य मद्गतिः' या पदांच्या व्याख्यानानें भगवद्भक्तीचें निरूपण केलें. त्या भक्तीनें माझी प्राप्ति अतिशय सुलभ होते. ४४ ही भगवद्भक्ति न करितां त्रिगुणांनीं बद्ध झालेले जीव संसारांत कसे जन्म घेतात, तोहि प्रकार श्रीहरि आतां सांगत आहे. ४४५.

—भक्तियोगावांचून इतर गति चंचल आहेत, असें वैराग्यासाठीं सांगतात—

मया कालात्मना धात्रा कर्मयुक्तं इदं जगत् एतस्मिन् गुणप्रवाहे उन्मज्जति निमज्जति—काल हीच ज्याची शक्ति आहे व जो कर्मफलाचा दाता आहे अशा हेतुभूत मज परमेश्वराच्या योगानें कर्मानें युक्त असलेलें हें जगत् या गुणप्रवाहरूप संसारांत सत्यलोकापर्यंत उत्तम गतीला प्राप्त होतें व पुनः स्थावरापर्यंत नीच गतीला प्राप्त होतें १५.

मीच मुळीं जगाला धारण करणारा आहें. ब्रह्मदेवाच्या रूपानें मी उत्पत्ति करणारा आहें. विष्णुरूपानें मीच प्रतिपाळ करणारा आहें व रुद्ररूपानें मीच संहारकर्ता आहें ! ४६ तीन गुण हीच कालाची सत्ता आहे. तोच मी निजकाळ गुणांच्या अवस्थाभेदानें उत्पत्ति-स्थिति-लय करणारा आहें. ४७ लोकांचें वासनाकर्म विचित्र असतें. तेंच काळसत्तेचें सूत्र आहे. त्यानेंच हा गुणांनीं बद्ध असलेला चराचर प्रपंच रचिला आहे. ४८ जीव गुण-कर्मांमुळेंच स्वर्गांत जातो व नरकांत पडतो. त्याला अनेक जन्मांचें संकटहि गुण-कर्मांमुळें भोगावें लागतें. ४९ तो मोठ्या आवडीनें स्वर्ग भोगून महः-जन-तपादि लोकांतून पुढें सत्यलोकांत चढतो. यालाच उन्मज्जन म्ह० उन्नति म्हणतात. ४५० पशु-पक्षि-स्थावरांपर्यंत वृक्ष पाषाण-कृमित्वाला प्राप्त होऊन महानरकांत अधःपात होणें याला निमज्जन म्ह० खालीं जाणें म्हणतात. वर चढणें आणि खालीं पडणें, यांच्या द्वारां जें नानाप्रकारचे जन्म व मरण भोगवितें तें प्रकृति-पुरुषांचें कार्य आहे. जीवाला तेंच बद्ध करितें. ४५२.

—अद्वितीय आत्मज्ञानासाठीं हें सृष्टीचें निरूपण केलें आहे. वास्तव आत्म्याचें प्रतिपादन करण्यासाठीं कारणानें कार्याची व्याप्ति सांगतात—

अणुः बृहन् कृशः स्थूलः यः यः भावः प्रसिध्यति सः सर्वः अपि प्रकृत्या पुरुषेण च उभयसंयुक्तः—सूक्ष्म, मोठा, पातळ, जाड इत्यादि जो जो भाव उत्पन्न होतो, तो सर्वहि प्रकृति व पुरुष या दोहोंनीं युक्त असतो. १६.

अणु म्हणिजे अतिसूक्ष्म सान । बृहत् म्हणिजे विशाळ जाण। कृश म्हणिजे किरकोळपण। स्थूळ तें पूर्ण जडावयवीं ॥ ५३ ॥ जें जें दृष्टिगोचर झालें। जें जें नांवरूपा आलें। तें तें उभययोगें केलें। जाण घडलें प्रकृतिपुरुषीं ॥ ५४ ॥ जें उभययोगसंभव। जग ऐसें ज्याचें नांव। तें प्रकृति-पुरुष सावेव। तिसरा भाव असेना ॥ ५५ ॥ या दोहींवेगळें निरवयव। जेथूनि या दोहींचा उद्भव। तेचि सद्वस्तु सर्वीं सर्व। देवाधिदेव सांगत ॥ ५६ ॥

यस्तु यस्यादिरन्तश्च स वै मध्यं च तस्य सन् । विकारो व्यवहारार्थो यथा तैजसपार्थिवाः ॥ १७ ॥

प्रकृतिपुरुषेंसीं साकार। जें दिसताहे चराचर। त्यासी आद्यंतीं जें अनश्वर। तेंचि साचार मध्येंही ॥ ५७ ॥ लेण्याआधीं कनक एक। लेण्याअंतीं तेंचि आवश्यक। मध्येंही लेणेंरूपें देख। भासे कनक विशुद्ध ॥ ५८ ॥ न करितां मातीचें गोकुळ। पूर्वीं मृत्तिकाची केवळ। गोकुळ मोडल्या सकळ। उरे अविकळ मृत्तिका ॥ ५९ ॥ तेचि गोकुळरुपें असतां। भासे मृतिकाचि तत्त्वतां। तेवीं आदिमध्यअव-सानतां। भासे चित्सत्ता अनश्वर ॥४६०॥ त्रिगुणगुणें सविकार। जें जग दिसताहे साकार। तें मायिक गा चराचर। जेवीं व्यवहार स्वप्नींचा ॥ ६१ ॥ सकळ विकारांचें कारण। अंगें अविद्या आपण। ते विकारीं सत्यता स्थापितां जाण। आलें सत्यपण अविद्येसी ॥ ६२ ॥ अविद्या आपुलेनि नांवें जाण। आपुलें नास्तिक्य सांगे आपण। हें वर्म जाणती सज्ञान। नेणोनि अज्ञान मानिती सत्य ॥ ६३ ॥ अविद्या अविद्यकत्वें मिथ्या जाण। वस्तु वस्तुत्वें सदा संपन्न। येचि अर्थीचें निरूपण। स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ६४ ॥

अणु म्हणजे अतिशय सूक्ष्म, बारिक; बृहत् म्ह० अतिशय मोठें; कृश म्ह० किरकोळ; स्थूल म्ह० पूर्णपणें जड अवयवांनीं युक्त, ५३ अशी जेवढी वस्तु दृष्टोत्पत्तीस येते तेवढी सगळी नांवारूपाला येते, तें सर्व प्रकृति-पुरुषांच्या संयोगानेंच घडतें. ५४ असें जें दोघांच्या संयोगानें उत्पन्न झालेलें तें जगत् होय. प्रकृति-पुरुषांवांचून तिसरा साकार पदार्थच नाहीं. ५५ जें या दोहींहून भिन्न, अवयवरहित व या दोघांच्या उत्पत्तीचें स्थान, तेंच परब्रह्म होय, असें आतां देवाधिदेव सांगत आहे. ४५६.

—आतां कार्याचें कारणरूपत्व दाखवितात—

यः तु यस्य आदिः अंतः तस्य मध्यं सः वै—पण जो पदार्थ ज्या कार्याचें कारण व लयस्थान असतो तोच पदार्थ त्याची मध्यावस्थाहि असतो. (ही गोष्ट मृत्तिका, सुवर्ण इत्यादि कारण द्रव्यांमध्यें प्रसिद्ध आहे.) सन्—म्हणूनच अव्य-भिचारित्वामुळें तोच सत् आहे. दुसरें कांहींहि सत् नाहीं. (तर मग ही मिथ्याभूत कार्याची सृष्टि व्यर्थ आहे, अशी आशंका घेऊन सांगतात—) यथा तैजसपार्थिवाः तथा विकारः व्यवहारार्थः—जसें सोन्याचें कटक, कुंडल इत्यादि अलंकार किंवा मातीचें घट शरावादि पदार्थ केवल व्यवहारोपयोगी असतात, त्याप्रमाणें हा सर्व विकार व्यवहारोपयोगी आहे. १७.

प्रकृति-पुरुषांसह जें हें चराचर साकार दिसतें, तें आरंभीं व अखेर जसें नश्वर तसेंच मध्येंहि जाणावें. ५७ अलंकार घडविण्यापूर्वी जें सोनें असतें, तेंच तो अलंकार मोडल्यावरहि कायम रहातें. मध्यंतरीं दागिन्याच्या रूपानें शुद्ध सोनेंच असतें. ५८ किंवा मातीचें गोपुर बांधण्यापूर्वीं मातीच असते. तें मोडलें तरी मातीच उरते ५९ व गोपुराच्या रूपानें मातीच असते. त्याप्रमाणें आदि-मध्य-अंत या तीन्ही अवस्थांमध्यें अविनाशी ब्रह्मतत्त्वच कायम असतें. ४६० त्रिगुणांमुळें विकार पावलेलें जें साकार जगत् भासत आहे, तें सर्व चराचर स्वप्नांतील व्यवहारासारखें मायिक आहे. ६१ या सगळ्या विकारांचें कारण स्वतः अविद्या आहे. त्या विकारांत मीं आपली सत्यता स्थापिली असतां अविद्येलाहि सत्यता येते. ६२ अविद्या आपल्या नांवानेंच स्वतःचा अभाव सांगत आहे. हें वर्म सज्ञान लोक मात्र जाणतात. इतर सर्व अज्ञजन अविद्येला सत्यच समजतात. ६३ अविद्या तिच्या अज्ञानत्वामुळें मिथ्या आहे आणि आत्मवस्तु स्वतःच्या सत्तत्त्वामुळें सदा संपन्न आहे. याचेंच निरूपण आतां श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ४६४.

यदुपादाय पूर्वस्तु भावो विकुरुते परम्। आदिरन्तो यदा यस्य तत्सत्यमभिधीयते ॥ १८ ॥

प्रकृतिअंगीकारें देख। वस्तूपासाव होती लोक। जेवीं निद्रायोगें एक। होय अनेक निजस्वप्नीं ॥ ६५ ॥ जेवीं तंतूपासाव कोटि पट। कोटि पटीं तंतू एकवट। पाहतां आदि मध्य शेवट। द्वैताचें बोट रिघेना ॥ ६६ ॥ तेवीं वस्तूपासोनियां लोक। प्रकृतिपुरुषादि सकळिक। आदिमध्यअवसानीं एक। द्वैतवार्ता देख असेना ॥ ६७ ॥ तंतु सत्य पट मायिक। वस्तु सत्य अविद्या लटीक। जें आदिमध्य-अवसानीं एक। तें सत्य निष्टंक उद्धवा ॥ ६८ ॥ जेवीं कां काष्ठाची बाहुली। काष्ठावयवें शोभे आली। तेवीं वस्तु वस्तुत्वें एकली। शोभा पावली जगत्वें ॥ ६९ ॥ जेवीं कां एकलें देह देख। दिसे अवयवरूपीं अनेक। तेवीं वस्तु एकली एक। आभासे अनेकस्वरूपीं ॥ ४७० ॥ जेवीं कां जळीं क्रीडतां जळी। उपजवी तरंगांच्या माळा। तेवीं वस्तूचिया स्वलीळा। जगदादि मेळा प्रकाशे ॥ ७१ ॥ तरंगा आदिमध्यअवसानीं। जेवीं पाणीपणें असे पाणी। तेवीं उत्पत्तिस्थितिनिदानीं। वस्तु वस्तूपणीं अनश्वर ॥ ७२ ॥ ब्रह्म सत्य प्रपंच वावो। हा साधका साधावया निर्वाहो। कार्यकारणअभिन्नभावो। देवाधिदेवो बोलिला ॥ ७३ ॥ कार्य कारणीं अभिन्न। तैं ब्रह्मीं माया कैंचि भिन्न। जगद्रूपें ब्रह्म परिपूर्ण। अन्योपदेशें जाण दाविलें ॥ ७४ ॥ ब्रह्म माया काळगती। यें तिन्हीं अनादि म्हणती। तेही न घडे उपपत्ती। येचि अर्थीं हरि बोले ॥ ७५ ॥

—' मग असें जर आहे, तर महदादिकांनाहि आपआपल्या कार्याचें आद्यंतरूपत्व असल्यामुळें सत्यत्व आहे असें म्हटलें पाहिजे, अशी आशंका घेऊन सांगतात—

पूर्वः तु भावः यत् उपादाय परं विकुरुते—पण कारणरूप महदादिभाव ज्या रूपाचा उपादानकारणत्वानें स्वीकार करून अहंकारादि दुसऱ्या भावांना उत्पन्न करितो (जसा मातीचा गोळा मृत्तिकेचा स्वीकार करून स्वतः निमित्तभूत होऊन घटाला उत्पन्न करितो, त्याप्रमाणें जें कारण ज्याचा उपादानकारणत्वानें स्वीकार करून कार्य उत्पन्न करितो, तो उपादान कारणरूप पदार्थच सत् आहे. ' तर मग छान्दोग्यामध्यें घटादि विकार मिथ्या आहे व मृतिकाच सत्य आहे ' असें कसें सांगितलें आहे. छा. भा. ६-१. ४. पृ. ४१३ उत्तर-] यदा (यत्) यस्य आदिः अन्तः (च विवक्ष्यते) तदा तत् सत्यं अभिधीयते—जेव्हां जें ज्याचें कारण व लय-स्थान विवक्षित असतें, तेव्हां तेंच सत्य असें श्रुतीकडून म्हटलें जातें. [परम कारण जो आत्मा तोच सत्य आहे, अशा विवक्षेनें श्रुतीकडून असें म्हटलें जातें.] १८.

निद्रेच्या योगानें आपल्या स्वप्नांत एकच जसें अनेक होतें, त्याप्रमाणें प्रकृतीचा अंगीकार केल्यानें ब्रह्मतत्त्वापासून लोक उत्पन्न होतात. ६५ ज्याप्रमाणें तंतूंपासून कोट्यवधि वस्त्रें उत्पन्न होतात, परंतु कोट्यवधि पटांत तंतूंचें ऐक्य असतें, त्यांत आदि, अंतीं व मध्यें यांतील कोठेंहि जरी पाहिलें तरी तंतूहून भिन्न वस्तूचा लेशहि नसतो, ६६ त्याप्रमाणें वस्तूपासून प्रकृति-पुरुषादि सर्व लोक होतात. त्यांत आदि, मध्य व अंत या तिन्हीं कालीं एक वस्तु असते, द्वैतवार्ता नसते. ६७ तंतु सत्य असून पट जसा मायिक असतो, त्याप्रमाणें आत्मवस्तु सत्य असून माया मिथ्या आहे. कारण हे उद्धवा ! जें आदि-मध्य-अंत, यांत कायम असतें तेंच निर्विकार सत्य जाणावें. ६८ लांकडाची बाहुली जशी लांकडाच्या अवयवानें शोभते, त्याप्रमाणें आत्मवस्तु आपल्या स्वरूपानें एकच असतां जगामुळें तिला शोभा आली आहे. ६९ एकच देह अवयवरूपानें जसा अनेक भासतो, तसें एकच आत्मतत्त्व अनेकरूपानें भासतें. ४७० जलांत जलाची क्रीडा चालली असतां तरंगाची परंपरा उत्पन्न होते, त्याप्रमाणें वस्तूच्या लीलेनें जगदादि समूह भासतो. ७१ लाटांच्या आरंभीं-मध्यें-शेवटीं सर्व जलच असतें. त्याप्रमाणें उत्पत्ति-स्थिति-लय या तीन्ही अवस्थांमध्यें अविनाशी ब्रह्मतत्त्व भरलेलें असतें. ७२ यावरून ' ब्रह्म सत्य व जगत् मिथ्या ' हा सिद्धान्त साधकांना कळावा म्हणून देवाधिदेवानें कार्य-कारणांचा अभिन्नपणा सांगितला. ७३ कार्य जर कारणांत अभिन्न आहे, तर मग ब्रह्मामध्यें माया भिन्न कशी ! जगद्रूपानें ब्रह्म परिपूर्ण आहे, हें भगवानानें अन्योक्तीनें दाखविलें आहे. ७४ ब्रह्म-माया व काळाची गति हीं तिन्ही अनादि आहेत, असें म्हणावें तर तीहि युक्ति पटत नाहीं. याविषयींच आतां श्रीहरि सांगत आहे. ४७५.

प्रकृतिर्ह्यस्योपादानमाधारः पुरुषः परः । सतोऽभिव्यञ्जकः कालो ब्रह्म तत्त्रितयं त्वहम् ॥ १९ ॥

ब्रह्मावेगळी माया । सर्वथा न ये आया । ते ब्रह्माधारें वाढोनियां । गुण कार्यां वाढवी ॥ ७६ ॥ मायानियंतें ब्रह्म आपण । यालागीं यासी पुरुषपण । पुरुषाची प्रिया माया पूर्ण । प्रकृति अभिधान या हेतू ॥ ७७ ॥ ब्रह्माहून पुरुष भिन्न । हें सर्वथा मिथ्या वचन । ब्रह्म पुरुष नामाभिधान । एकसीचि जाण आलें असे ॥ ७८ ॥ माया प्रकृति अभिधान । दोहीं नांवीं मायाचि पूर्ण । आविद्यक दावी कार्य भिन्न । अविद्या जाण या हेतू ॥ ७९ ॥ माया ब्रह्मींची शक्ति जाण । तेही ब्रह्मेंसीं असे अभिन्न । वेगळी नव्हे अर्धक्षण । सदा सुलीन ब्रह्मेंसीं ॥ ४८० जेवीं शूरांची शौर्यशक्ति पूर्ण । शूराहोनि नव्हे भिन्न । तेवीं ब्रह्मीं मायाशक्ति जाण । असे सुलीन सर्वदा ॥ ८१ ॥ माया ब्रह्मीं असतां जाण । क्षोभेवीण नव्हे सर्जन । मायाक्षोभक काळ पूर्ण । काळास्तव जन जन्मती ॥ ८२ ॥ ब्रह्मींची सत्ता तो काळ जाण । प्रकृति क्षोभवूनि आपण । दावी उत्पत्ति स्थिति निदान । तो काळही अभिन्न ब्रह्मेंसीं ॥ ८३ ॥ जेवीं रायाच्या राजपुत्रासी । राजाचि दमूं शके त्यासी । तेवीं झालें जें प्रकृतीचें कुशीं । तें निजसत्तेसी निर्दळी ॥ ८४ ॥ विवेकदृष्टी पाहतां जाण । काळ परमात्मा दोन्ही अभिन्न । प्रकृति पुरुष काळ जाण । तिहींसी एकपण या हेतू ॥ ८५ ॥ ब्रह्म–माया–काळसंबंध । हे तिनी मूळींचि अभेद । दिसे जो व्यावहारिक भेद । तोही अबद्ध मिथ्यात्वें ॥ ८६ ॥ वस्तु एकलीचि आपण । प्रकृतिपुरुष काळरूपें जाण । अखंडत्वें दावितां पूर्ण । तो मी श्रीकृष्ण परमात्मा ॥ ८७ ॥ उत्पत्तीपूर्वीं मी ब्रह्म पूर्ण । उत्पत्तीचें मी

—अहोपण, श्रुतीची अशी विवक्षा जरी असली तरी कोणाचेंहि कार्य नसलेले जे प्रकृति, पुरुष व काल या नांवाचे पदार्थ त्यांना सर्व कार्यांचें निमित्तत्व असल्यामुळें अद्वितीयत्व कसें ! उत्तर—

अस्य सतः उपादानं या प्रकृतिः यः च तस्याः आधारः परः पुरुषः अभिव्यंजकः कालः तत् तु त्रितयं ब्रह्म—या विद्यमान कार्याचें उपादान कारण अशी जी प्रसिद्ध प्रकृति व तिचा अधिष्ठाता जो पर पुरुष आणि गुणक्षोभानें अभिव्यक्त करणारा जो काल हे तिन्ही ब्रह्मरूप मीच आहेत, मजहून पृथक् नाहींत. [कारण प्रकृति माझी शक्ति आहे आणि पुरुष व काल या माझ्या मिथ्या अवस्था आहेत.] १९.

ब्रह्मावांचून माया केव्हांहि साकार होत नाहीं. ती ब्रह्माच्या आधारानें वाढते व गुणकार्यें वाढविते. ७६ ब्रह्म मायेचें नियमन करितें म्हणून त्याला पुरुष म्हणतात. त्या पुरुषाची प्रिय पत्नी माया म्हणून तिला 'प्रकृति' हें नांव प्राप्त झालें. ७७ ब्रह्माहून पुरुष भिन्न आहे, हें बोलणें सर्वथा मिथ्या आहे. कारण ब्रह्म आणि पुरुष हीं दोन्हीं नांवें एकालाच दिलीं आहेत. ७८ त्याचप्रमाणें माया व प्रकृति हीं दोन्हीं नांवें एकाच मायेचीं आहेत. तीच अज्ञानाचें कार्य भिन्न दाखविते, म्हणून तिला अविद्या म्हणतात. ७९ माया वास्तविक ब्रह्माचीच शक्ति असून ती ब्रह्माहून अभिन्न आहे. ती अर्धाक्षणहि त्याच्यापासून दूर होत नाहीं. निरंतर ब्रह्मांतच लीन होऊन रहाते. ४८० शूर पुरुषाचें शौर्य जसें त्याच्याहून भिन्न नसतें, त्याचप्रमाणें ब्रह्मामध्यें मायाशक्ति सर्वदा लीन असते. ८१ ब्रह्मामध्यें माया असून तिचा क्षोभ झाल्यावांचून सृष्टीची उत्पत्ति होत नाहीं. मायेला क्षोभविणारा काळ आहे. त्याच्यामुळें प्राणी जन्मतात. ८२ ब्रह्माची जी सत्ता तोच काळ समजावा. तो प्रकृतीला क्षोभवून उत्पत्ति-स्थिति-लय करितो. तो काळहि ब्रह्माहून अभिन्न आहे. ८३ राजपुत्राला राजाच ताब्यांत ठेवूं शकतो, त्याप्रमाणें आपल्या प्रकृतीपासून उपजलेला काळच आपल्या सत्तेचा नाश करितो. ८४ विचारानें पाहिलें असतां काळ व परमात्मा हे दोन्ही एकच आहेत. यास्तव प्रकृति, पुरुष व काळ या तीन्हींचें ऐक्य आहे. ८५ ब्रह्म-माया-काळ या तीन्हींचा मूळचाच अभेद आहे. त्यांत जो व्यावहारिक भेद दिसतो, तो मिथ्याच आहे. ८६ ब्रह्मतत्त्व एकच असतां काळरूपानें तेंच प्रकृति व पुरुष होतें. पण अखंडत्वानें त्यांची प्रतीति आली म्ह० तोच मी श्रीकृष्ण परमात्मा ८७

बीज आदिकारण । स्थितिकाळीं मी ब्रह्मरूपें जाण । एकीं अनेकपण स्वयें दावीं ॥ ८८ ॥ स्वलीला सृष्टीचे प्रांतीं जाण । प्रळयीं उरें मी ब्रह्म परिपूर्ण । तेंचि अर्थीचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८९ ॥

सर्गः प्रवर्तते तावत्पौर्वापर्येण नित्यशः । महान् गुणविसर्गार्थः स्थित्यन्तो यावदीक्षणम् ॥ २० ॥

महान् म्हणिजे अतिथोरू । पितृपुत्रप्रवाहें संसारू । अनवच्छिन्न निरंतरू । अतिदुर्धरू वाढला ॥ ४९० ॥ अतिशयेंसीं दुर्धरू । कैसेनि वाढला संसारू । तेही अर्थीचा विचारू । शार्ङ्गधरू सांगत ॥ ९१ ॥ विषयांविषें आसक्ती । वासनानिष्ठ झाली वृत्ती । ते देहात्मता अतिप्रीतीं । संसारस्थिती वाढवी ॥ ९२ ॥ खवळला जो देहाभिमान । तो शुद्धासी लावी जीवपण । नाना योनीं जन्ममरण । विशेषें जाण वाढवी ॥ ९३ ॥ ऐसेन अतिदुर्धरू । स्रष्टेन सृजिला संसारू । तो ब्रह्मायूपर्यंत स्थिरू । ब्रह्मप्रळयीं संहारू सृष्टीचा ॥ ९४ ॥ एक नित्यप्रळयो लागला आहे । एक दैनंदिन प्रळयो पाहें । एक कर्मजन्य प्रळयो लाहे । एक तो होये अवांतर प्रळयो ॥ ९५ ॥ सकळ प्रळयांच्या शिरीं । ब्रह्मप्रळयाची थोरी । तो सकळ सृष्टी संहारी । कांहीं संसारी उरों नेदी ॥ ९६ ॥ ब्रह्मप्रळयीं नाश सृष्टीशी । पुढती रचावया कल्पादीसी । उंच नीच नाना योनींसी । नव्या करावयासी कारण काय ॥ ९७ ॥ ब्रह्मप्रळयीं सृष्टीचा ऱ्हासू । परी निःशेष नव्हेचि नाशू । उरे वासना बीजविलासू । सुलीनरहिवासू अविद्येअंगीं ॥ ९८ ॥ तेंचि बीज कल्पादि जाण । मीचि स्रष्टृरूपें आपण । मज म्यां अनुग्रहूनि पूर्ण । सूक्ष्म कारण

उत्पत्तीच्या पूर्वीचें पूर्ण ब्रह्म होतों. मी ब्रह्मच उत्पत्तीचें आदिकारण आहें, स्थितिकाळीं मी ब्रह्मरूपानेंच असतों; मी स्वतःच एकामध्येंच अनेकपणा दाखवितों. ८८ आपल्या लीलेनें सृष्टीच्या शेवटीं व प्रलयकाळीं मीच परिपूर्ण ब्रह्म आहे. त्याविषयींचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ४८९.

—याप्रमाणें ब्रह्म त्रिकालीं अबाधित असल्यामुळें तेंच सत्य आहे असें सांगण्यासाठीं अगोदर सृष्टीच्या आरंभीं सृष्टिकारणत्वानें त्याचें सत्यत्व सांगून, मध्येंहि त्याच्याच सत्त्वाचें उपपादन करून अंतींहि लयाधारत्वानें सत्त्व दाखविणारे भगवान् सृष्टिप्रवाहरूप स्थितीची अवधि सांगतात—

महान् सर्गः तावत् पौर्वापर्येण नित्यशः प्रवर्तते—हा फार मोठा प्रपंच पिता-पुत्रादिरूपानें सतत प्रवृत्त होतो. (कशासाठीं ? उत्तर—) गुणविसर्गार्थः—(गुणांमध्यें) अनेक प्रकारें उत्पन्न केला जातो म्हणून गुणविसर्ग, अर्थात् जीव, त्याच्या भोगासाठीं (पण तो कोठपर्यंत प्रवृत्त होतो ? उत्तर—) स्थित्यन्तः—स्थितीचा अंत होईपर्यंत (स्थितीचा अंत तरी केव्हां होतो ? उत्तर—) ईक्षणं यावत्—परमेश्वराच्या ईक्षणापर्यंत [परमेश्वर लयाविषयीं आलोचन करीपर्यंत सृष्टीची स्थिति होते, असा भावार्थ.] २०.

महान् म्ह० अतिशय मोठा. पिता-पुत्र या परंपरेनें अवाढव्य संसार अपरिमित वाढला आहे. ४९० पण असा हा अनिवार प्रपंच कसा वाढला, त्याचेंहि कारण श्रीहरि आतां सांगत आहे. ९१ विषयासक्तीमुळें वृत्ति वासनेच्या अधीन होते व ती देहात्मबुद्धीनें संसार वाढविते. ९२ एकदां देहाभिमान खवळला म्हणजे तो शुद्ध आत्म्याला जीवपणा देऊन अनेक प्रकारच्या योनींतून जन्म-मरण घेण्यास लावितो. ९३ अशाप्रकारें अतिशय दुष्कर प्रपंच ब्रह्मदेवानें उत्पन्न केला. तो ब्रह्मदेवाचें आयुष्य संपेपर्यंत स्थिर रहातो. ब्रह्मदेवाच्या प्रलयकालीं या सृष्टीचा संहार होतो. ९४ एक नित्य प्रलय, दुसरा दैनंदिन प्रलय, तिसरा कर्मजन्य व चवथा अवांतर प्रलय. ९५ पण या सगळ्या प्रलयांपेक्षां ब्रह्मप्रलयाचा प्रताप फार मोठा आहे. तो सगळ्या सृष्टीचा संहार करितो व प्रपंचाचें नांवहि उरूं देत नाहीं. ९६ ब्रह्मप्रलयाच्या वेळीं सृष्टीचा नाश होतो. ' पण पुनः तिची रचना करिते वेळीं अनेकप्रकारच्या उच्च नीच योनी नव्या करण्याचें कारण काय ?' ९७ ब्रह्मप्रलयाच्या वेळीं जरी सृष्टीचा लय झाला तरी तिचा निःशेष नाश होत नाहीं. मायेमध्यें अत्यंत सूक्ष्मरूपानें वासनाबीज उरतेंच, ९८ तेंच बीज कल्पाचें कारण आहे. मी आपल्या

लक्षविलें ॥ ९९ ॥ जेवीं वर्षाकाळीं नाना तृणें । वाढूनि शरत्काळीं होती पूर्णें । तींच उष्णकाळीं बीजकणें । होती सुलीनें पृथ्वीसीं ॥ ५०० ॥ सुलीन बीजें पूर्ण क्षितीं । परी तीं कोणा व्यक्ती न येती । तेवीं वासनाबीजें प्रळयांतीं । उरे अव्यक्तीं संसारू ॥ १ ॥ जेवीं काळीं वरुषलेनि घनें । बीजें विरूढती सत्राणें । वाढती नाना जातींचीं तृणें । पूर्व लक्षणें यथास्थित ॥ २ ॥ तेवीं उत्पत्ति काळावरी । सूक्ष्मवासना बीजांकुरीं । नाना योनी चराचरीं । जंगमस्थावरीं जग वाढे ॥ ३ ॥ ब्रह्मयाचे प्रळयाआंतु । निःशेष सृष्टीचा नव्हे अंतू । यालागीं संसारीं अनंतू । वेदशास्त्रार्थू प्रतिपादी ॥ ४ ॥ ऐसा संसार अनंतू । याचा निःशेष होय अंतू । तेचि अर्थीं श्रीकृष्णनाथू । श्लोकींचा पदार्थू बोलिला ॥ ५ ॥ ' स्थित्यन्तो यावदीक्षणम् ' । येणें पदें श्रीकृष्ण । अत्यंत प्रळयींचें लक्षण । सूत्रप्राय जाण बोलिला ॥६॥ 'ईक्षण' या पदाचा अर्थ जाण । सद्गुरुकृपादृष्टि पूर्ण । तेंचि माझें कृपावलोकन । जेणें ब्रह्मज्ञान प्रकाशे ॥ ७ ॥ पूर्ण प्रकाशल्या ब्रह्मज्ञान । संसार झाला नाहींच जाण । वस्तु वस्तुत्वें परिपूर्ण । मीतूंपण असेना ॥ ८ ॥ तेथ ध्रुवमंडळाची ठेली मात । वैकुंठ कैलासा झाला प्रांत । शेषशायीचाही अंत । ब्रह्मज्ञानांत होऊं सरला ॥ ९ ॥ हारपलें मीतूंपण । उडालें देव भक्त भजन । बुडालें साकारतेचें भान । ब्रम्ह सनातन सदोदित ॥ ५१० ॥ प्रपंच एक झाला होता । हे समूळ मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । कदा कल्पांता घडेना ॥ ११ ॥ हें अत्यंत प्रळयाचें लक्षण । भाग्येंवीण न पाविजे जाण । ज्यासी साचार सद्गुरुचरण । ते सभाग्य जन पावती ॥ १२ ॥ अत्यंत प्रळयींची गती । न घडे गा समस्तांप्रती । हे परम निर्वाणगती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ १३ ॥ ज्याची अहंममता खुंटे । त्याची निःशेष कल्पना तुटे । अत्यंत प्रळयो त्यासीच भेटे । नेटेंपाटें निजात्मतां ॥ १४ ॥ देह पडलिया हा प्रळयो घडे । हें बोलणें सर्वथा कुडें ।

वरच पूर्ण अनुग्रह करून स्वतःला स्रष्टा या रूपानें सूक्ष्मकारण सुचविलें. ९९ ज्याप्रमाणें पावसाळ्यांत अनेक प्रकारचें गवत उगवतें, तें वाढून शरदृतूंत पक्व होतें आणि उन्हाळ्यांत त्याचें सूक्ष्म बीज जमिनींत मिळून जातें, ५०० पृथ्वी त्या लीन झालेल्या बीजानें पूर्ण भरलेली असते; परंतु तीं बीजें कोणाला दिसत नाहींत, त्याप्रमाणें प्रलयकालीं वासनाबीजरूपानें प्रपंच अव्यक्तांत भरून रहातो. १ पुनः पावसाळ्यांत जेव्हां पाऊस पडतो, तेव्हां तें बीज मोठ्या जोमानें उगवतें व पूर्वीच्या जातीचें नानाप्रकारचें तृण वाढतें. २ त्याप्रमाणें सृष्टीच्या उत्पत्तिकालीं सूक्ष्म वासनारूपी बीजांना अंकूर फुटून नाना योनींनीं युक्त असलेलें चराचर–स्थावरजंगम जगत् वाढतें. ३ ब्रह्मदेवाच्या प्रलयसमयीं सृष्टीचा निःशेष नाश होत नाहीं. म्हणूनच वेद-शास्त्रांनीं ' संसार अनंत आहे ' असें प्रतिपादन केलें आहे. ४ ' असा जो अनंत संसार त्याचा निःशेष अंत होतो ' याविषयींच श्रीकृष्णनाथानें श्लोकांतील पदाचा अर्थ सांगितला. ५ मूळ श्लोकांतील ' स्थित्यंतो यावदीक्षणम् ' या पदानें श्रीकृष्णानें अत्यंत प्रलयाचें लक्षण संक्षेपानें सांगितलें. ६ ' ईक्षण ' या पदाचा अर्थ सद्गुरूची पूर्ण कृपादृष्टि असा आहे. तेंच माझें ब्रह्मज्ञानाला प्रकाशित करणारे कृपावलोकन होय. ७ एकदां पूर्ण ब्रह्मज्ञान झालें म्हणजे संसार नसल्यासारखाच होतो, ब्रह्म ब्रह्मानें भरून जातें व ' मी-तूंपणा ' उरत नाहीं. ८ तेथें ध्रुवमंडळाचें नांवहि रहात नाहीं. वैकुंठ-कैलासाचाहि शेवट होतो व त्या ब्रह्मज्ञानांत शेषशायीचाहि अंत होतो.९ ' मी तू'पणा नाहींसा होतो. देव, भक्त व भजन हा भेद बुडून जातो, साकारतेचें भान नाहींसें होतें व सदोदित सनातन ब्रह्म भरून रहातें. ५१० पूर्वीं एक प्रपंच होता, ही गोष्ट खोटी वाटते. पुनः पुढें होईल असें कल्पांतींहि घडत नाहीं. ११ हें अत्यंत प्रलयाचें लक्षण भाग्यावांचून दुसऱ्या कोणाला कळत नाहीं. ज्यांस सद्गुरुचरण लाभतात त्या भाग्यवानांसच तें कळतें. १२ उद्धवा ! अत्यंत प्रलयाची गति सगळ्यांनाच कळत नाहीं. पण तूं हीच परम निर्वाणीची गति आहे हें निश्चित समज. १३ ज्याची अहंममता खुंटते त्याच्याच कल्पना निःशेष तुटतात आणि त्यालाच अत्यंत प्रलय भेटतो. त्यामध्यें पूर्ण निजात्मता प्राप्त होते, १४ देह पडल्यावर हा प्रलय

जितांचि हा प्रळयो जोडे । वाडेंकोडें निजनिष्ठां ॥ १५ ॥ जितांचि हा प्रळयो जाण । येणें संसारबीजदहन । आतां ब्रह्मप्रळयलक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ १६ ॥ ब्रह्मांडप्रळयाचा अनुक्रम । तेथ अंतीं उरे पूर्ण ब्रह्म । हें उद्धवें जाणावया वर्म । पुरुषोत्तम बोलत ॥ १७ ॥

विराण्मयाऽऽसाद्यमानो लोककल्पविकल्पकः । पञ्चत्वाय विशेषाय कल्पते भुवनैः सह ॥ २१ ॥

चतुर्दशभुवनेंसीं ब्रह्मांड । काळें कल्पिलें प्रचंड । तें स्थितिकाळीं पाळूनि अंड । अंतीं नाशाचें बंड आदरी काळू ॥ १८ ॥ तो तूं काळ म्हणशी कोण । तरी काळात्मा मीचि जाण । तेणें काळें म्यां प्रळयईक्षण । केलें जाण सृष्टीसी ॥ १९ ॥ पंचभूतांचे भिन्न भाग । काळसत्ता राखिले विभाग । ते सत्ता म्यां आवरितां सांग । खवळे लगबग पंचत्वाची ॥ ५२० ॥ जैसा उत्पत्तीचा उपक्रमू । तैसाचि प्रळयाचा अतिक्रमू । भूतीं भूतलयो सुगमू । पुरुषोत्तमू सांगत ॥ २१ ॥

अन्ने प्रलीयते मर्त्यमन्नं धानासु लीयते । धाना भूमौ प्रलीयन्ते भूमिर्गन्धे प्रलीयते ॥ २२ ॥

म्यां पाहिल्या प्रळयदृष्टीं । पडोनि ठाके अनावृष्टी । तेणें अन्न क्षीण होय सृष्टीं । अन्नापाठीं शरीर ॥ २२ ॥ येथ असे 'अन्नमय प्राण' । हें वचन प्रत्यक्ष प्रमाण । तें अन्न होतांचि क्षीण । अन्नासवें

घडतो हें म्हणणें सर्वथा मिथ्या आहे. कारण आत्मनिष्ठांना जिवंतपणींच हा प्रलय प्राप्त होतो. १५ यानेंच संसाराला कारण होणाऱ्या बीजांचा नाश होतो. आतां ब्रह्मप्रलयाचे लक्षण पूर्णपणें सांगतों, ऐक. १६ ब्रह्माण्डप्रलयाच्या अनुक्रमांत शेवटीं पूर्ण ब्रह्म उरतें, हें वर्म उद्धवाला कळावें, म्हणून पुरुषोत्तम सांगत आहे. ५१७.

—आतां प्रलयाचें आलोचन करितात—

विराट् मया आसाद्यमानः लोककल्पविकल्पकः अपि भुवनैः सह पञ्चत्वाय विशेषाय कल्पते—विराट् म्ह० ब्रह्माण्ड. कालरूप मजकडून व्यापिलें जाणारें तें लोकांचें प्रतिदिवशीं ज्यांत विविध उत्पत्तिप्रलय होत आहेत असें जरी असलें तरी सर्व भुवनांसह पंचत्वरूप विभागाला योग्य होतें [ज्यांत प्रतिदिवशीं लोकांचे असंख्य जन्म व नाश होत आहेत, अशाहि या ब्रह्माण्डाला कालरूप झालेल्या मीं व्यापिलें असतां तें ब्रह्माण्ड पंचभूतरूप विभागाला पात्र होतें. ब्रह्माण्ड पंचभूतांच्या ऐक्यरूपानें जरी बनलेलें असलें तरी त्या भूतांचा परस्पर वियोग झाल्यानें त्याचा नाश होतो, असा त्याचा भावार्थ.] २१.

काळानें चतुर्दशभुवनांसह प्रचंड ब्रह्माण्ड कल्पिलें आहे. त्याचे स्थितिकाळीं पालन करून शेवटीं काळ त्याच्या नाशाचें बंड उभारितो. (म्ह० ब्रह्माण्डाचा नाश करितो.) १८ तो काळ कोण असें जर तूं विचारशील तर कालात्मा मीच आहें. त्याच काळरूपानें मीं सृष्टीचा संहार करण्याच्या इच्छेनें ईक्षण केलें. १९ पंचभूतांचें भिन्न भाग करून काळसत्तेनें जे विभाग केले त्या विभागांची सत्ता मीं सांगोपांग आवरून धरिली असतां पंचत्वाची खळबळ उडते. ५२० उत्पत्तीचा आरंभ जसा होतो, तसाच प्रलयाचा अनुक्रम असतो. भूतांचा भूतांमध्यें सहज लय होतो. हेंच पुरुषोत्तम सांगत आहे. ५२१.

तैत्तिरीयांत ' आत्म्यापासून आकाश, आकाशापासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नीपासून जल, जलापासून पृथ्वी, पृथ्वीपासून ओषधि, ओषधिपासून अन्न व अन्नापासून पुरुष उत्पन्न होतो ' असा जो सृष्टीचा क्रम सांगितला आहे, तै. भा. २. १. पृ. ८७. त्याच्या उलट लयाचा क्रम सांगतात—

मर्त्यं अन्ने प्रलीयते—शरीर ज्याच्या योगानें वाढतें तें अन्न शतवार्षिक अनावृष्टीनें क्षीण झालें असता त्यांतच लीन होतें, अन्नं धानासु लीयते—अन्न आपल्याबीजामध्यें लीन होतें, धानाः भूमौ प्रलीयन्ते—विविध बीजें पृथ्वीमध्यें लीन होतात. भूमिः गन्धे प्रलीयते—प्रलयकालीन सूर्यांनीं शुष्क केलेली व संकर्षणाच्या मुखाग्नीनें दग्ध झालेली भूमि भूतसूक्ष्मरूप गंधमात्र अवशिष्ट रहाते. २२.

मीं प्रलयाच्या दृष्टीनें पाहिलें असतां अनावृष्टि होते व त्यामुळें सृष्टींतील सगळें अन्न क्षीण होतें आणि त्यामुळेंच शरीरेंहि क्षीण होतात. २२ ' अन्नमय प्राण ' हें वचन याविषयीं प्रत्यक्षप्रमाण आहे. तें अन्न कमी झालें

प्राण प्राण्यांचे जाती ॥ २३ ॥ अन्नवृद्धि खुंटल्या धान्य । बीजमात्र राहे आपण । तेंही पृथ्वीसी होय लीन । तत्काळ जाण उद्धवा ॥ २४ ॥ तंव द्वादशादित्यमेळा । एकत्र होय रविमंडळा । तो पीठ करी पर्वतशिळा । तेही तृणसाळा उरों नेदी ॥ २५ ॥ तेणें तापले सप्तपाताळ । पोळलें शेषाचें कपाळ । तो वमी विषाग्निकल्लोळ । महाज्वाळा धडधडीत ॥ २६ ॥ तो संकर्षणमुखानळ । पार्थिव जाळी सकळ । ब्रह्मांड जाळोनि तत्काळ । पृथ्वी केवळ भस्म करी ॥ २७ ॥ तेव्हां पृथ्वीचें पृथ्वीपण सरे । तें गंधमात्र-स्वरूपें उरे । तोही गंधू जळीं विरे । तेंचि शार्ङ्गधरें सांगिजे ॥ २८ ॥

अप्सु प्रलीयते गन्ध आपश्च स्वगुणे रसे । लीयते ज्योतिषि रसो ज्योती रूपे प्रलीयते ॥ २३ ॥

तेव्हां प्रळयमेघांचा मेळा । शुंडादंडधारा प्रबळा । शत वरुषें वर्षतां जळा । सप्तसमुद्रमेळा एकत्र जाहला ॥ २९ ॥ तेणें जळ कोंडलें सुबद्ध । ते जळीं पृथ्वीचा विरे गंध । तेव्हां जळचि एकवद । प्रळयीं प्रसिद्ध उधवलें पैं ॥ ५३० ॥ सांवर्तक मेघांचें लक्षण । सिंधु एकत्र करिती पूर्ण । पृथ्वी विरवूनियां जाण । ते जळीं आपण विरोनि जाती ॥ ३१ ॥ ते काळीं अतिदुर्धर । सांवर्ताग्नि खवळे थोर । तो जळ शोषी सर्वत्र । उरे रसमात्र अवशेष ॥ ३२ ॥ रसमात्र जळ उरे तेंही । लीन होय तेजाचे ठायीं । तेव्हां तेजचि दिशा दाही । कोंदोनि पाहीं वोसंडे ॥ ३३ ॥ सांवर्तकाग्नीची मातू । जळ शोषूनि राहे निवांतू । जाळिती शक्ति स्वयें जाळितू । या नांव निश्चितू सांवर्तकाग्नी ॥ ३४ ॥ तेणेंचि काळें झंझामा-रुत । उठी तेजातें शोषित । तें तेज शोषितां समस्त । उरे तेथ रूप मात्र ॥ ३५ ॥

म्हणजे सर्व प्राणिमात्रांचे प्राण निघून जातात. २३ अन्नाची वाढ खुंटली तरी धान्य बीजरूपानें रहातें व तें भूमीमध्यें तत्काल लीन होतें. उद्धवा ! २४ बारा आदित्यांचा समुदाय रविमंडळांत जमतो व आपल्या उष्णतेनें पर्वत-पाषाणांचेंहि भस्म करितो. त्यावर गवत, साळी इत्यादि कांहीं उरूं देत नाहीं. २५ त्यानें सप्त पाताळ तापतात व शेषाचें कपाळ पोळून निघतें. तेव्हां तो विषयुक्त अग्नीच्या भयंकर ज्वाला बाहेर सोडितो, २६ तो शेषाच्या मुखांतील अग्नि पृथ्वीतील सर्व वस्तु जाळून टाकितो. सगळें ब्रह्माण्ड जाळून तत्काल पृथ्वीचें नुस्तें भस्म करितो. २७ त्यावेळीं पृथ्वीचा पृथ्वीपणा जाऊन ती केवळ गंधमात्र उरते; पण तो गंधहि जलांत विरून जातो, असें आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ५२८.

गन्धः अप्सु प्रलीयते—शतवार्षिकी वृष्टीनें वाहून नेला जाणारा गंध जलांत लीन होतो, आपः च स्वगुण रसे— आणि ज्योतीकडून सुकविलें जाणारें आप, आपला गुण जो रस, त्यांत लीन होतें. (तें रसमात्र अवशिष्ट रहातें.) रसः ज्योतिषि लीयते—रसहि त्या ज्योतीमध्यें लीन होतो. ज्योतिः रूपे प्रलीयते—आणि वायूनें पराभूत झालेलें तेज रूपमात्र होऊन त्यांतच लीन होतें. २३.

त्यावेळीं प्रलयकाळच्या मेघांचा समुदाय एकत्र होऊन हत्तीच्या सोंडेसारखी मुसळधार वृष्टि होते. शंभर वर्षें असा पर्जन्य पडला म्हणजे सात समुद्रांचें जल एकत्र होतें, २९ त्यामुळें सर्व प्रदेश जलमय होतो. त्यांत पृथ्वीचा गंध विरून जातो. तेव्हां जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन जातें. तेंच प्रलय सिद्ध करितें. ५३० प्रलयकाळाचे मेघ सगळ्या नद-नद्यांना एक करून त्यांत पृथ्वीला बुडवून शेवटीं ते स्वतःहि त्यांतच लीन होतात. ३१ त्यावेळीं अतिशय भयंकर प्रलयाग्नि खवळतो व तो सगळें जल शोषून घेतो. तेव्हां केवल रसतन्मात्र अवशिष्ट रहातें. ३२ तें रसमात्र उरलेलें जलहि तेजामध्यें लीन होतें व तेज दहाहि दिशांना व्यापून सोडतें. ३३ प्रलयाग्नि इतका विलक्षण असतो कीं, तो जल शोषून निश्चल रहातो. आपल्या जाळणाऱ्या शक्तीला स्वतःच जाळून टाकितो, यास्तव त्याला प्रलयाग्नि म्हणतात. ३४ त्याचवेळीं सोसाट्याचा वारा सुटतो व तो तेजाला शोषून घेतो. तें तेज सगळें शोषून घेतल्यावर तेथें केवल रूपमात्र उरतें. ५३५.

रूपं वायौ स च स्पर्शे लीयते सोऽपि चाम्बरे । अम्बरं शब्दतन्मात्र इन्द्रियाणि स्वयोनिषु ॥ २४ ॥

तेजाचें जें उरे रूप । तें वायु शोषूनि करी अरूप । तेव्हां वायूचि एकरूप । अतिअमूप कोंदाटे ॥ ३६ ॥ कोंदाटल्या वायूसी । गगन जेथींचें तेथें ग्रासी । तेव्हां वायू प्रवेशे स्पर्शीं । तो उरे अवशेषीं स्पर्शमात्र ॥ ३७ ॥ उरल्या वायूच्या स्पर्शासी । लयो तत्काळ होय आकाशीं । आकाश प्रवेशे शब्दासीं । उरे अवशेषीं शब्दतन्मात्र ॥ ३८ ॥ दशेंद्रियांची मंडळी । राजसापासोनि जन्मली । ते निगुणीं सामावली । जेवीं पंचांगुळी मुष्टीमाजीं ॥ ३९ ॥

योनिर्वैकारिके सौम्ये लीयते मनसीश्वरे । शब्दो भूतादिमप्येति भूतादिर्महति प्रभुः ॥ २५ ॥

वैकारिक जो सत्वगुण । व्याला देवता अंतःकरण । प्रळयस्वभावें आपण । मनामाजीं जाण प्रवेशे ॥ ५४० ॥ सकळ इंद्रियांचा राजा मन । मनःकल्पना जीवशिवपण । श्लोकपदें ' मनसीश्वर ' पूर्ण । मनाशींच जाण हरि बोले ॥ ४१ ॥ मनो देवता अंतःकरण । घेऊनि प्रवेशे सत्वगुण । ज्या कार्याचें जें कारण । तेथ ती जाण प्रवेशती ॥ ४२ ॥ शब्दतन्मात्र उरलें आधीं । तें मीनलें तामसामधीं । कारणीं कार्यासी अवधी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ४३ ॥ त्रिविधगुणी अहंकारू । एकवटला महाथोरू ।

रूपं वायौ सः च स्पर्शे सः अपि च अंबरे लीयते– रूप वायूमध्यें लीन होतें. कालप्रेरित आकाशानें ग्रासलेला वायु स्पर्शमात्र होऊन त्या स्पर्शतन्मात्रांतच लीन होतो. तें स्पर्शतन्मात्रहि आकाशांत लीन होतें. अम्बरं शब्दतन्मात्रे–भूतांचें कारण असा जो अहंकार त्याच्याकडून ग्रासलें जाणारें आकाश शब्दतन्मात्रांत लीन होतें. (याप्रमाणें तामस अहंकाराच्या कार्यांचा शब्दापर्यंत लय सांगून राजसाहंकारकार्यांचाहि लय सांगतात–) इंद्रियाणि स्वयोनिषु–इंद्रियें आपापल्या कारणामध्यें म्ह० स्वप्रवर्तक देवतांमध्यें लीन होतात. [इंद्रियांना प्रवृत्तिस्वभावत्व आहे व प्रवृत्ति देवतांच्या अधीन असते, म्हणून येथें देवतांमध्यें इंद्रियांचा लय सांगितला आहे. पण वस्तुतः त्यांचा लय, त्यांचें कारण जो राजसाहंकार त्यांत अभिप्रेत आहे.] २४.

तेजाचें जें रूप उरतें तेंहि वायु शोषून नाहींसें करितो. तेव्हां सर्वत्र एक वायुच भरून रहातो. ३६ त्या कोंडलेल्या वायूला आकाश जागच्या जागीं गिळून टाकितें; तेव्हां वायु स्पर्शांत प्रवेश करितो. व तो स्पर्शमात्र उरतो. ३७ त्या उरलेल्या वायूचा तत्काल आकाशांत लय होतो. आकाश शब्दांत लीन होतें व केवल शब्दतन्मात्र उरतें. ३८ दश-इंद्रियांचा संघ राजसगुणापासून उद्भवला आहे. त्यामुळें तो मुठींत जशीं पांच बोटें रहातात तसा आपल्या गुणांत लोपतो. ५३९.

योनिः वैकारिके सौम्ये मनसि ईश्वरे लीयते–त्या देवता चंद्र ही ज्याची देवता आहे अशा सात्त्विक मनामध्यें म्ह० त्या देवतांच्या नियंत्यामध्यें लीन होतात. (इंद्रियलयाच्या वेळीं सांगितलेलाच न्याय येथें समजावा. म्ह० मन देवतांसह सात्त्विक अहंकारांत लीन होतें, असा याचा भावार्थ. आतां तामस अहंकाराच्या कार्यांतून अवशिष्ट राहिलेला जो शब्द त्याचा लय सांगतात–) शब्दः भूतादिं अप्येति–शब्द तामस अहंकारांत लीन होतो. भूतादिः प्रभुः महति–त्रिविध अहंकारहि सर्व जगाला मोह पाडणारा असल्यामुळें समर्थ आहे; तो महत्तत्त्वामध्यें लीन होतो. [म्ह० आपला जडांश टाकून ज्ञानक्रियाशक्तिमात्ररूप होतो. या श्लोकांतील पहिला ' योनिः ' हा शब्द एकवचनी आहे. तो उद्देश्य स्थानीं असल्यामुळें त्याचें एकत्व विवक्षित आहे; तथापि त्याचा अर्थ ' योनयः ' म्ह० देवता असा करावा. तसेंच ' भूतादिः ' हा शब्द तामसाहंकार या अर्थीं जरी प्रथम योजिला आहे, तरी शेवटीं उपलक्षणानें त्रिविध अहंकार असा त्याचा अर्थ करावा.] २५.

विकारयुक्त सत्त्वगुणापासून देवता व अंतःकरण उत्पन्न झालें व प्रलयरूपानें त्यानें स्वतः मनांत प्रवेश केला. ५४० मनच सगळ्या इंद्रियांचा राजा आहे. जीव-शिवपणा मनःकल्पित आहे, म्हणून श्लोकांत त्याला ' मनसीश्वर ' म्हटलें आहे. ४१ मनाची देवता जें अंतःकरण त्याला घेऊन सत्त्वगुणांत प्रवेश करिते. कार्याचें जें कारण असतें त्यांतच तीं प्रवेश करितात. ४२ उरलेलें शब्दतन्मात्र तमोगुणांत प्रवेश करितें. म्हणजे हे उद्धवा ! कार्य कारणांत लय पावतें. ४३ त्रिगुणांनीं युक्त असलेला अहंकार एकरूप व फार मोठा झाला. त्याची थोरवी सांगतों, ऐक. संसारांत तोच दुर्धर आहे. ४४ तोच शिवाचें महत्त्व वाढवितो. जीवाला देहतादात्म्यांत गुंतवितो.

ऐक त्याचा बडिवारू । तोचि दुर्धरू संसारीं ॥ ४४ ॥ जो शिवातें महत्त्वा चढवी । जीवातें देहात्मता गोंवी । अहंममता जग भुलवी । प्रभुत्वपदवी महत्तत्त्वें येणें ॥४५॥ अहंकारू ऐसा आहे । तो जैं परमार्थीं साह्य होये । तैं सोहंभावाचेनि लवलाहें । विभांडी पाहे संसारू ॥ ४६ ॥ चोर जैं विश्वासू मित्र होये । तैं चोर चोरा निवारी पाहें । तेवीं अभिमानू जैं साह्य होये । तैं भवभय बाधीना ॥ ४७ ॥ याहीपरी अभिमान । सामर्थ्यें अतिगहन । यालागीं प्रभुत्वें जाण । केलें व्याख्यान उद्धवा ॥ ४८ ॥ त्रिगुणगुणीं गुणाभिमान । एकत्र होऊनिया पूर्ण । महत्तत्त्वीं होय लीन । अतिसुलीन तद्रूपें ॥ ४९ ॥

स लीयते महान्स्वेषु गुणेषु गुणवत्तमः । तेऽव्यक्ते संप्रलीयन्ते तत्काले लीयतेऽव्यये ॥ २६ ॥

तेंही महत्तत्त्व येथें । कारणगुणीं लीन होतें । तेंही गुणसाम्य निश्चितें । पावे लयातें अव्यक्तीं ॥ ५५० ॥ आकारविकार समस्त । हारपोनि जाती जेथ । उरे बीजमात्र अवशेषित । त्या नांव अव्यक्त बोलिजे ॥ ५१ ॥ वटाचा आकारविकार । ना शेंडा मूळ पुष्प पत्र । उरे अवशेष बीजमात्र । तेवीं संसार अव्यक्तीं ॥ ५२ ॥ वटबीज उरले येथ । तें दृष्टीसी तर्केना निश्चित । तेवीं भवबीज जें अव्यक्त । तें नव्हे व्यक्त जीवासी ॥ ५३ ॥ नाना तृणजातिबीज गहन । उष्णकाळीं काळ करी लीन । तेवीं भवबीज अव्यक्त जाण । होय सुलीन काळेंसीं ॥ ५४ ॥ पूर्वीं काळें क्षोभोनि अव्यक्त । जगदाकारें केलें व्यक्त । तेचि काळयोगें अव्यक्त । सुलीन होत काळेंसीं ॥ ५५ ॥ या नांव अव्यक्ताचा पहा हो । काळामाजीं बोलती लयो । काळ बोलिजे महाबाहो । त्याचा होय व्ययो पुरुषेंसीं ॥ ५६ ॥

अहं-ममतेनें जगत् भुलवितो. याच्याचमुळें महत्तत्त्वाला प्रभुत्व प्राप्त होतें. ४५ हा अहंकार असा आहे. तो जर परमार्थांत साह्य होईल तर सोहंभावाच्या निश्चयानें संसाराचा तत्काळ विध्वंस करून टाकील. ४६ चोर जेव्हां विश्वासु मित्र होतो तेव्हां तो चोरच इतर चोरांपासून आपलें रक्षण करितो. त्याप्रमाणें अभिमानानें साह्य केल्यास संसारभय बाधत नाहीं. ४७ उद्धवा ! याप्रमाणें अभिमानाचें सामर्थ्य फार गहन आहे. म्हणून त्याचें प्रभुत्वानें वर्णन केलें. ४८ तीन गुणांपासून झालेला अभिमान त्या गुणांशींच एकरूप होऊन महत्तत्त्वांत लीन होतो व तादात्म्य पावतो. ५४९.

स च गुणवत्तमः महान् स्वेषु गुणेषु लीयते–तो ज्ञान-क्रियाशक्तींनीं युक्त असल्यामुळें गुणवत्तम असलेला महान आपल्या कारणभूत गुणांमध्यें लीन होतो म्ह० आपलें ज्ञान-क्रियाशक्तिमत्त्व सोडून गुणमात्ररूप होतो. ते अव्यक्ते संप्रलीयन्ते–ते गुण प्रकृतीमध्यें साम्यावस्थेस प्राप्त होतात. तत् अव्यये काले लीयते–तें अव्यक्त कालाधीन असल्यामुळें वृत्तिशून्य कालामध्यें एकरूप होऊन रहातें. २६.

तें महत्तत्व म्ह० मूळ मायेचें पहिलें कार्यहि आपल्या कारणगुणांत लीन होतें व गुणांच्या साम्यावस्थेंत मिळून अव्यक्तांत म्ह० सूक्ष्म प्रकृतींत लय पावतें. ५५० त्यावेळीं सगळे आकार-विकार लोपून जातात. केवल बीजमात्र उरतें. त्यालाच अव्यक्त असें म्हणतात. ५१ वटवृक्षाचा आकार-विकार जातो; शिखर, मूळ नाहींसें होतें; पानें-फुलें गळून जातात व केवल बीजमात्र शेवटीं उरतें. त्याप्रमाणें हा प्रपंच अव्यक्तांत रहातो. ५२ वटबीज इतकें सूक्ष्म असतें कीं, तें कोठें पडलें आहे तें दिसतहि नाहीं. त्याप्रमाणें अव्यक्त जें भवबीज तें जीवांना दिसत नाहीं. ५३ गवताच्या अनेक जातींचें बीज उन्हाळ्यांत काळ नाहींसें करून टाकितो. त्याप्रमाणें अव्यक्त असलेलें भवबीजहि काळाशीं एकरूप होतें. ५४ पूर्वीं क्षुब्ध काळानें ज्या अव्यक्ताला जगदाकारानें व्यक्त केलें होतें, तेंच अव्यक्त कालयोगानें कालामध्यें लीन होते. ५५ यास्तव हे उद्धवा ! यालाच अव्यक्ताचा कालांतील लय म्हणतात. त्या कालाचा पुरुषांत लय होतो. ५५६.

कालो मायामये जीवे जीव आत्मनि मय्यजे । आत्मा केवल आत्मस्थो विकल्पापायलक्षणः ।। २७ ।।

पुरुषाची पूर्ण क्षोभकता । तोचि काळ बोलिजे तत्त्वतां । उत्पत्तिस्थितिप्रळयांता । तिनी अवस्था काळाच्या ।। ५७ ।। तिनी अवस्था लोटल्या ठायीं । काळासी कर्तव्यता नाहीं । तो उपजत व्यापारें पाहीं । जीवाचे ठायीं सामावे ।। ५८ ।। अचेतनीं चेतविता । जडातें जो जीवविता । यालागीं जीवू ऐशी वार्ता । जाण तत्त्वतां पुरुषासी ।। ५९ ।। प्रकृतीचेनि योगें जाण । शुद्धासी बोलिजे जीवपण । पुरुषू हेंही अभिधान । त्यासीच जाण बोलिजे ।। ५६० ।। करितां प्रकृतिविवेचन । केवळ मृगजळासमान । दिसे परी साचपण । सर्वथा जाण असेना ।। ६१ ।। मृगजळामाजीं जो पडे । तेथ जळ नाहीं मा तो कोठें बुडे । तेवीं प्रकृति नसतां जोडे । वाडेंकोडें जीवत्व कोण ।। ६२ ।। जळीं बुडालें दिसे व्योम । सत्य मानणें तो मूर्खधर्म । तैसें रूप नाम गुण कर्म । हा मिथ्या भ्रम मायिक ।। ६३ ।। प्रकृतिकाळींही जाण । सत्य नाहीं जीवपण । तेही अर्थीची निजखूण । उद्धवा संपूर्ण अवधारीं ।। ६४ ।। स्वयें अवलोकितां दर्पण । दर्पणामाजीं दिसे आपण । तरी आपुलें वेगळेपण । स्वयें आपण जाणिजे ।। ६५ ।। तेवीं प्रकृतिकर्म करितां । जरी दिसे प्रकृतीआंतौता । तरी मी प्रकृतीपरता । जाण तत्त्वतां उद्धवा ।। ६६ ।। दिसे व्योम जळीं बुडालें । परी तें नाहीं वोलें झालें । तेवीं प्रकृतिकर्म म्यां केलें । नाहीं माखलें ममांग ।। ६७ ।। यापरी करितां निर्वाहो । प्रकृतीचा झाला अभावो । तेव्हां जीवशिवनांवें

कालः मायामये जीवे—काल मायाप्रवर्तक किंवा ज्ञानमय जीवामध्यें लीन होतो. (म्हणूनच येथें 'जो सर्वांना जिववितो तो जीव ' अशा व्युत्पत्तीनें जीव म्ह० महापुरुष घ्यावा. याचा भावार्थ असा-विश्वाला उत्पन्न करणारा जो महापुरुष त्याचें काल हें उपकरण आहे व वृत्ति या रूपानें तो उत्पाद्यहि आहे. वास्तव काल महापुरुषरूपानें अवस्थित होतो. (भागवताच्या सातव्या व दहाव्या स्कंधांत असेंच सांगितलें आहे.) जीवः मयि अजे आत्मनि—तो महापुरुषाख्य जीव मज आत्म्यामध्यें लीन होतो. (प्रकृतीचा लय झाल्यामुळें प्रतियोगीच्या अभावी तो परिपूर्णत्वानें व सद्रूपानें अवस्थित होतो.) आत्मा च आत्मस्थः एव—आणि आत्मा आत्म्यामध्येंच स्थित होतो, तो दुसऱ्या कोठेंच लीन होत नाहीं. कारण, केवलः—तो निरुपाधिक आहे, (त्याविषयीं हेतु—) विकल्पापायलक्षणः—विश्वाची उत्पत्ति व प्रलय यांवरून तो अधिष्ठानत्वानें व अवधित्वानें लक्षित होतो. २७.

पुरुषाचा जो पूर्ण क्षोभ त्यालाच वास्तविक काळ म्हणतात. उत्पत्ति-स्थिति-लय या तिन्ही अवस्था काळाच्या आहेत. ५७ या तिन्ही अवस्था संपल्या म्हणजे काळाचें कांहींच काम उरत नाही. म्हणून तो आपल्या स्वाभाविक रूपानें जीवांत मिसळून जातो. ५८ अचेतनाला चेतना देणारा, जडाला सजीव करणारा, म्हणून पुरुषाला जीव म्हणतात. ५९ प्रकृतीच्या संयोगानें शुद्ध ब्रह्माला जीवपणा येतो व त्याला पुरुष हें नांव प्राप्त होतें. ५६० प्रकृतीचा विचार केला असतां ती केवळ मृगजलासारखीच भासते. तिच्यामध्यें सत्यपणा मुळींच नसतो. ६१ मृगजलांत पडलेला मनुष्य त्यांत जलच नसतांना बुडणार कसा ! त्याचप्रमाणें प्रकृतीच मिथ्या असतां जीवाची आवड कोणीं करावी ! ६२ आकाश जलामध्यें बुडलेलें दिसतें, पण तें खरें मानणें जसें मूर्खपणाचें आहे, तसेंच रूप-नाम-गुण-कर्म हा सर्व मिथ्या मायिक भ्रम आहे. ६३ प्रलयकालींहि जीवपणा खरा नाहीं, याची पुरती खूण मी तुला सांगतों, ती हे उद्धवा ! तूं सविस्तर ऐक. ६४ आपण आरसा पाहूं गेलों असतां त्या आरशांत आपलेंच प्रतिबिंब दिसतें. परंतु आपण प्रतिबिंबाहून वेगळे आहोंत हें आपलें आपण जाणलें पाहिजे. ६५ उद्धवा ! मी प्रकृतीच्या अनुसार कर्म करीत असतां तरी प्रकृतीच्या आंत असल्याप्रमाणें भासतों जरी मी प्रकृतीच्याहि पलीकडे आहें, हें निश्चित समज. ६६ आकाश पाण्यांत बुडालेलें जरी दिसलें तरी तें जसें जलानें ओलें होत नाहीं, त्याचप्रमाणें मीं जरी प्रकृतीचें कर्म केलें, तरी त्यानें मुळींच लिप्त होत नाहीं. ६७ असा निश्चय केला असतां प्रकृतीचा अभाव

वावो । जीव तोचि पहा हो परमात्मा ।। ६८ ।। जीवाचें गेलिया जीवपण । सहजेंचि उडे शिवपण । दोघेही आत्मत्वें जाण । होती परिपूर्ण पूर्णत्वें ।। ६९ ।। जीवासी निजस्वरूप आठवो । या नांव जीवाचा परब्रम्हीं लयो । परमात्मा अज अव्ययो । अविनाश अद्वयो अनंत ।। ५७० ।। ब्रम्हीं स्फुरेना ब्रह्मपण । तेथ 'मी तूं' म्हणे कोण । परमानन्द परिपूर्ण । उरे जाण उद्धवा ।। ७१ ।। ऐसा परमानन्द म्हणसी कोण । तो मी अज अव्यय श्रीकृष्ण । आनंदस्वरूप तो मी जाण । मजवेगळें स्थान असेना ।। ७२ ।। ज्या स्वानंदा नांव श्रीकृष्ण । तें तुझें स्वरूप उद्धवा जाण । तेथ नाहीं गा मीतूंपण । परम कारण उर्वरित ।। ७३ ।। उद्धवा जीवाचा जीव मी श्रीकृष्ण । मज तुज नाहीं वेगळेंपण । यालागीं जीवाची हे निजखूण । परम कारण सांगीतलें ।। ७४ ।। जगाचा आत्मा श्रीकृष्ण । त्या माझा आत्मा तूं उद्धव पूर्ण । हें ऐकोनि श्रीकृष्णवचन । उद्धव जाण गजबजिला ।। ७५ ।। कृष्ण मज म्हणे आपुला आत्मा । परी मी नेणें कृष्णमाहिमा । अगाध लीला पुरुषोत्तमा । ते केवीं आम्हां आकळे ।। ७६ ।। नाथिलेंचि उद्धवपण । माझ्या अंगीं जडलें जाण । कृष्ण विवेकें पाहतां पूर्ण । माझें मीपण दिसेना ।। ७७ ।। मज उद्धवपण सांडितां । कृष्ण निजधामा जाईल तत्त्वतां । ते न साहवे अवस्था । सखेदता सप्रेम ।। ७८ ।। हे उद्धवाची अवस्था । कळों सरली श्रीकृष्णनाथा । तेचि अर्थीची हे कथा । शब्दार्थता निरूपी ।। ७९ ।।

एवमन्वीक्षमाणस्य कथं वैकल्पिको भ्रमः । मनसो हृदि तिष्ठेत व्योम्नीवार्कोदये तमः ॥ २८ ॥

प्रकृतिपुरुषविवंचन । आदि मध्य अवसान । तुज म्यां दाविलें एकपण । तेथ कां भिन्नपण कल्पिसी वायां ।। ५८० ।। उत्पत्तिआदि ब्रह्मपूर्ण । उत्पत्तीसी तेंचि कारण । जग जन्मलें जें सगुण ।

होतो व जीव शिवांचीं नांवें मिथ्या होतात. तेव्हां जीव तोच परमात्मा होतो. ६८ जीवाचा जीवभाव गेला कीं, शिवाचें शिवपणहि जातें व दोघेहि पूर्णत्वानें आत्मस्वरूपांत परिपूर्ण होतात. ६९ जीवाला आपल्या स्वरूपाची आठवण होणें यालाच जीवाचा परब्रह्मांत लय म्हणतात. परमात्मा अज, अव्यय, अविनाशी, अद्वय, अनंत आहे. ५७० ब्रह्मांत ब्रह्मपणाच स्फुरत नाहीं. तेथें 'मीं-तूंपणा' कोठचा ! हे उद्धवा ! त्या वेळीं परिपूर्ण परमानंद उरतो. ७१ असा परमानंद कोण ! असें जर म्हणशील तर तोच मी अज, आनंदरूप श्रीकृष्ण आहें. माझ्यावांचून रिकामी अशी जागा कोठेंच नाहीं. ७२ उद्धवा ! ज्या स्वानंदाला श्रीकृष्ण म्हणतात तेंच तुझें स्वरूप आहे. तेथें मीतूंपणा नाहीं. केवल परम कारण मात्र उरतें. ७३ उद्धवा ! जीवाचा जीव मी श्रीकृष्णच आहें. माझ्यांत व तुझ्यांत भिन्नपणा नाहीं. यास्तव जीवाचें परम कारण ही माझी मीं खूण तुला सांगितली. ७४ सगळ्या जगाचा आत्मा जो श्रीकृष्ण 'त्या माझा तूं उद्धव आत्माच आहेस.' हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून उद्धव मनांत गोंधळला. ७५ कृष्ण तर मला आपला आत्मा म्हणत आहे. पण मला श्रीकृष्णाचा महिमा कांहींच ठाऊक नाहीं. पुरुषोत्तमाची लीला अगाध आहे. ती आम्हांला कशी कळणार ! ७६ मिथ्याच 'उद्धवपणा' माझ्या पदरीं आला आहे; पण श्रीकृष्णाच्या विवेकदृष्टीनें पाहिलें असतां माझें मीपणच दिसत नाहीं. ७७ माझें उद्धवपण नाहींसें झालें म्हणजे श्रीकृष्ण निजधामाला जाईल. ती सप्रेम सखेद स्थिति मला सहन होणार नाहीं. ७८ उद्धवाची ही अवस्था श्रीकृष्णाला कळून चुकली. म्हणून त्याविषयींची ही कथा भगवान् शब्दार्थरूपानें सांगत आहे. ५७९.

—या कथनाचा प्रस्तुत प्रसंगीं काय उपयोग आहे, तें सांगतात—

एवं अन्वीक्षमाणस्य मनसः वैकल्पिकः भ्रमः कथं स्यात्—याप्रमाणें विवेक करणाऱ्या मनाला भेदनिमित्त भ्रम कसा होईल ! अर्कोदये व्योम्नि तमः इव हृदि कथं तिष्ठेत—आणि तो जरी उत्पन्न झाला तरी सूर्योदय झाल्यावर अंतरिक्षांतील अंधकाराप्रमाणें तो त्याच्या हृदयांत कसा राहील ! २८.

श्रीकृष्ण म्हणाला कीं, प्रकृति-पुरुषांचें विवेचन करून मी तुला आदि, मध्य व अंत या तीन्ही कालीं एकत्व दाखविलें. मग व्यर्थ भिन्नपण कां कल्पितोस ! ५८० उत्पत्तीच्या पूर्वीं पूर्ण ब्रह्म असतें. उत्पत्तीचें तेंच कारण आहे.

तेंही ब्रह्मरूपें जाण दाविलें तुज ॥ ८१ ॥ आणि प्रळयाच्या अंतीं । ब्रह्मचि उरे निजस्थिती । तेही विखींची प्रतीती । तुज म्यां निश्चितीं दाविली ॥ ८२ ॥ प्रकृतीहूनि पुरुष भिन्न । प्रकृति स्वातंत्र्यें मिथ्या जाण । ऐसें प्रकृतिपुरुष ज्यासी ज्ञान । त्यासी मीतूंपण भासेना ॥ ८३ ॥ जेथ नाहीं मीतूंपण । तेथ विकल्प कल्पी कोण । आद्यंतीं वस्तु पूर्ण । हें विवेकज्ञान जयासी ॥ ८४ ॥ जो विवेक पुरुषप्रकृती । सांख्य जागे ज्याचे चित्तीं । त्यासी विकल्पाची प्राप्ती । नव्हे कल्पांतीं उद्धवा ॥ ८५ ॥ सांख्य विवेकगभस्ती । पूर्ण उगवला ज्याचे चित्तीं । तेथ विकल्पाची अंधारी राती । कैशा रीतीं उरेल ॥ ८६ ॥ ज्यासी पटुतर सांख्यज्ञान । विकल्प विसरे त्याचें मन । हृदयीं उगवे चिद्भान । अज्ञाननिशा पूर्ण निरसूनी ॥ ८७ ॥ जेथ निरसलें अज्ञान । तेथ विकल्पाचें कैंचें स्थान । यापरी सांख्यज्ञान । साधकां पूर्ण उपकारी ॥ ८८ ॥ जें साराचें निजसार । जें गुह्यज्ञानभांडार । जें कां विवेकरत्नाकर । तें सांख्य साचार उद्धवा ॥ ८९ ॥

एष सांख्यविधिः प्रोक्तः संशयग्रन्थिभेदनः । प्रतिलोमानुलोमाभ्यां परावरदृशा मया ॥ २९ ॥

मी विवेकाचा विवेकू । मी अर्काचा आदिअर्कू । मी ज्ञानियांचा ज्ञानतिलकू । त्या माझा परिपाकू तें हें सांख्य ॥ ५९० ॥ मी वेदांचा आदिवेदू । मी बोधाचा आदिबोधू । मी आनंदाचा निजानंदू । त्या माझा प्रबोधू तें हें सांख्य ॥ ९१ ॥ तेणें म्यां सर्वज्ञें श्रीकृष्णें । निर्धारोनि निजज्ञानें । सांख्ययोगउपलक्षणें । ब्रह्म अव्ययपणें दाविलें ॥ ९२ ॥ जेवीं गरगरीत वाटोळा । करतळीं दिसे आंवळा । तेवीं सांख्ययोगलीळा । ब्रह्म तुज डोळा दाविलें ॥९३॥ जो ब्रह्म डोळां देखों जाये । तो सर्वांगें देखणा होये । ऐशी सांख्यज्ञाननिजसोये । तुज म्यां पाहे दाविली ॥ ९४ ॥ हा सांख्ययोगअनुक्रम । अन्वयव्यतिरेकें

हें सगुण-जगत् जें निर्माण झालें तेंहि ब्रह्मरूपच आहे. हेंहि मीं तुला स्पष्ट करून दाखविलें. ८१ प्रलयाच्या शेवटीं ब्रह्मच आपल्या मूळस्वरूपांत रहातें. त्याविषयींचा अनुभवहि मीं तुला सांगितला. ८२ प्रकृतीहून पुरुष भिन्न आहे. प्रकृति स्वरूपानें मिथ्या आहे, असें तूं जाण. प्रकृति-पुरुषाविषयीं ज्याला असें ज्ञान झालें, त्याला 'मी-तूंपणा' भासत नाहीं. ८३ सृष्टीच्या आरंभीं व अंतीं पूर्ण आत्मतत्त्व भरलें आहे, असें विवेकज्ञान ज्यांना आहे तेथें 'मी-तूंपण' नाहीं. तेथें विकल्पाची कल्पना कोण करणार ! ८४ उद्धवा ! ज्यानें प्रकृति-पुरुषांचा विवेक केला आहे, सांख्याचें तत्त्वज्ञान ज्याच्या मनांत जागें आहे, त्याच्या मनांत कल्पांतींहि विकल्प येणार नाहीं. ८५ प्रकृति-पुरुषरूपी सूर्य ज्याच्या मनांत पूर्णपणें उगवला आहे, तेथें विकल्परूपी अंधकार कसा उरणार ! ८६ ज्याला उत्कृष्ट सांख्यज्ञान झालें आहे, त्याचें मन विकल्प विसरतें, त्याच्या अंतःकरणांत ज्ञानरूपी सूर्य प्रकाशतो आणि तो अज्ञानरूपी रात्रीचें पूर्ण निरसन करतो. ८७ जेथें अज्ञानाचें निरसन झालें तेथें विकल्पाला जागा कोठची ! याप्रमाणें हें सांख्यज्ञान साधकावर पूर्ण उपकार करितें. ८८ उद्धवा ! जें साराचेंहि सार, गुह्यज्ञानाचें भांडार, व विवेकरत्नांचा सागरच तें हें सांख्यज्ञान होय. ५८९.

—आतां उपसंहार करितात—

प्रतिलोमानुलोमाभ्यां परावरदृशा मया एषः संशयग्रन्थिभेदनः सांख्यविधिः प्रोक्तः–उलट सुलट क्रमानें कार्य कारणाला पहाणाऱ्या मीं हा संशयरूपी ग्रंथीचा भेद करणारा सांख्यविधि तुला सांगितला. २९.

मी जो विवेकाचाहि विवेक, सूर्याचाहि आदिसूर्य, ज्ञान्यांचा मुकुटमणि, त्या माझी पूर्णावस्था म्हणजेच हें सांख्य होय. ५९० मी जो वेदांचाहि आदिवेद, बोधाचाहि आदिबोध, आनंदाचाहि निजानंद त्या माझें ज्ञान हेंच सांख्य होय. ९१ त्या मी सर्वज्ञ श्रीकृष्णानें आत्मज्ञानानें निश्चय करून सांख्ययोगाच्या साधनानें अव्ययपणानें ब्रह्म दाखविलें. ९२ वाटोळा गरगरीत आंवळा जसा तळहातावर ठेवावा, तसें हें ब्रह्म मीं तुला सांख्ययोगरूपानें प्रत्यक्ष दाखविलें. ९३ जो डोळ्यानें ब्रह्म पाहूं लागतो तो सर्वांगानें तन्मयच होतो, असें हें सांख्यज्ञानाचें तत्त्व मीं तुला दाखविलें. ९४ हा सांख्ययोगाचा अनुक्रम अन्वय-व्यतिरेकानें उल्लंघिला असतां अखंड, अद्वय ब्रह्म हेंच त्याचें वर्म कळतें.

उपक्रम । आलोडितां आकळे वर्म । अखंड ब्रह्म अद्वय ॥ ९५ ॥ उत्पत्तिस्थितिप्रळयात । ब्रह्म अखंड निज नित्य । हेंचि सांख्ययोगें प्राप्त । जाण निश्चित साधकां ॥ ९६ ॥ ज्यांसी ब्रह्मज्ञानाचें कोड । ते सांख्ययोग पुरवी चाड । लिंगदेहाचें सुदृढ झाड । त्याचें समूळ बूड उन्मळी ॥ ९७ ॥ लिंगदेह अत्यंत कठिण । तें सांख्ययोगापुढें जाण । जेवीं अग्नीमाजीं तृण । तेवीं होय संपूर्ण भस्मांत ॥ ९८ ॥ लिंगदेह सैंधवगिरिवर । सांख्य अत्यंत प्रळयसागर । खवळला विरवूनि करी नीर । एकाकार निजात्मता ॥ ९९ ॥ खवळल्या अत्यंत चित्सागरा । नाना संशयजळगारा । उरावया नाहीं थारा । निजनिर्धारा उद्धवा ॥ ६०० ॥ सकळ संशयांचें छेदन । लिंगदेहाचें भेदन । करी तें सांख्ययोगज्ञान । उद्धवा जाण निश्चित ॥ १ ॥ अनुलोभ प्रतिलोभ । विवंचना वाटेल दुर्गम । हें न करितां सांख्य सुगम । आकळे तें वर्म सांगेन ऐक ॥ २ ॥ सांडूनि आकार विषमता । सर्व भूतीं भगवंता । जो पाहे सद्भावतां । सांख्य त्याचें हाता समूळ आलें ॥ ३ ॥ कां जैसें होईल कर्माचरण । तैसें सुखेंचि हो आपण । मी कर्ता हें तूं न म्हण । इतुकेन ब्रह्म पूर्ण तूं होसी ॥ ४ ॥ याहीवरती सुगमता । मज दिसेना सर्वथा । उद्धवा तुझें निजहितार्था । जाण तत्त्वतां सांगीतलें ॥ ५ ॥ हेंचि एक माझें वचन । विचारूनियां संपूर्ण । निजहितार्थ आपण । अवश्य जाण करावें ॥ ६ ॥ ऐसें बोलिला देवाधिदेवो । तेथ जडला उद्धवाचा भावो । निःशेष 'अहं' सांडितां पहा हो । ब्रह्म स्वयमेवो सहजचि ॥ ७ ॥ विचारितां सांख्यज्ञान । जगातें गोंवी अहंपण । अहंपाशीं जन्ममरण । दुःख दारुण अहंभावीं ॥ ८ ॥ ऐसा अहंभावो कठिण । सांडितां न सांडे आपण । येचि गुंतीचें कारण । सर्वथा जाण कळेना ॥ ९ ॥ हें पुसों जावें देवापाशीं । तेणें विशद सांगीतलें सांख्यासी । आतां आपुली

---

९५ उत्पत्ति-स्थिति-प्रलय या तिन्ही अवस्थांत ब्रह्म अखंड व नित्य आहे, हेंच निश्चित ज्ञान प्राप्त होतें. ९६ ज्याला ब्रह्मज्ञानाची आवड असते, त्याची ती आवड सांख्ययोग पूर्ण करितो आणि लिंगदेहाच्या जुनाट वृक्षाचा समूळ उच्छेद करून टाकितो. ९७ लिंगदेह जरी अतिशय कठिण आहे, तरी अग्नींतील गवत जसें तत्काल भस्म होऊन जातें, तसा तो सांख्ययोगापुढें भस्म होऊन जातो. ९८ लिंगदेह हा मिठाचा पर्वत आहे व सांख्ययोग महासागर आहे. तो खवळला म्हणजे आपल्या जलांत त्या पर्वताला विरवून स्वरूपानें एकाकार करितो. ९९ उद्धवा ! एकदां ज्ञान-सागर खवळला कीं, अनेक संशयरूपी गारा शिल्लक राहण्यास जागाच उरत नाहीं. ६०० हे उद्धवा ! सांख्ययोगाचें ज्ञान सगळ्या संशयांचा छेद करितें व लिंगदेहाचा भेद करितें, हें तूं निश्चित जाण. १ हा अनुलोम व प्रतिलोभ विचार तुला दुर्गम वाटेल. पण तो विचार न करितांच सुगम सांख्ययोग कसा हातीं येईल, त्याचा उपाय मी तुला सांगतों, तो ऐक. २ आकारांचा विविध प्रकार सोडून जो सर्व प्राण्यांमध्यें भगवानाला सद्भावानें पहातो, त्याच्या हातीं समूळ सांख्य येतें. ३ कर्माचरण जसें होत असेल तसें तें खुशाल होऊं दे, त्यावर 'मी कर्ता' असा अभिमान ठेवूं नकोस. एवढ्यानेंच तूं पूर्णब्रह्म होशील. ४ उद्धवा ! याहून अधिक सुलभ मार्ग मला दिसत नाहीं. तुझ्या हितासाठीं हा सोपा मार्ग मी तुला सांगितला. ५ या माझ्या वचनाचा पूर्ण विचार करून त्याचेंच अवश्य आचरण करावें, ६ असें देवाधिदेवानें सांगितलें तेव्हां उद्धवाची त्यावर भक्ति जडली. निःशेष अहंकार सोडला असतां आपण स्वतः स्वभावतःच ब्रह्म आहोंत. ७ सांख्य ज्ञानाचा विचार केला असतां अहंकारानें सगळ्या जगाला गुंतवून टाकिलें आहे. कारण अहंकारापाशीं जन्म-मरण व भयंकर दुःख असतें. ८ हा महादुर्धर अहंकार सोडूं म्हटल्यास सुटत नाहीं व या त्याच्या गुंतागुंतीचें कारणहि कांहीं कळत नाहीं. ९ हे देवाला

गुंती आपल्यापाशीं । तेंचि आम्हांसी कळेना ।। ६१० ।। येचि अर्थीं श्रीकृष्ण । पंचविसावे अध्यायीं जाण । सगुणनिर्गुणविभागें पूर्ण । गोड निरूपण सांगेल ।। ११।। ते सुरस रसाळ मधुर कथा । जेथ श्रीकृष्णाऐसा वक्ता । उद्धव शिरोमणि श्रोता । अनुपम स्वादुता ते ठायीं ।। १२ ।। त्या स्वादाचें गोडपण । सांगावया समर्थ श्रीकृष्ण । सेवावया श्रोता अतिसज्ञान । निजभक्त जाण उद्धव ।। १३ ।। ते देवभक्त संवादगोडी । वेदशास्त्रें न जोडे जोडी । आलोडितां ग्रंथकोडी । ते निजगोडी नातुडे ।। १४ ।। आतुडावया ते निजगोडी । जैं भाग्यें भावार्थें जोडे जोडी । भावार्थाचे निजआवडी । जिव्हारींची गोडी देवो दे भक्तां ।। १५ ।। एवं भावार्थापरतें कांहीं । देवासी आवडतें नाहीं । तो भावो नाहीं ज्यांचे ठायीं । ते मूर्ख पाहीं बालिश ।। १६ ।। त्या बाळकांचा धन्य भावो । खापरें मांडूनि म्हणती देवो । तेथही प्रकटे देवाधिदेवो । धरिल्या निःसंदेहो विश्वास ।। १७ ।। बाळकें दूध मागावयासाठीं भावार्थें लागला देवापाठीं । कां क्षीराब्धि करूनि वाटी । उपमन्याचोठीं लाविली ।। १८ ।। एवं भाविकू देवाचा लाहणा । देवो भाविकांचा आंदणा । भावेंवीण देवो जाणा । कधीं कोणा न भेटे ।। १९ ।। यालागीं जेथ भावार्थ । तेथचि जोडे सुखस्वार्थ । भावार्थ तेथ परमार्थ । सांग साद्यंत सांपडे ।। ६२० ।। ऐसा वाढविल्या भावार्थ । तेणें जोडे निर्गुणनिजस्वार्थ । तेचि अर्थींचा वृत्तांत । पुढिल्या अध्यायांत हरि सांगे ।। २१ ।। ते कथेचें गोडपण । अमृतास विसरवी जाण । ऐसें रसाळ निरूपण । सादरें श्रीकृष्ण सांगेल ।। २२ ।। तें श्रीकृष्णकथापीयूख । श्रोत्यांचें पावे श्रवणमुख । एका जनार्दनीं अतिसुख । सकौतुक व्याख्यान ।। २३ ।। श्रीभागवत अत्यादरें । श्रीकृष्णकथा सविस्तरें । अहेर विस्तारिले साजिरे । परमार्थअळंकारें साळंकृत ।। २४ ।। तेणें संतसज्जन सोयरे । गौरवीन श्रवणादरें । एका जनार्दन

विचारावयास जावें तर त्यानें सांख्यशास्त्र सांगितलें आहे. पण ही आपली गुंतागुंत आपल्यापाशींच कशी राहिली, तें आम्हांला कळत नाहीं. ६१० याचविषयीं श्रीकृष्ण पंचविसाव्या अध्यायांत सगुण-निर्गुणांचें गोड निरूपण करणार आहे. ११ ती कथा सुरस, रसाळ व मधुर आहे. जेथें श्रीकृष्णासारखा वक्ता व उद्धवासारखा श्रेष्ठ श्रोता तेथलें माधुर्य निरुपम असेल, हें काय सांगावें. १२ त्या स्वादाची गोडी सांगण्यास श्रीकृष्णच समर्थ आहे. त्याचें सेवन करणारा श्रोता भक्त श्रेष्ठ उद्धव अत्यंत ज्ञानी आहे. १३ त्या देव-भक्तांच्या संवादाची गोडी वेदशास्त्रांतहि लाभत नाहीं. कोट्यवधि ग्रंथ जरी पालथे घातले तरी ती गोडी कळत नाहीं. १४ ती गोडी प्राप्त व्हावयास मोठ्या भाग्यानें जेव्हां भावार्थाची जोड लाभते, तेव्हां श्रीकृष्ण त्या भक्ताला आपल्या अंतःकरणांतील गोडी भावार्थाच्या आवडीनें देतो. १५ देवाला भावार्थावांचून दुसरें कांहींहि आवडत नाहीं. हा भाव ज्याच्यापाशी नाहीं ते मूर्ख होत १६ जीं मुलें खापरखुंट्यांचा खेळ मांडून त्याला देव म्हणतात. त्यांचा भाव धन्य होय. श्रद्धा ठेविली असतां तेथेंहि भगवान् निःसंशय प्रकट होतो. १७ उपमन्यु बाळ दूध मागण्यासाठीं भक्तिभावानें देवाच्या पाठीस लागला तेव्हां दुधाचा समुद्र करून तीच वाटी त्यानें उपमन्यूच्या तोंडाला लाविली. १८ याप्रमाणें देव भाविकांचा भुकेला आहे. भाविक त्याचा अत्यंत आवडता आहे. भावावांचून देव कधींहि कोणाला भेटत नाहीं. १९ यास्तव जेथें भावार्थ असतो, तेथेंच सुखस्वार्थ जोडतो आणि जेथें भावार्थ आहे, तेथें परमार्थ पूर्णपणें सांपडतो. ६२० असा भावार्थ वाढविला असतां त्यायोगें निर्गुण स्वार्थ जोडतो. याविषयींचा वृत्तान्त पुढल्या अध्यायांत हरि सांगणार आहे. २१ ज्या कथेची गोडी अमृताचाहि विसर पाडिते, असें रसाळ निरूपण श्रीकृष्ण आदरानें करणार आहे. २२ तें श्रीकृष्णकथारूपी अमृत श्रोत्यांच्या श्रवणरूपी मुखांत पडेल. एका जनार्दनहि मोठ्या आनंदानें त्याचें व्याख्यान करील. २३ श्रीभागवतानें मोठ्या आदरानें श्रीकृष्णकथाविस्ताराचा सुंदर अहेर दिला आहे. परमार्थरूपी अलंकारानें तो भूषविला आहे. २४ आतां मी त्याच अहेराच्या निवेदनानें आमचे आप्त जे संत-

कृपाकरें। आविष्करे सामर्थ्य॥ २५॥ गौरवीले सोयरे सज्जन। म्हणाल उपेक्षिले इतर जन। जो श्रीभागवतीं सावधान। तो परमार्थे जाण गौरवे॥ २६॥ भावार्थासारिखें गौरवण। एका जनार्दन जाणे जाण। एका जनार्दना शरण। आपण्या आपण गौरवी॥ ६२७॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां प्रकृतिपुरुषसांख्ययोगो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः॥ २४॥ श्रीकृष्णार्पणमस्तु॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे चतुर्विंशोऽध्यायः॥ २४॥

अध्याय पंचविसावा.

श्रीगणेशाय नमः॥ ॥ ॐनमो देव निर्गुण। म्हणों पाहें तंव न देखें गुण। गुणेंवीण निर्गुणपण। सर्वथा जाण घडेना॥ १॥ सर्वथा न घडे निर्गुणपण। तरी घडो नेदिशी सगुणपण। नातळशी गुणागुण। अगुणाचा पूर्ण गुरुराया॥ २॥ अगुणाच्या विपरीत तूं गुणी। करिसी त्रिगुणगुणां झाडणी। पंचभूतांपासूनी। सोडविता जनीं जनार्दनू॥ ३॥ ज्याचेनि जनांसी अर्दन। ज्याचेनि लिंगदेहा मर्दन। जो जीवासी जीवें मारी पूर्ण। तो कृपाळु जनार्दन घडे केवीं॥ ४॥ जनार्दनाचें कृपाळुपण। सर्वथा नेणती जन। नेणावया हेंचि कारण। जे देहाभिमान न सांडिती॥ ५॥ जननीजठरीं जन्म जाण।

सज्जन त्यांचा गौरव करीन. २५ सोयऱ्यासज्जनांचा मात्र सन्मान करून तूं इतर जनांची उपेक्षा केलीस, असें जर म्हणाल तर (तसें नव्हे) जो भागवताचें लक्षपूर्वक श्रवण करील; त्याचा परमार्थानेंच गौरव होईल. २६ भावार्थासारखा गौरव कसा करावा, हें एकनाथ-जनार्दन जाणतो. म्हणून एका जनार्दनाला शरण जाऊन आपला आपणच गौरव करीत आहे. ६२७.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील प्रकृति-पुरुषसांख्ययोगनांवाचा चोविसावा अध्याय समाप्त झाला.

ॐ नमः। देवाला निर्गुण म्हणावें तर गुण कोठेंच दृष्टीस पडत नाहींत आणि गुणांवांचून निर्गुणपणा कधींच संभवत नाहीं. १ याप्रमाणें निर्गुणत्व संभवत नाहीं व सगुणसत्वहि तूं आपल्याकडे लावून घेत नाहींस. हे गुरुराया! असा तूं पूर्ण गुणरहित आहेस. तूं गुण अगुणांना स्पर्शीहि करीत नाहींस. २ पण अवगुणांच्या विरुद्ध असलेले जे सद्गुण त्यांनीं तूं युक्त आहेस. तूं सत्त्व-रजादि त्रिगुणांना झाडून टाकितोस. पंचभूतांपासून सोडविणारा तूं जनार्दन आहेस. ३ दुष्ट जनांचा नाश करणारा म्हणून जनार्दन, किंवा संसारदुःख भोगावयास लावणाऱ्या लिंगदेहाचा नाश करून जीवाला जीवानेंच पूर्णपणें मारितो म्हणून तो जनार्दन, तेव्हां तो दयाळु आहे हें म्हणणें कसें संभवतें! ४ लोक जनार्दनाचा दयाळुपणा जाणत नाहींत. ते देहाभिमान सोडीत नाहींत, हेंच त्याला न जाणण्याचें कारण आहे. ५ मनुष्य जननीच्या उदरांतून जन्मतो म्हणून त्याला 'जन' असें म्हणतात. त्या जनांच्या